# गौड ब्राह्मण

॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

● वर्ष ८०, मुंबई ● अंक ०३ ● जानेवारी–फेब्रुवारी–मार्च २०१९ ● पाने १०० ● किंमत २० रुपये


## १२१ वे वार्षिक स्नेह संमेलन २०१८




डाविकडून श्री.देवदत्त खानोलकर (उपाध्यक्ष),
कॅप्टन मोहन सामंत (समारंभाध्यक्ष),
मेजर अरविंद पाटील (प्रमुख पाहुणे),
डॉ.विलास देसाई (अध्यक्ष)
श्री.श्रीपाद पंतवालावलकर
(जीवन गौरव पुरस्काराचे मानकरी)



महावीरचक्र विजेते कॅप्टन
श्री.मोहन नारायणराव सामंत
(समारंभाध्यक्ष) गौड ब्राह्मण
सभेचे अध्यक्ष डॉ.विलास देसाई
यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना.



मेजर श्री.अरविंद पाटील (प्रमुख पाहुणे)
संस्थेचे उपाध्यक्ष श्री.देवदत्त खानोलकर
यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना.






'संगीत रजनी' हा बहारदार सांस्कृतिक
गाण्याचा कार्यक्रम सादर करताना बेळगावहुन
खास आलेले तरुण शास्त्रीय गायक पं.आकाश पंडीत,
पं.योगेश रामदास (संवादिनी), श्री.अंगत देसाई (तबला),
कु.ऋजुता श्याम सामंत (विरार) कार्यक्रमाचे निवेदन करताना


"सार्थ उपनिषद भाग १,२,३,४";"समग्र श्री शंकराचार्य भाग १,२,३,४"
"ब्रह्मसूत्र (शंकर भाष्य)" ; "सार्थ श्री ज्ञानेश्वरी रहस्य"
४० वर्षांच्या यशस्वी इंजिनिअरिंग करिअर नंतर,केवळ जिज्ञासेपोटी,पुण्यातील प्रसिद्ध
Bhandarakar Oriental Research Institute
मधील वरिष्ठ प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली, मूळ संस्कृत ग्रंथांचे भाषांतर/भाष्य-स्वरूपी केलेले लेखन, प्रथम प्रकाशने छापील-पुस्तक स्वरुपात (1995),आता फक्त इ-बुक्स स्वरुपात,विक्रेते- www.BookGanga.com(Jagat Guru Acharya Shri Shankara is the first authentic exponent of Advait Vedant,as recognized by the Great Philosophers from the world))



Author- Shrikant Gangaram Desai







॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥

गौड ब्राह्मण

**स्थापना : १९३९**

**: संपादक :**
उमाकांत गणपत महाजन

**: संपादन साहाय्यक मंडळ :**
पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक
जगजीवन श्रीकांत प्रभु
योगेश खानोलकर
वीणा विश्वनाथ दाभोलकर

**: मुखपृष्ठ संकल्पना :**
मनीष दाभोलकर

**: संपादकीय पत्रव्यवहार :**
**गौड ब्राह्मण सभा**
३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास,
१४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी: ०२२-२३८५ ००१५
मो.: ९६८९७८१७५०
Email : gbs.girgaon@gmail.com
ugmahajan@rediffmail.com

या त्रैमासिकात प्रकाशित झालेल्या लेखातील मतांशी संपादक तसेच संस्था सहमत असतीलच असे नाही.

- संपादक

# ✻ गौड ब्राह्मण ✻

वर्ष ८० वे ❖ जानेवारी-फेब्रुवारी-मार्च-२०१९ ❖ अंक ३

## अंतरंग

- **संपादकीय** : उमाकांत गणपत महाजन
- **स्वरभूषण पद्मश्री कै. वसंत देसाई** : सौ. गीता परूळेकर
- **झारापकर उद्योग समूहाचे शिल्पकार के.आर. झारापकर** : सुधा मधुकर जोशी
- **जगी सर्व सुखी असा कोण आहे विचारी माना तूच शोधूनि पाहे** : कु. सुनिता सुभाष प्रभू मुणगेकर
- **स्वातंत्र्यवीर सावरकर एक झंझावात** : श्रीमती नीलिमा श. प्रभू
- **पुस्तकांचा दरवळला वसंत** : निरूता भाटवडेकर
- **SUCCESS STORIES Hollywood Animation Director राहूल ची** : मनीष दाभोलकर
- **गौड ब्राह्मण सभा १२१ व्या वार्षिक स्नेह संमेलनाचा वृत्तांत** : सुभाष वाघ
- **उत्कंठा-उत्साह-जल्लोष आणि बंदु भावाच्या वातावरणात गोव्यातील KPL -२०१९ सोहळा संपन्न-** : वीणा दाभोलकर
- **कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी सांगता समारंभ** : संजय सुंदर सामंत
- **गौड ब्राह्मण समाज, गोरेगावचे वार्षिक स्नेह संमेलन** : सौ. अंजली प्रमोद देसाई
- **ज्ञातिवृत्तांत, साद-प्रतिसाद श्रद्धांजली व वधू-वर सूची**

**गौड ब्राह्मण सभा यांच्या मालकीचे हे त्रैमासिक संपादक, मुद्रक व प्रकाशक उमाकांत गणपत महाजन यांनी प्रतिक ऑफसेट, १८०-सी गायवाडी, गिरगाव, मुंबई-४०० ००४ येथे छापून ३०, कुडाळदेशकर ब्राह्मण निवास, १४७ ब, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, मुंबई ४०० ००४ येथे प्रसिद्ध केले.**

# गौड ब्राह्मण सभा

ज्ञातीतील दानशूर व्यक्तींनी संस्थेला दिलेल्या भरघोस देणग्यांमधून, त्यांनी व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने विविध कायमनिधी फंड गठीत केले असून या कायमनिधी फंडांच्या व्याजातून ज्ञातीतील निराधार, निराश्रित, गरीब, गरजू स्त्री/पुरुष, यांना आर्थिक मदत, विद्यार्थी/विद्यार्थिनींना शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती तसेच ज्ञातीतील कर्करोग, हृदयविकार, किडणीविकार, मतिमंद आदी व्याधीग्रस्त रुग्णांना औषधोपचार/शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत दिली जाते.

सभेच्या कायम निधी फंडाकरिता रु. २५,०००/- किंवा त्याहून अधिक देणगी देणाऱ्या ज्ञातीतील दानशूरांची नावे गौड ब्राह्मण सभेच्या त्रैमासिकात कायम स्वरुपात छापली जातील.

गौड ब्राह्मण सभेच्या कायम निधी फंडाकरिता ज्ञातीतील दानशूरांनी दिलेल्या देणग्यांचा तपशील खालीप्रमाणे आहे.

## आश्रयदाते

**स्व. लक्ष्मीबाई बा. पाटील, विले पार्ले**
**स्व. विष्णु मंगेश पाटील,** विले पार्ले ₹ ८०,४८,०००/–

**सौ. स्वाती सुरेश परूळेकर यांजकडून**
(पिताश्री स्व. गणपत स. आजगावकर
मातोश्री स्व. प्रभावती ग. आजगावकर
भगिनी स्व. मालती अरविंद नाईक ह्यांच्या स्मरणार्थ) ₹ ५,००,०००/-

**स्व. विष्णू मंगेश पाटील, विले पार्ले** ₹ २,५०,०००/–
(स्व. गौरी व स्व. मंगेश पाटील यांच्या स्मरणार्थ)

**स्व. विष्णू मंगेश पाटील, विले पार्ले** ₹ २,५०,०००/–
(स्व. लीला व स्व. दामोदर सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत** (अंधेरी पूर्व) ₹ २,००,०००/–
(मावशी स्व. कु. चित्ररेखा (चित्रा) चिंतामण प्रभुदेसाई हिच्या स्मरणार्थ)

| | |
|---|---|
| **स्व. एकनाथ केशव ठाकूर** | ₹ १,००,०००/– |
| **स्व. गजानन विष्णू देसाई** | ₹ १,००,०००/– |
| **स्व. छाया पद्माकर परुळेकर** | ₹ ५०,०००/– |
| **स्व. लक्ष्मी दिनकर खानोलकर** | ₹ ३५,०००/– |
| **स्व. वंदना आनंद खानोलकर** | ₹ २५,०००/– |
| **स्व. नलिनी शां. पंतवालावलकर** | ₹ २५,०००/– |
| **स्व. मुकुंद गजानन देसाई** | ₹ २५,०००/– |
| **स्व. अनंत लक्ष्मण प्रभु** | ₹ २५,०००/– |
| **स्व. नीला भालचंद्र नाईक** | ₹ २५,०००/– |
| **स्व. बापू नीळकंठ देसाई** | ₹ २५,०००/– |
| **स्व. भालचंद्र अनंत नाईक** | ₹ २५,०००/– |
| **स्व. जगन्नाथ भगवत महाजन** | ₹ २५,०००/– |

## आधारस्तंभ

**श्री. अरविंद लक्ष्मण पाटील पाटकर** ₹ ५,७५,०००/–
(स्व. लक्ष्मण अनंत पाटील पाटकर व स्व. अन्नपूर्णा लक्ष्मण पाटील पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश विठ्ठल परूळेकर यांजकडून**
आजोबा स्व. रामचंद्र विठ्ठल परुळेकर
आजोबा स्व. मधुसुदन पुरुषोत्तम वाघ ₹ ५,००,०००/–
पिताश्री स्व. विठ्ठल रामचंद्र परुळेकर
मातोश्री स्व. सुदा विठ्ठल परुळेकर
स्व. काका डॉ. काशिनाथ रामचंद्र परुळेकर
ह्यांच्या स्मरणार्थ.

**श्री. सूर्यकांत ज्ञानदेव आजगांवकर** (पालघर) ₹ १,५०,०००/–
(स्व. आई/स्व. वडील व स्व. काका पुरुषोत्तम तुकाराम आजगांवकर यांच्या स्मरणार्थ)

**सौ. शुभलक्ष्मी सूर्यकांत आजगांवकर**(पालघर) ₹ १,५०,०००/–
(स्व. आई/स्व.वडील व भाऊ स्व. मोहनदास पुरुषोत्तम प्रभु खानोलकर यांच्या स्मरणार्थ)

| | |
|---|---|
| **डॉ. रवींद्र बाबूराव तिरोडकर** | ₹ १,५०,०००/– |
| **डॉ. विलास रामकृष्ण देसाई** | ₹ १,२५,०००/– |
| **श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील** | ₹ १,२५,०००/– |
| **श्रीमती प्रेमलता गजानन प्रभु** | ₹ १,१८,०००/– |

(स्व. गजानन शंकर प्रभु व स्व. शंकर गणेश प्रभु ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. मृणालिनी वसंत नाईक आणि कुटुंबीय** ₹ १,११,०००/–

**श्रीमती निलू (निरंजन) गव्हाणकर** ₹ १,१०,००२/–
(स्व. गणेश विष्णू गव्हाणकर, स्व. सुशीलाबाई गणेश गव्हाणकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर व** ₹ १,०२,०००/–
**श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर (वसई)**
यांजकडून (पिताश्री स्व. श्री. नारायण सखाराम देशपांडे व स्व. श्रीमती कुमुसदीनी नारायण देशपांडे सोलापूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. हृषीकेश काशीनाथ प्रभु** ₹ १,००,०००/–
(स्व. देवराम दा. सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

| | |
|---|---|
| **श्रीमती आरती दिनेश नायक** | ₹ ७५,०००/– |
| **श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत** | ₹ ७०,०००/– |
| **श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** | ₹ ५०,००१/– |
| **श्री. महेंद्र पांडुरंग तेंडुलकर** | ₹ ५०,००१/– |

संपादकीय

''गौड ब्राह्मण'' सभेचा जानेवारी-फेब्रुवारी-मार्चचा अंक सभासदांच्या हातात पडे पर्यंत चैत्र प्रतिपदा म्हणजे ''**गुढी पाडवा**'' शालीवाहन शके १९४१ ला प्रारंभ झाला असेल. ह्या नव वर्षानिमीत्त आमच्या सर्व ज्ञातीबांधवांना, हितचिंतकांना व जाहिरात दारांना खूप-खूप शुभेच्छा.

आपल्या ज्ञातितील पूर्वसूरींनी स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून ज्ञातीबांधवांचा सर्व स्तरावर विकास घडवून आणण्यासाठी गौड ब्राह्मण सभेची स्थापना केली व त्यानंतर ''गौड ब्राह्मण'' या त्रैमासिकाची वाटचाल सुरु झाली. १२१ वर्षांची महान परंपरा लाभलेल्या गौड ब्राह्मण संस्थेचे दरवर्षी भरणारे वार्षिक स्नेह संमेलन हे सर्व ज्ञातीबांधवांसाठी व कार्यकर्त्यांसाठी आनंद मेळावाच असतो. गेली अनेक वर्षे ह्या स्नेह संमेलनाची तारीख व वेळ कधी चुकली नाही. ह्याही वर्षीचे १२१ वे वार्षिक स्नेह संमेलन मंगळवार, दिनांक २५ डिसेंबर रोजी गोरेगाव येथील पाटकर महाविद्यालयाच्या प्रशस्त सभागृहात भारतीय सैन्य दलात पराक्रम गाजवणाऱ्या व ज्ञातीतील मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडले. स्नेह संमेलनाच्या अध्यक्ष स्थानी होते कॅप्टन मोहन नारायणराव सामंत तर प्रमुख पाहुणे होते मेजर अरविंद रामचंद्र पाटील. दोन्ही मान्यवरांचे सभागृहात आगमन होताच सर्व उपस्थितांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात जोरदार स्वागत केले. हा क्षण अगदी भारावून टाकणारा असाच होता. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. सुर्वातीला सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. आकाश पंडित (बेळगाव) ह्यांच्या सुरेल संगीताने झाली. त्यांच्या सुरेल व मधुर गाण्याने श्रोत्यांना मंत्र मुग्ध केले.

मध्यंतराला ॲनिमेशन सम्राट श्री. व्ही. जी. सामंत निर्मित गौड ब्राह्मण ज्ञाती, ''गौड ब्राह्मण त्रैमासिक'' व गौड ब्राह्मण सभा यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीवर तयार केलेला माहितीपट पाहताना सभागृहातील ज्ञातीबांधवांचे नेत्र पाणावले होते तर छाती अभिमानाने भरून आली होती. कार्यक्रमाच्या अनुषंगाने गौड ब्राह्मण सभेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या अनेक योजनाचे माहिती दर्शक बॅनर सभागृहात लावण्यात आले होते. आपल्या ज्ञातीतील एक दानशूर महिला स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर ह्यांनी गोरेगाव येथील नीलाश्री सोसायटीतील आपली राहती जागा गौड ब्राह्मण सभेस दान केली असून त्यांच्या इच्छेनुसार ज्ञातीचे एक भव्य सभागृह उभारावे ह्या योजनेस ज्ञातीबांधवांनी प्रतिसाद देऊन आपल्या परीने खारीचा वाटा उचलण्यास सुरूवात केली आहे. संस्थेच्या या योजनेसाठी ज्ञातितील दानशूरांनी सढळ हस्ते आर्थिक मदत करावी, असे आम्ही आवाहन करीत आहोत.

गौड ब्राह्मण सभेच्या १२१ व्या वार्षिक स्नेह संमेलनाच्या स्मृती मनातून वीरत नाही तोच गौड ब्राह्मण सभेने ज्ञातीतील तरूणांना एकत्र आणण्यासाठी (KPL) कुडाळदेशकर प्रिमीयर लीग ह्या नावे विविध क्रिडा सामन्याचे आयोजन केले होते. ह्या वर्षीचे (KPL) कुडाळदेशकर प्रिमीयर लीग खेळाचे प्रायोजकत्व गोव्याच्या कुडाळदेशकर उन्नती मंडळानी स्वीकारले होते. फोंड्यातील गुलाबी थंडी अंगावर पांघरत १९ व २० जानेवारी २०१९ रोजी सर्व खेळाडू व कार्यकर्ते मंडळी फोड्यांच्या लोहिया मैदानावर जमा झाली होती. दोन दिवस चाललेल्या ह्या कार्यक्रमात जवळ जवळ ६०० ज्ञातीबांधवानी एकत्र येऊन आपल्या सांघिक वृत्तीचे बळ दाखवले.

त्यानंतर सर्व ज्ञाती बांधवांचे लक्ष लागले ते गेली १२५ वर्षे ज्ञातीतील गोर-गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत करणाऱ्या आपल्या ज्ञातीतील कुडाळदेशकर गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्याकडे.

## आधारस्तंभ

| | |
|---|---|
| **श्री. जगजीवन श्रीकांत प्रभू केळुसकर** | ₹ ५०,०००/– |
| **श्री. महादेव भास्कर सामंत** | ₹ ५०,०००/– |
| **श्री. विजय विठ्ठल परुळेकर** | ₹ ५०,०००/– |
| **श्रीमती वंदना केदार पाटील** | ₹ ५०,०००/– |
| **श्रीमती विभावरी अरविंद पाटील–पाटकर** | ₹ ५०,०००/– |
| **श्रीमती विजयालक्ष्मी द्वारकानाथ दाभोलकर** (स्व. द्वारकानाथ साबाजी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ ५०,०००/– |
| **टोपीवाला चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई** | ₹ ५०,०००/– |
| **सौ. बीना विष्णु प्रभु व श्री. विष्णू विनायक प्रभु** (स्व. पर्शराम आत्माराम वायंगणकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ ५०,०००/– |
| **श्री. शामराव शांताराम पाटील श्रीमती उषा शामराव पाटील** | ₹ ५०,०००/– |
| **श्रीमती मीरा रघुनाथ सामंत** | ₹ ५०,०००/– |
| **श्री. रामदास बी. प्रभु–कोचरेकर** (स्व. काका कोचरेकर पारितोषिक फंडात भर) | ₹ ३५,०००/– |
| **श्रीमती स्नेहलता ग. तिरोडकर** (स्व.गजानन (दादा) रघुनाथ तिरोडकर यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,११२/– |
| **श्री. उदयराज स. सामंत नेवाळकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. सुधाकर वासुदेव वालावलकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. राजीव आनंदराव गव्हाणकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. शशीकांत पीतांबर देसाई** | ₹ २५,०००/– |
| **श्री. अच्युत वामन तेंडुलकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. अरुण रघुनाथ सामंत** (स्व. रघुनाथ विष्णू सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती पुष्पा रामचंद्र सामंत** (स्व. रामचंद्र का. सामंत व स्व. कमल रामचंद्र सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती सुहासिनी दत्ताराम गाळवणकर** (स्व. सुमती मधुसूदन तेंडुलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर, सौ. विजया शिवराम तेंडोलकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. प्रभु–पाटकर कुटुंबीय मुलुंड** (स्व. सतिशचंद्र सहदेव प्रभु-पाटकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्री. भूषण रोहीत झारापकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. काशीनाथ नारायण कोचरेकर,** वसई (स्व. नारायण विनायक कोचरेकर व स्व. मनोरमा नारायण कोचरेकर यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्री. सुधाकर भास्कर गवाणकर,** (कणकवली) (स्व. सौ. सुधा सुधाकर गवाणकर हिच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **सौ. नीला राजाराम गाळवणकर** | ₹ २५,०००/– |
| **श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** (स्व. शांताराम बाळाजी पाटील व स्व. राधाबाई शांताराम पाटील ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **सौ. भारती सुधाकर नाईक (अर्नाळा)** (स्व. विश्वनाथ राजाराम सामंत व स्व. सुमती विश्वनाथ सामंत ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती शरयु तेंडोलकर** (स्व. प्रा. पंढरीनाथ गोपाळ तेंडोलकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती जयंती भालचंद्र पाटकर** (डोंबिवली) (स्व. भालचंद्र नारायण पाटकर ह्यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** (स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्री. रोहित रजनीकांत नाईक** (डोंबीवली) | ₹ २५,०००/– |
| **श्री. सुनील दिगंबर सामंत** (स्व. सॉलिसीटर वासुदेव भिकाजी सामंत स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **सौ. स्वाती अमोल तेंडोलकर** (स्व. रमाकांत धोंडोपंत देसाई व स्व सुहासिनी रमाकांत देसाई यांच्या स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |
| **श्रीमती सावित्री जगन्नाथदेसाई (वालावल)** (स्व. जगन्नाथ दामोदर देसाई उर्फ काका बांबुळकर यांचे स्मरणार्थ) | ₹ २५,०००/– |

## गौड ब्राह्मण सभा

गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

## ज्ञातीबांधवास विशेष सूचना
## मौजीबंधन सोहळा

वरील संस्थेतर्फे रविवार दि. १२-०५-२०१९ रोजी सकाळी कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास येथील टोपीवाला वाचनालयाच्या जागेत मौजीबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. आयोजनाकरिता प्रत्येक बटूमागे रु. १०००/- इतके शुल्क आकारले जाणार आहे. इच्छुकांनी आपली नावे शुल्कासह दिनांक ३०-०४-२०१९ पर्यंत संस्थेच्या गिरगाव येथील कार्यालयात नोंदवावीत या कार्यक्रमात बटू, त्यांचे पालक, मामा व करवली यांना चहा, नाश्ता, मातृभोजन, भोजन इत्यादींसाठी वरील शुल्क आकारण्यात आले आहे. त्याहून अधिक प्रत्येक व्यक्तीमागे रु. ५००/- इतके शुल्क आकारले जाईल.

**रत्नाकर तेंडोलकर** (कार्य वाह)
**गौड ब्राह्मण सभा**

१७ फेब्रुवारी २०१९ रोजी मुंबईच्या दादर येथील राजा शिवाजी विद्यालय संकुलातील डॉ. बी.एन. वैद्य समाभृहात हा सोहळा संपन्न झाला. या समारंभाच्या अध्यक्ष म्हणून भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती माननीय सौ. रंजना प्रकाश देसाई होत्या. तर समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुंबईच्या आयटीसीचे माजी डीन डॉ. (प्रा.) श्रीनिवास दामोदर सामंत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ''ऋतू वसंत फुलला'' हा गीतकार आरती प्रभू, संगीतकार वसंत देसाई व वसंत प्रभू यांच्या गाण्याचा कार्यक्रम गायक नचिकेत देसाई व आदिती प्रभू देसाई ह्यांनी सादर केला. कार्यक्रमाची संकल्पना होती सुप्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांची व निवेदनही त्यांनीच केले.

समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. प्रा. श्रीनिवास सामंत यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतात, संस्थेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेतला व बदलत्या काळात संस्थेला आपल्या ध्येय धोरणात आवश्यक ते बदल करावे लागतील असे सांगितले. तर समारंभाच्या अध्यक्षा न्यायमूर्ती रंजना देसाई यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात, आपल्या ज्ञातीतील मान्यवर टोपीवाले देसाई, रामभाऊ परुळेकर, वसंत देसाई, गिरगावातील कुडाळदेशकर निवासामध्ये राहणारे नातेवाईक, जुन्या काळात होणाऱ्या निवासातील महिलांचे कार्यक्रम व ''गौडब्राह्मण त्रैमासिक'' यांच्या आठवणींना उजाळा देतानाच आज आपण दिल्लीत असल्यामुळे ''गौडब्राह्मण'' त्रैमासिक वाचनाचा आस्वाद घेता येत नसल्याची खंत व्यक्त केली व अंक आपल्याला नियमितपणे पाठवण्यात यावे, असे मनोगत व्यक्त केले. पसायदान व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर उपस्थित ज्ञातिबांधवांसाठी प्रीति भोजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

काही सुखद घटनांचा परामर्ष घेत असताना काही दु:खद घटना देखील मनाला चटका लावून जातात. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, उद्योजिका, ज्ञाती संस्थांच्या पदाधिकारी आणि गौड ब्राह्मण सभेच्या माजी विश्वस्त श्रीमती सुशीलाबाई दत्तात्रय सामंत यांचे दिनांक २४ फेब्रुवारी २०१९ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी त्यांच्या माहिम येथील निवासस्थानी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनाने ज्ञाती संस्थांचा आधारवडच गेला आहे. प्रसन्न व्यक्तिमत्वाच्या सुशीलाबाईंनी स्वत: पुरता कधीच विचार केला नाही. सतत दुसऱ्यासाठी जगणं हेच त्यांच्या आयुष्याचे धेय्य होते. त्यांच्या जाण्याने गौड बाह्मण सभेचे अपरिमीत नुकसान झाले आहे.

कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी कार्यक्रमाची पूर्व तयारी दोन वर्षे आधीपासूनच सुरू झाली होती. त्यावेळी श्री. महादेव भास्कर सामंत ह्यांची संस्थेच्या चिटणीसपदी निवड झाली होती. त्यावेळी पासूनच महादेव सामंतानी स्वत: संस्थेच्या कामासाठी वाहून घेतले होते. निधी संकलन, कार्यक्रमाची आंखणी, स्मरणिका प्रकाशन ह्या सर्व कार्यक्रमांत ते आघाडीवर होते. हा कार्यक्रम अगदी भव्य-दिव्य व्हावा यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. ह्यातच दिनांक ७ फेब्रुवारी २०१९ रोजी संध्याकाळी कामाचा आढावा घेत असताना संस्थेचया कार्यालयातच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यामुळे संस्थेच्या कार्यकर्त्यांना शोक आवरणे कठीण झाले. समाज एका निष्ठावंत व निस्वार्थी कार्यकर्त्याला मुकला आहे. श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत व श्री. महादेव भास्कर सामंत जरी आज आपल्यात नसले तरी त्यांनी ज्ञातीसाठी केलेले कार्य सदैव स्मरणात राहणार आहे. ''गौड ब्राह्मण सभा' तसेच ज्ञातीच्या अन्य संस्था व समस्त ज्ञातीबांधवांतर्फे त्यांना विनम्र अभिवादन करून आम्ही त्यांना श्रद्धांजली अर्पण करतो.

संपादक
**उमाकांत गणपत महाजन**
**९६८९७८१७५०**



## स्वर्गीय एकनाथ केशव ठाकूर कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड :

गौड ब्राह्मण सभेतर्फे प्रकाशित केल्या जाणाऱ्या ''**गौड ब्राह्मण**'' या त्रैमासिकाच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे (२०१४) औचित्य साधून, ४४ वर्षे कर्करोगाशी एकाकी झुंज देत ज्यांनी आपल्या समाजबांधवांना बरेच काही दिले. स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर ह्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ सभेने ''**स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर स्म. कर्करोग वैद्यकीयउपचार फंडा**'' ची स्थापना केली आहे. या मागची मूळ. संकल्पना सभेचे खजिनदार श्री. मनीष गुरुदास दाभोलकर यांची आहे. त्यांनी १०० लाख रुपये निधी संकलन करण्याची घोषणा केली व त्यांनी स्वत: या फंडाकरिता रु. १ लाख (एक लाख) रु. देणगी देऊन शुभारंभ केला होता. ह्या योजनेला दानशूरांकडून उत्तम प्रतिसाद लाभला आहे. **रु. २५,०००/– किंवा त्याहू अधिक देणगी देणाऱ्या दानशूरांची नावे कायम स्वरूपात त्रैमासिकात छापली जातात.** या फंडाच्या रकमेच्या व्याजातून ज्ञातीतील कर्करोग्रस्तांना औषधोपचारासाठी सभेतर्फे आर्थिक मदत दिली जाते. ज्ञातीतील दानशूरांनी ह्या उपक्रमासाठी सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

**श्री. गोविंद महादेवराव सामंत (वाद्रे)** ₹ ३,००,०००/–
(वडील स्व. महादेवराव विठ्ठल सामंत व आई स्व. सौ.सीताबाई महादेव सामंत आणि बंधू स्व. भास्कर महादेवराव सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. दीपक दिगंबर सामंत (अंधेरी पूर्व)** ₹ २,००,०००/–
(मामा स्व.श्री. रवींद्र चिंतामण प्रभु देसाई ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. रवींद्र बाबुराव तिरोडकर (अंधेरी)** ₹ १,००,००१/–

**डॉ. जगदीश देवराव सामंत** ₹ १,००,०००/–

**श्री. शशी प्रभू** ₹ १,००,०००/–

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर** ₹ १,००,०००/–

**श्री. जयंत रामचंद्र पाटील** ₹ १,००,०००/–

**श्री. विकास (राजाभाऊ) पाटकर आणि कुटुंबीय** ₹ १,००,०००/–

**श्री. यशवंत मोरेश्वर देवस्थळी** ₹ १,००,०००/–

**श्री. मोरेश्वर राजाराम आजगावकर** ₹ १,००,०००/–

**श्रीमती सुषमा सुरेश महाजन** ₹ १,००,०००/–
ह्यांच्या पति स्व. सुरेश राजाराम महाजन मातोश्री स्व. लीला अनंत खानोलकर, पिताश्री स्व. अनंत परशुराम खानोलकर स्मरणार्थ

**श्रीमती जयश्री तुकाराम वालावलकर** ₹ १,००,०००/–
(स्व. तुकाराम कान्होबा वालावलकर यांचे स्मरणार्थ)

**श्रीमती सुचेता एस. देसाई** (डोंबीवली) ₹ १,००,०००/–
(आई स्व. स्नेहलता बाबाजी सरनाईक वडिल कै. बाबाजी राजाराम सरनाईक यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. चंद्रकांत वसंतराव नाईक** ₹ ७५,०००/–
**(स्व. श्यामला चंद्रकांत नाईक स्मरणार्थ वैद्यकिय उपचार)**

**श्री. शिवराम वासुदेव तेंडोलकर व सौ. विजया शिवराम तेंडोलकर** ₹ ७५,०००/

**श्रीमती पल्लवी कृष्णाजी प्रभू** ₹ ७५,०००/
(वडील स्व. आत्माराम वासुदेव परुळेकर, आई स्व. निर्मला आत्माराम परुळेकर व भाऊ स्व. मधुसूदन आत्माराम परुळेकर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीनिवास श्रीकृष्ण प्रभू केळूसकर** ₹ ५१,०००/–

**श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर**
(ज्येष्ठ बंधू स्व. श्री. जयंत दत्तात्रय सामंत कोपराडकर रा. वसई यांच्या स्मरणार्थ) ₹ ५१,०००/–

**M.V. Samant Charitable Trust** ₹ ५०,००१/–

**श्री. मोहन बी. सामंत** ₹ ५०,०००/–

**श्री. विजय सदानंद वालावलकर** ₹ ५०,०००/–

**सौ. प्रिती महेश ठाकूर दादर** ₹ ५०,०००/–
(आई स्व.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**डॉ. रवींद्र बाबुराव तिरोडकर** ₹ ५०,०००/–
(आजोबा (मातामह) स्व. श्री. राजाराम रघुनाथ कोंडकर सामंत, मालवण ह्यांचे स्मरणार्थ)

**श्री. अशोक सुधाकर दाभोलकर** (मातोश्री स्व. प्रेमा सुधाकर दाभोलकर ह्यांचे स्मरणार्थ) ₹ ५०,०००/–

**श्री. दीपक पद्माकर परूळेकर** (सांताक्रुझ) ₹ ५०,०००/–
**(आई स्व. छाया पद्माकर परुळेकर हिचे स्मरणार्थ)**

**श्रीमती उषा शामराव पाटील** ₹ ५०,०००/–
**(स्व. शामराव शांताराम पाटील स्मरणार्थ)**

**श्रीमती स्नैहलता गजानन तिरोडकर** ₹ ५०,०००/–
(स्व. गजानन (दादा) तिरोडकर यांचे स्मरणार्थ)


**श्रीमती कुमुद जनार्दन तेंडूलकर (नेरूळ)** ₹ ४०,०००/–
(स्व. जनार्दन भास्कर तेंडूलकर यांच्या स्मरणार्थ),

**श्री. रोहित रजनीकांत नाईक** ₹ ४०,०००/–

**श्री. मधुसुदन शंकर तिरोडकर ठाणे** ₹३०,०००/–
(स्व.शंकर आपाजी खानोलकर व स्व. उमाबाई (मावशी), वडील स्व. शंकर वामन तिरोडकर ह्यांच्या स्मरणार्थ)
स्व. विठ्ठल व स्व. रुक्मिणी दाभोलकर ह्यांच्या स्मरणार्थ

# स्वरभूषण पद्मश्री कै. वसंत देसाई

जन्मः १९१२ मृत्यूः १९७५



वसंत देसाई

वसंत देसाई हे नाव उच्चारताच माझ्या डोळ्यांसमोर उभं रहातं ते १९६२ सालचं भारतचीन युद्ध. मी माध्यमिक शाळेत असताना 'जिंकू किंवा मरू' या गीतानं आमची शाळा दुमदुमून गेली होती. सगळे वर्ग मैदानावर जमून एका सूरात एका तालात आम्ही हे गीत गात असू. त्यावेळी खरोखरच आमच्यात स्फुरण चढत असे. आमच्या मुठी आपोआपच आवळल्या जात असत. केवळ शाळाच नव्हे तर आसमंतात या गीताने देशभावना पेटून उठली होती. तसेच आमच्या पाठ्यपुस्तकातील कवितांना उत्तम चाली लावून त्या कवितांशी आमचं जवळचं सख्य निर्माण केलं ते देखील वसंत देसाई यांनी. साठ सत्तर वर्षांपूर्वी आमच्या पिढीला आजच्यासारखं केव्हांही मनात आलं की, उठून सिनेमाला जाता येत नसे. घरच्यांची मनधरणी करून मोठ्या मिनतवारीने दर दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीत एक, फार तर दोन सिनेमा पहाणं हीच आमची सुट्टीची बेगमी असे. त्यामुळे शाळा कॉलेज जीवनात चित्रपट फारच कमी पाहिलेले असले तरी गाणी मात्र कुठून न कुठून आमच्या कानावर सतत पडत. सरस चालीमुळे ती पटकन पाठ होत आणि लगेचच मनात ठसे ते सिनेमा आणि कलाकरांची नावे. त्यामुळे झनक झनक पायल बाजे, गुंज उठी शहनाई, दो ऑखे बारह हाथ, संपूर्ण रामायण, रामराज्य, आशीर्वाद अशा अनेक गाण्यांनी आम्हाला वेड लावलं होतं. आमच्या हृदयापर्यंत संगीत घेऊन जाणारे संगीतकार होते वसंत देसाई. माझा व माझ्या मित्रमंडळीचा या थोर संगीतकाराशी परिचय होता तो फक्त त्यांच्या संगीतातून, पुस्तकातून व चित्ररंग, फिल्मफेअर या मासिकांतून.

आज वसंत देसाई यांच्याबद्दल लेखन करण्याची संधी मला लाभली ती गौड ब्राह्मण त्रैमासिकामुळे हे मी माझं भाग्य समजते. कोकणच्या या महान कलाकाराच्या गत आयुष्याची वाटचाल पुढील पिढीपर्यंत नेण्याचा एक प्रयत्न आम्ही करीत आहोत.

स्वरभूषण पद्मश्री वसंतराव देसाई हे मूळचे कोकणातील सोनवडे गावचे. कृष्णाजी आणि मुक्ता देसाई यांचे १९१२ साली जन्मलेले वसंतराव हे शेंडेफळ. मुक्ताबाई म्हणजे मालवणचे आबा भास्कर परूळेकर यांची एकुलती एक कन्या. आबा भास्कर यांना मालवणच्या सिंधुदूर्ग किल्ल्यावर कीर्तन करण्याची सनद छत्रपतींकडून मिळाली होती. याच घराण्यातील एक पुरूष अर्नाळा किल्ल्याचा किल्लेदार होता. त्याच्या नावावरूनच वसईच्या एका भागाला 'भास्कर आळी' असे नाव देण्यात आले. मुक्ताबाईवर कीर्तनाचे संस्कार झालेले होते. त्यांना भक्तिगीते, स्तोत्रे व अभंग गाण्याचा छंद होता. हाच मातृ वारसा वसंताला लाभला. त्यामुळे कीर्तन ऐकणे, अभंग गाणे, दशावतारी संगीत याची गोडी वसंताला लागली. त्याचबरोबर प्रभात समयी कानावर पडणारे कोंबड्याचे आरवणे, गुरांच्या गळ्यातील घुंगुरांचे आवाज, वाऱ्याची शीतल सळसळ अशा ध्वनींनी वसंताला संगीताची ओढ लावली. आईवडील आणि तीन काका एकत्र नांदत असल्याने त्यांचं घर म्हणजे गोकुळ होतं.

वसंताचे नरहरी काका (तात्या) हे कोल्हापुरात व्यापार उद्योग करीत असल्याने बड्या मंडळींशी चांगले संबंध राखून होते. गोड आवाजाची देणगी लाभलेल्या छोट्या वसंतावर अत्यंत शिस्तीने आणि चोखपणे व्यवहार कारणाऱ्या तात्यांची अधिक माया होती. म्हणूनच फायनल पर्यंतचं शिक्षण झाल्यावर तात्यांनी वसंताला कोल्हापूरला आणलं व स्वतःच्या घरी ठेवून नवीनच सुरू झालेल्या मित्राच्या, व्ही. शांताराम यांच्या 'प्रभात स्टुडिओ' कंपनीत नोकरीस लावलं. कंपनीत पडेल ते काम वसंत करीत असे. त्याचा गोड गळा लक्षात घेऊन तात्यांनी त्यांचा मित्र, बाबा देवल यांच्या संगीत क्लासमध्ये वसंताचं नाव नोंदवलं.

पण एका खेडवळ पोरास शिकवण्यास देवल गुरूजी तितकेसे उत्सुक नाहीत हे लक्षात येताच एकलव्या प्रमाणेच वसंताने कंपनीत काम करता करता बरेच बारकावे आत्मसात केले. 'अयोध्येचा राजा' हा पहिला बोलपट शांतारामबापूंनी काढला त्यावेळी वसंताने कलाकारांच्या

## कर्करोगग्रस्त वैद्यकीय उपचार फंड

**स्व. सत्यभामा आत्माराम सामंत** ₹ २८.०००/-
आणि स्व. आत्माराम रावजी सामंत
उर्फ भाऊ नमस्कार ह्यांचे स्मरणार्थ

**श्री. बाबाजी राजाराम सरनाईक**
**(स्व. सौ. स्नेहलता बाबाजी सरनाईक**
ह्यांच्या स्मरणार्थ) ₹ २५,००१/-

**सरिता गवाणकर** ₹ २५,०००/-

**श्री. संजीव ए. दाभोलकर** ₹ २५,०००/-
(स्व.सौ.कुमुद व स्व.एकनाथ दाभोलकर स्मरणार्थ)

**श्री. दिगंबर पुजारी,** नरसोबावाडी ₹ २५,०००/-

**श्री. अरुण सुधाकर गोसावी** ₹ २५,०००.-
(स्व. कमलताई सुधाकर गोसावी स्मरणार्थ)

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/-
(पीताश्री कै. श्री. अरविंद रामकृष्ण सामंत नेवाळकर स्मरणार्थ)

**श्रीमती सुनीता शांताराम तेंडोलकर** ₹ २५,०००/-
(स्व. शांताराम दत्तात्रय तेंडोलकर यांच्या स्मरणार्थ)

**श्री. नरेंद्र श्री. श्रीमल (चैनई)** ₹ २५,०००/-

**नोबेल फार्मा** ₹ २५,०००/-

**लूपीन फार्मा-पी. ए. पाटील** ₹ २५,०००/-

**सौ. संध्या सुरेश प्रभू** ₹ २५,०००/-
(स्व. वत्सला भि. प्रभू हिच्या स्मरणार्थ)

**सौ. लता परमानंद देसाई**
**व श्री. परमानंद देसाई** ₹ २५,०००/-

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/-

**श्री. व्ही. जी. सामंत** ₹ २५,०००/-

**श्री. राधाकृष्ण शांताराम पाटील** ₹ २५,०००/-
(स्व. सौ. वसुंधरा राधाकृष्ण पाटील
ह्यांच्या स्मरणार्थ)

**डॉ. सरिता श्रीपाद झारापकर** ₹ २५,०००/-
(स्व.प्राचार्य श्रीपाद रामचंद्र झारापकर
ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती मोहना मोहन वालावलकर** ₹ २५,०००/-
**श्री. मोहन रमाकांत वालावलकर**

**Ms. SANKET LOGTESYS PVT. LTD.** ₹ २५,०००/-

**सौ. सुषमा सुभाष सामंत (अंधेरी)** ₹ २५,०००/-

**श्री. आप्पाजी गजानन सामंत-** ₹ २५,०००/-
(चुलते स्व. बाळकृष्ण आप्पाजी सामंत स्मरणार्थ)

**डॉ. सुरेश भास्कर आजगांवकर** ₹ २५,०००/-

**सौ. अनिता नीतीन गायतोंडे** ₹ २५,०००/-

**श्री. सुधाकर लक्ष्मण धोंड, (सायन)** ₹ २५,०००/-
(पत्नी कै.सौ. सुधा सुधाकर धोंड हिच्या स्मरणार्थ)

**श्री. निहार खानोलकर** ₹ २५,०००/

**सौ. श्रद्धा राहूल सामंत व**
**सौ. वीणा विष्णू प्रभू** ₹ २५,०००/-

**डॉ. जयश्री नाईक नातू** ₹ २५,०००/-

**सौ. शिल्पा जयंत रामदास व**
**श्री. विष्णू व्ही प्रभु** ₹ २५,०००/-

**श्रीमती सरोज खानोलकर (यंग)** ₹ २५,०००/-

**श्री. विद्याधर प्रभाकर वैद्य** ₹ २५,०००/-

**श्रीमती शुभांगी तुकाराम सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. तुकाराम वामन सामंत ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. अविनाश रघुनाथ सामंत (माहिम)** ₹ २५,०००/-
(स्व. सुनंदा रघुनाथ सामंत व
स्व. रघुनाथ राजाराम सामंत यांच्या स्मरणार्थ)

**श्रीमती सरिता रमाकांत गवाणकर (गोरेगाव)** ₹ २५,०००/-

**श्रीमती पुष्पा दत्तात्रय दाभोळकर (गिरगाव)** ₹ २५,०००/-

**श्री. विठ्ठल आत्माराम सामंत** ₹ २५,०००/-
**(स्व.सौ. शुभा विठ्ठल सामंत हिसे स्मरणार्थ)**

**श्रीमती नीला भालचंद्र नाईक** ₹ २५,०००/-

**श्री. अरविंद आत्माराम खानोलकर** ₹ २५,०००/-

**श्री. राजेंद्र भिकाजी सामंत व सौ. वर्षा राजेंद्र सामंत** ₹ २५,०००/-
(स्व. विजया बा. सामंत, स्व. भिकाजी ल. सामंत, स्व. हरिभाई व. सामंत, स्व. सुधा द. ठाकूर व स्व. दत्तात्रय व. ठाकूर ह्यांच्या स्मरणार्थ)

**श्री. सदानंद राजाराम सामंत** ₹ २५,०००/-


With Best Compliments From

TLD.
ESTD : 1916

**P. S. Samant**
Cell : 99250 83201

**M/s. Tukaram Laxman Desai**

**Wholesellers & Retailers-Metal Wares**

93-95, Kansara Chawl,
Kalbadevi Road, Mumbai - 400 002.
Tel. : (Shop) : 2242 8634
(Resi.) : 2388 5217.



**वसंत देसाई व्ही. शांताराम सोबत**

लहरी सांभाळण्यापासूनच्या प्रत्येक कठीण प्रसंगी शांतारामबापूंना त्यांचा उजवा हात बनून सहकार्य केलं. उत्कृष्ट कामगिरीमुळे वसंत देसाई हा मुलगा लवकरच प्रभात स्टुडिओच्या गळ्यातील ताईत बनला. त्याने सिनेमा बनविण्याचे सर्व बारकावे निरीक्षणाने आत्मसात केले. एका खानदानी घराण्यात जन्म घेऊनही केवळ प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर अनेकवेळा मानहानीचे प्रसंग कणखरपणे सहन केले. म्हणूनच जगाला एक प्रतिभाशाली, हरहुन्नरी संगीतकार लाभला. १९३० साली प्रभातच्या 'खूनी खंजर' या मूक चित्रपटात अभिनेता म्हणून काम करण्याचा अनुभवही गाठीशी बांधला.

१९३३ साली प्रभात कंपनी पुण्यास आली आणि वसंताचेही पुण्यात आगमन झालं. पुण्यात तात्यांनी रहाण्याची व्यवस्था टोपीवाले, नारायण गोविंद राजिवडेकर यांचेकडे केली. रत्नपारखी शांतारामबापूंनी वसंताचे गुण ओळखून त्याच्यावर अनेक जबाबदाऱ्या सोपवण्यास सुरूवात केली. त्यामुळे बऱ्याच कामांमध्ये वसंताचा मुक्त संचार सुरू झाला आणि सिनेमा बनविण्यातील बारीकसारीक बाबी वसंताला समजू लागल्या. दिवसेंदिवस त्याच्या ज्ञानात भर पडू लागली. गोविंदराव टेंबे, केशवराव भोळे, मास्टर कृष्णराव अशा दिग्गज संगीतकारांबरोबर काम करण्याचा अनुभव मिळू लागला. ओळखी वाढू लागल्या. वसंताच्या अथक परिश्रमामुळे प्रभात कंपनीच्या सिनेमांचे संगीत दर्जेदार होऊ लागलं. पण त्याचं नाव मात्र कुठेही झळकत नव्हतं. एक नोकर म्हणूनच काम करणं चालू होतं.

असा एक तपाचा काळ लोटल्यावर वसंतराव १९३९ मध्ये मुंबईस आले. शिवाजी पार्कवरील 'परिमल' वास्तूत ते राहू लागले. त्यांच्या संगीताच्या जादूने परिमल निवास नादमय झाला. परिमल निवासात लोकांची वर्दळ वाढू लागली. संगीताला चाली लावण्याच्या अलौकिक गुणामुळे अनेक जुने व नवशिके गायक त्यांच्याकडे येऊ लागले. वसंतरावांनी कोणालाही कधीही नाराज केलं नाही. जो येईल त्याला आपल्यात सामावून घेतलं आणि संगीताच्या क्षेत्रात जे ज्ञान देता येईल ते मुक्त हस्ते दिलं. जे गाणं हाती घेतलं त्या गाण्याला जीव ओतून चाल लावली. म्हणूनच होनाजी बाळा यांची भूपाळी ही 'अमर भूपाळी' ठरली. याच दरम्याने शांतारामबापू प्रभात सोडून मुंबईस आले आणि 'राजकमल पिक्चर्सच्या' उभारणीतून पुन्हा एकदा बापू व वसंतराव ही जोडी एकत्रपणे कामास सज्ज झाली. १९४३ मध्ये 'शकुंतला' हा चित्रपट पडद्यावर आला आणि प्रथमच पडद्यावर संगीत दिग्दर्शक म्हणून वसंतरावांचं नाव झळकलं. चित्रपट सृष्टीत बापूंचं नाव या सिनेमाने जेवढं मोठं केलं तेवढंच एक दर्जेदार संगीतकार म्हणून वसंतरावांचं नावही मोठं केलं. १९५९ साली प्रकाशित झालेल्या 'गुँज उठी शहनाई' चित्रपटात उस्ताद बिस्मिल्ला खॉं यांच्या शहनाईचा केलेला प्रयोग प्रेक्षकांना चकीत करून गेला. शहनाई खऱ्या अर्थाने अमर झाली. सिनेमातल्या उसन्या आवाजाची सुरूवातही स्वतःच्या आवाजाने केली. वसंतरावांनी सिने संगीतात नवं नवे प्रयोग केले.

१९५३ साली 'झाशीची राणी' या चित्रपटाच्या निमित्ताने वसंतराव इंग्लंडला जाऊन आले. यानंतर मात्र त्यांनी मागे वळून पाहिलं नाही. जवळ जवळ पन्नास मराठी, हिंदी सिनेमांना त्यांनी संगीत दिलं. झनक झनक पायल बाजे (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त), दो आँखे बारह हाथ, दो फूल, गूँज ऊठी शहनाई, संपूर्ण रामायण, रामराज्य, यादे, गुड्डी,

# BIRLA AYURVEDA

THERAPY OF KERALA

**Wellness & Treatment Centre**

**Franchies : Dr. Manjiree Sadekar**

Birla Ayurveda is one of the well known trusted
Brand and serving its customers since past 19 years.

*Exclusive offer on the occasion of*

***Newly Opened Centare***

## Now at GB Road, Thane (W)

Invites You to avail a 50% OFF on Kerala Panchakarma therapies
**FREE Doctor Consultation**

## TREATMENT FOR

- **Joint Pain**
- **Spondylosis**
- **Diabetes**
- **Obesity**
- **Indigestion**
- **Frozen shoulder**
- **Backache**
- **Hair fall & Skin disease**
- **Asthma**
- **Migraine**
- **Acidity**
- **Slip disc**
- **Diabetic neuropathy**
- **Arthritis**

409, Puranik Capitol, Opp. Hypercity Mall,
Kasarwadavali G.B. Road, Thane West - 400607.

**Time : 8.00 am (Monday Closed)**
**Contact No. 25970340, 8928285860**
birlaayurvedagbroad@yahoo.com

आशीर्वाद असे कितीतरी सिनेमा त्याकाळी 'हीट' झाले ते केवळ वसंतरावांचं संगीत होतं म्हणूनच. लतादीदी, आशाताई, रफी, मन्ना डे, गीता दत्त यांच्या सुरेल गळ्यातून साकार झालेली कित्येक गाणी आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत याचं श्रेय वसंतरावांच्या संगीत दिग्दर्शनाला जातं. आशीर्वाद चित्रपटातील 'रेलगाडी रेलगाडी' व 'नीना की नानी की नाव चली ' या बालगीतांनी वसंतरावांच्या कल्पक व धाडसी वृत्तीला भरभरून दाद मिळाली. गुड्डी चित्रपटाने त्यांच्या मानाच्या तुऱ्यात एक सोनेरी पान खोवलं. 'श्यामची आई' चित्रपट राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित झाला. बाप माझा ब्रह्मचारी, धन्य ते संताजी धनाजी, इये मराठीचिये नगरी, स्वयंवर झाले सीतेचे अशा अनेक चित्रपटांनी वसंतरावांना 'संगीताचा बादशहा'हा मान मिळवून दिला. चित्रपट पूर्ण झाल्यावरच त्याला साजेशी चाल वसंतराव लावीत असत. परछाई, सेहरा, अचानक, गीत गाया पत्थरोंने आणि इंग्रजी 'मासूम' हे वसंतरावांचे पार्श्वसंगीत क्षेत्रात विशेष ठसा उमटवणारे काही चित्रपट! त्यांच्या मृत्यूनंतर प्रकाशित झालेला व लोकप्रिय ठरलेला मराठी चित्रपट म्हणजे 'तूच माझी राणी.' केवळ चित्रपट नाही तर बहुरूपी हा खेळ असा, अवघी दुमदुमली पंढरी, जयजय गौरीशंकर देव दीनाघरी धावला अशा अनेक नाटकांना संगीत देऊन वसंतरावांनी नाट्यसंगीतातही स्वतःचा ठसा उमटवला. मराठी संगीत नाटकांना खऱ्या अर्थाने सुगीचा काळ आला तो संगीतकार वसंतरावांच्या प्रभावी आविष्कारामुळे.

मी वर सुरूवातीलाच समर गीताचा उल्लेख केलाय. देशभक्तीपर गीतांनाही वसंतरावांनी आपल्या संगीताने सजवलं. पं. नेहरूंनी त्यांना सर्वांना एका सुरात एका तालात गाता येतील अशी देशभक्तीपर गीते तयार करण्याची प्रेमळ सूचना दिली. त्यानुसार त्यावेळचे मुख्यमंत्री मधुकरराव चौधरी आणि वसंत देसाई यांनी एक नवं शिवधनुष्य पेलण्याचा विचार केला. 'एकसूर एक ताल' ह्या उपक्रमासाठी वसंतराव महाराष्ट्रभर फिरले. जिल्ह्याजिल्ह्यात फिरून संगीत शिक्षक आणि विद्यार्थी यांची जिल्हावार शिबिरे घेतली. ध्वनिमुद्रिका काढून शाळा शाळांना दिल्या. 'मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा',



**महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्य मंत्री माननीय यशवंतराव चव्हाण सोबत वसंत देसाई**

'बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो!' अशी देशभक्तीपर गीते माझ्या पिढीतील शालेय मुलांच्या मनावर कोरली. महाराष्ट्रात एकत्वाची भावना निर्माण केली. पण महाराष्ट्र सरकारने देऊ केलेले मानधन त्यांनी घेतलं नाही. मिळालेला प्रवासभत्ता काटकसरीने वापरून उरलेली रक्कम सरकारला परत केली.

'घनःश्याम सुंदरा श्रीधरा, अरूणोदय झाला' , 'साने गुरूजीच्या 'आई माझा गुरू, आई माझा कल्पतरू' किंवा 'नीज नीज माझ्या बाळा, करू नको चिंता' अशी अनेक गाणी आमच्या पिढीला मुखोद्गत झाली होती ती केवळ अविस्मरणीय संगीताचा साज त्या गीतांना लाभला होता म्हणूनच. वसंतरावांनी संगीत दिग्दर्शन केलेली सर्व गाणी द्यायची म्हटली तर एक लांबलचक यादी तयार होईल. कारण त्यांच्या गाण्यांमध्ये चौकट नव्हती. भूपाळी, भावगीत, भक्तिगीत, भारूड, देशभक्तीपर गीत, समरगीत अशा विविध प्रकारच्या मराठी व हिंदी गीतांना त्यांनी संगीताने सजवलंय.

कोल्हापूरचे प्रसिद्ध अल्लादिया खां यांचेकडे प्रारंभीचे शिक्षण घेतलं. त्यांच्या मृत्यूनंतर इनायत खां यांचेकडे शिक्षण घेतलं. महाराष्ट्रात भावगीत गायन प्रकार इनायत खां यांचा मुलगा मंझी खां यांनी आणला. पण वसंतरावांनी त्यांच्या कार्यक्रमांना जातीने हजेरी लावून आधुनिक पध्दतीच्या गीतांना शास्त्रीय बैठक दिली. ती कशी गावी याचा बारकाईने अभ्यास केला.

## स्व. लक्ष्मीबाई दि. खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष :



लक्ष्मीबाई खानोलकर

आपल्या ज्ञातीतील एक दानशूर महिला स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर (गोरेगाव) यांनी आपल्या मृत्यूपत्राद्वारे गोरेगाव (पूर्व) येथील नीलाश्री सोसायटीतील आपली सदनिका गौड ब्राह्मण सभेला दान केली आहे. त्यांनी आपल्या मृत्यूपत्रात व्यक्त केलेल्या इच्छेनुसार गौड ब्राह्मण सभेने त्यांच्या व त्यांच्या पतीच्या स्मृतिप्रीत्यर्थ ''**स्व. लक्ष्मीबाईदिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर सभागृह कोष**'' फंडाची स्थापना केली असून भविष्यात या फंडाच्या रकमेतून भव्य सभागृह उभारण्यात येणार आहे. जागा, जमीनजुमला, निवासी घर दान करणारे किंवा **रु.५,००,०००/–(रुपये पाच लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांचे फोटो त्यांची नावे सभागृहात लावण्यात येतील तसेच **रु. १,००,०००/– (रुपये एक लाख)** व त्याहून अधिक रक्कम देणाऱ्या दात्यांची नावे देखील सभागृहात लावण्यात येतील. या सर्व दानशूरांची नावे कायम स्वरूपात संस्थेच्या गौड ब्राह्मण त्रैमासिकात छापण्यात येतील. ज्ञातीतील दानशूरांनी संस्थेच्या ह्या प्रकल्पाला सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती.

---

## आतापर्यंत संस्थेला प्राप्त झालेल्या देणग यांचा तपशील

- **स्व. लक्ष्मीबाईदिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर यांनी सभेला दान स्वरूपात दिलेल्या सदनिकेचे बाजारमूल्य** — रु. ९२,००,०००.००
- **स्व. लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर व स्व. दिनकर खानोलकर ह्यांजकडून** — रु. ५,४३,७९८.५९
- **सौ. वंदना गुरुदास दाभोलकर, गोरेगाव (पूर्व) (वडील स्व. सदाशिव नारायण प्रभुपाटकर (मूळगाव–हुंबरट, ता. कणकवली) ह्यांच्या स्मृतिप्रत्यर्थ** — रु. १,०५,००१.००
- **श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर व सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर, वसई (वडील स्व. दत्तात्रय त्रिंबक सामंत कोपराडकर आणि आई स्व. वत्सला दत्तात्रय सामंत कोपराडकर ह्यांच्या स्मरणार्थ.** — रु. १,०२,०००.००

---

### अधिक माहितीसाठी संपर्क :

| **उमाकांत महाजन** | **मनीष दाभोलकर** | **रत्नाकर तेंडोलकर** | **सुभाष वाघ** |
|---|---|---|---|
| (कार्याध्यक्ष) | (खजिनदार) | (सरचिटणीस) | चिटणीस |
| ९६८९७८१७५० | ९८२१२५८०४७ | ९८१९१५९१४६ | ९९२०७५२४७९ |

---

**आपली देणगी ''गौड ब्राह्मण सभा'' या नावाने आपण पुढील खात्यात जमा करू शकता**

| Bank Name | Branch | Account No. | IFSC Code No. |
|---|---|---|---|
| SARASWAT CO-OP. BANK LTD. | GIRGAON | 002200100027556 | SRCB0000002 |

NEFT **किंवा खात्यात पैसे जमा केल्यास कृपया संस्थेस**
e-mail- gbs.girgaon@gmail.com **अथवा दूध्वनी (०२२) २३८५००१५ अथवा पत्राद्वारे कळवावे.**

वसंतरावांनी गणगोत गोळा केले ते केवळ उपजत असलेल्या स्वभाव गुणंमुळे. एकतर प्रसन्न चेहऱ्याचे, साधेपणाला मानणारे, संगीताबाबत नवीन प्रयोग करणारे, कठीणात कठीण काम हाती घेऊन पोटतिडकीने ते यशस्वी करणारे, दरवाजावर येणाऱ्या प्रत्येकाला आपलं ज्ञान भरभरून देणारे, नवशिक्यांना प्रोत्साहन देणारे आणि मुख्य म्हणजे संगीतासाठी जीवन समर्पित करणारे ही त्यांची खरी ओळख. शालेय मुलांपासून प्रत्येक वयाला शोभेशी चाल गाण्याला लावून प्रत्येकाच्या मनात, हृदयात स्थान मिळवणारे. आजही त्यांनी संगीतबद्ध केलेली गाणीच अंताक्षरी स्पर्धेत अनेकांच्या तोंडी आढळतात. भारत-चीन युद्धातील समरगीते, महात्माजींच्या जन्मशताब्दीला गांधीदर्शन देणारी गीते, १९७४ सालची शिवराज्या-भिषेकाची गीते ही लोकप्रिय होण्यामागे वसंतरावांच्या संगीताचा साज होता. कसलेला गायकच शब्दांना अर्थ प्राप्त करून देणाऱ्या सूरांचे सामर्थ्य काय असते हे वसंतरावांची गाणी ऐकताच समजून जातो. उत्तर प्रदेशातून आलेल्या डागर बंधूंकडून त्यांनी त्यांची गायकी शिकून घेतली तर मास्टर कृष्णराव यांचेकडून अभंग गाण्याचं शिक्षण घेतलं होतं.

अशा या संगीताच्या जादूगाराचे तोंडभरून कौतुक करताना निर्भीड पत्रकार, आचार्य अत्रे यांनी आपल्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मवृत्तात लिहिले आहे.

'श्यामची आई' या साने गुरूजींच्या कथेचा वाटा चित्रपटाच्या यशात जेवढा महत्वाचा आहे तेवढाच महत्वाचा वाटा ती भावोनोत्कट गाणी प्रत्येकाच्या हृदयापर्यंत पोहचविणाऱ्या वसंतरावांच्या संगीत दिग्दर्शनात आहे. रजतपटावर नामावली पहाताना साने गुरूजींचं चित्र दिसतं तेव्हां गाईच्या हंबरण्याचे पार्श्वसंगीत टाकून वसंतरावांनी साने गुरूजींच्या महन्मंगल जीवनाचा सारांशच स्वरबध्द केला आहे. या चित्रपटातील 'चिंघी'चे गाणे हे सर्वात महत्वाचे गाणे.त्यातील सुरूवातीच्या दोन ओळी गुरूजींच्या आहेत व बाकी गाणे आचार्यांनी लिहिलेले आहे. वसंतरावांनी या गाण्याला जी चाल लावली आहे, तिने महाराष्ट्रीय स्त्री गीतांची परंपरा इतकी उज्वल केली आहे की, त्या गाण्यातल्या काव्याच्या पोटात संगीत लुप्त



**जिंकू किंवा मरून ह्या गीताला संगीत लावतांना वसंत देसाई व भारताचे पंतप्रधान माननीय पं. जवाहरलाल तेहरू**

होते.हाच संगीत दिग्दर्शकाचा खरा विजय आहे.म्हणूनच हा चित्रपट अमर झाला. राष्ट्रपती सुवर्ण पारितोषिकाचा अखिल भारतात एकमेव मानकरी ठरलेल्या 'श्यामची आई' बोलपटात वसंतरावांनी स्वतःच्या आईचेच चित्र अमर केले आहे. या यशात अर्धा हिस्सा वसंतराव देसाई यांचा आहे असे म्हणत मुक्तकंठाने वसंतरावांचे यशोगान गायिले आहे.

**वसंतरावांचे गुणगौरव**

१. १९६७ मध्ये राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन् यांचेकडून 'पद्मश्री' हा बहुमान प्राप्त झाला.

२. १९६७ साली महाराष्ट्र सरकारकडून गौरव करण्यात आला.

३. एकसूर एक ताल या कल्पनेचे वसंतराव प्रवर्तक ठरले.

४. 'श्यामची आई' या चित्रपटास राष्ट्रपती सुवर्ण पदक लाभले.

वसंतरावांनी अविवाहित राहून आपले आयुष्य संगीताला समर्पित केले होते. श्रीमान् मोतीराम शेठ देसाई टोपीवाले यांच्याशी झालेल्या घनिष्ठ मैत्रीमुळे काही दिवस वसंतराव मोतीराम यांचे घरीच रहात होते. मोतीरामशेठ प्रकृती अस्वास्थ्यामुळे पेडर रोडवरील केंब्रीज हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. ज्या दिवशी शेठ हॉस्पिटलमधून घरी आले त्याच दिवशी, २२ डिसेंबर

With Best Compliments From

NSB PROPERTIES

B-8 Bageshri, Shankar Ghanekar Marg, Prabhadevi, Mumbai - 400 025.
Phones : 24463599, 24441360 Fax : 24448192
E-mail : nsbproperties@yahoo.com



NSB Properties is a constituent of the 40 years old NSB Group having interest in the fields of Training, Finance and Real Estate Development. NSB Properties is committed to develop landmark projects on a firm bedrock of Construction Quality and Customer Delight.

NSB Properties has completed several residential projects (including redevelopment) in Mumbai (Vile Parle, Goregaon, Dadar), Pune and Goa.

Do get in touch with us if you wish to re-develop your property.

१९७५ रोजी वसंतराव लिफ्टमध्ये चेंगरल्याची धक्कादायक बातमी आली. मोतीरामजींचा मुलगा, विकास यांनी वसंतरावांना वाचविण्यासाठी जीवाचा आटापिटा केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. मोतीरामजींचे घर एकदम ओकेबोके झाले.

''१९७६ साल काही मी पहाणार नाही, माझे आता थोडेच दिवस राहिलेत'' असं वसंतराव बोलता बोलता बोलून जात. यावरून त्यांना मरणाची कल्पना आली होती असे मोतीरामशेठ यांच्या बोलण्यातून कळले होते. एवढंच नव्हे तर मोठे बंधू गावी आजारी होते .त्यांना बघण्यासाठी गावी जाण्याची उत्कट इच्छा असूनही केवळ हातात दिवस कमी आहेत. घेतलेली कामे पूर्ण व्हायला हवीत असे म्हणत वसंतराव गावी गेले नाहीत. यावरून कामाला वसंतराव देव मानत होते हे लक्षात येतं.त्यांनी आयुष्यभर संगीत देवतेची प्रामाणिकपणे पूजा केली. पिळदार शरीर, रूंद छाती आणि अंतरंगातील संगीताने मोहरलेली मुद्रा. त्यामुळे त्यांच्या खऱ्या वयाची कोणालाच कल्पना येत नसे. असा हा आनंदयात्री अज्ञाताच्या प्रवासाला निघाला तेव्हां अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला.''राष्ट्रप्रेम शिकवणारा महापुरूष, संत वृत्तीने जगणारा एक किमयागार'' अशा शब्दात अर्थमंत्री मधुकरराव चौधरी, राज्यमंत्री प्रभाकर कुंटे या बड्या मंडळींनी त्यांना श्रध्दांजली वाहिली होती.

वसंतारावांची आठवण म्हणून एक ताल एक सूर हा कार्यक्रम प्रजासत्ताक दिनी प्रत्येक जिल्ह्यात सांघिकरित्या घेण्यात येईल, त्यांचे अपुरे कार्य पुढे चालवण्यात येईल असे मधुकररावांनी जाहीर केले होते. त्यांच्या जीवनावर चित्रपट काढणे, चरित्र व आठवणी प्रसिद्ध करणे , त्यांची गाणी नोटेशन्ससह प्रसिद्ध करणे यासाठी अनेक समित्या नेमण्यात आल्या होत्या. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी ''वसंतरावांचं संगीत लाभलेला वीस कलमी कार्यक्रम म्हणजे गीता असून संगीताच्या माध्यमातून एका महत्वाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाला वसंतरावांनी चालना दिली आहे'' या शब्दांत त्यांना निरोप दिला होता.

असे हे कालाक्षेत्रातील कोकणचे रत्न. त्यांना कुडाळ देशकर गौड ब्राह्मण समाज तर्फे मानाचा मुजरा !

**सौ. गीता परूळेकर,** बोरिवली
मो. : ९१७२३२५०३१

स्थापना : १८९७

**गौड ब्राह्मण सभा**

**गिरगाव, मुंबई - ४०० ००४.**

**(नोंदणी क्र. ए ८३२ मुंबई)**

**** संस्थेचे पदाधिकारी ****

**(सन २०१८ - २०१९)**

***अध्यक्ष***

**डॉ. विलास रामकृष्ण देसाई**

***उपाध्यक्ष***

**श्री. देवदत्त आत्माराम खानोलकर**
**श्री. सुधाकर सखाराम पाटकर**

***विश्वस्त***

**प्रा. जगदीश साबाजी वालावलकर**
**श्री. नरसिंह नारायण पंतवालावलकर**
**श्री. अच्युत वामन तेंडुलकर**

***कार्यकारी मंडळ***

**(सन २०१८-१९)**

***कार्याध्यक्ष***

**श्री. उमाकांत गणपत महाजन**

***चिटणीस***

**श्री. सुभाष दत्तात्रय वाघ**

***सर चिटणीस***

**श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर**

***खजिनदार***

**श्री. मनीष गुरुदास दाभोलकर**

***कार्यकारी मंडळ सभासद***

**श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक, श्री. मधुकर दयानंद सामंत, श्री. जगजीवन श्रीकांत प्रभु, श्री. प्रमोद वसंत देसाई, श्री. सतीश गजानन सामंत, श्री. योगेश मोहन खानोलकर, श्री. अनिकेत रवींद्र वालावलकर, वीणा विश्वनाथ दाभोलकर**

*With Best Compliments From*

# M/s Gromotech Agrochem Pvt Ltd

E-40, MIDC, Islampur




# Shri Anang Babaji Mainkar

Vrindavan, Nakshatra Park,
Kolhapur.

# झारापकर उद्योग समूहाचे शिल्पकार के. आर. झारापकर

जन्म : १९०२ मृत्यू : २४.०१.१९८५



के. आर. झारापकर

**सदर लेख हा ''गौड ब्राह्मण'' च्या ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर २०१८ च्या अंकात प्रकाशित झाला होता परंतु काही मुद्रण दोषामुळे सदर लेख आम्ही पुन्हा प्रकाशित करीत आहोत**

**-संपादक उमाकांत महाजन.**

झारापकर उद्योग समुहाचे प्रमुख श्री. कान्होबा रामचंद्र झारापकर ह्यांचा जन्म झाराप कोकणात शिक्षण पूर्ण करून पोटापाण्यासाठी आप्पासाहेबांनी मुंबईत वार्ड इन्स्पेक्टर, व्हॅक्सिनेटर इत्यादी विविध पदांवर काम केले. त्यानंतर त्यांची पुण्याच्या दैनिक सकाळमध्ये नियुक्ती झाली. याच काळात राष्ट्रीयत्वाचे स्वदेशीचे वारे वाहत होते. नोकरीच्या गुलामगिरीपेक्षा १९३३ साली त्यांनी आपले धाकटे बंधु काशिनाथराव ह्यांच्या सहकार्याने झारापकर टेलरिंग कॉलेजची स्थापना पुण्यामध्ये केली. पुण्याच्या यशामुळे आत्मविश्वास वाढला व त्यामुळे हाच व्यवसाय मुंबईसारख्या महानगरीत टेलरिंग व्यवसायाचे विविध अंगानी विकास करण्याचे नियोजन केले. १९३८ साली मुंबईत आल्यावर इंग्लड, जर्मनीमधून आयात करावी लागणारी शिवणयंत्रे भावाच्या मदतीने देशी बनावटीची करण्यास (झारापकर शिवणयंत्र) सुरुवात केली. तसेच 'झारापकर' नावाचे मासिकही बरेच वर्षे चालु होते. आपली गिऱ्हाइके मध्यम वर्गीय असल्याने सुलभ हप्ता योजना सुरू केली व ही योजना यशस्वी पणे चालवली. पुढे वार्धक्यामुळे चिरंजीव वसंतराव व कर्तबगार सून यांच्यावर उद्योगाची धुरा सोपवली.

सुधा मधुकर जोशी व डॉ. उषा एस्. पाटील ह्या त्यांच्या आम्ही मुली. आपल्या व्यवसायाप्रमाणे आपल्या मुलांवर पुतण्यावर त्यांच्यावर होणाऱ्या संस्कारावरही त्यांचे लक्ष्य होते. सकारात्मक दृष्टीकोन हा एक परिस असून त्यांच्या स्पर्शाने हर क्षण सोन्याचा करता येतो असं जीवनाचं तत्व मानणारे आप्पासाहेब अत्यंत आत्विश्वासू होते. खंडाळा ह्या ठिकाणी बंगला बांधला. व खंडाळेकरांचे झारापकर झाले. गावातल्या अडीअडचणीनां त्यांचा सदैव मदतीचा हात होता.

आमच्या घरासमोर सिंदीबन उघडे मैदान होते त्यांत झोपड्या बांधुन राहत असताना प्रचंड पावसामुळे हवालदिल झालेल्या लोकांना आपल्या बंगल्यात दोन दिवस पाहुणचार त्यांनी केला. तसेच दिवाळीत हल्लीच्या दृष्टीने प्रचंड फराळ गावकऱ्यांना वाटणे. गांधी वधानतर झारापकर ब्राह्मण समजुन त्यांचा घर जाळण्याचा प्रयत्न होता. त्या घटनेलाही निर्धाराने भावाच्या साहाय्याने त्यांनी तोंड दिले. गावकरी त्यावेळीही व अद्यापपर्यंत झारापकरांचेच राहिले.

झारापकर उद्योग समूहाचे शिल्पकार कान्होबा रामचंद्र झारापकर व त्याचे धाकटे बंधू काशिनाथराव हे रामलक्ष्मणच होते. व्यवसाय, जनहित, इतरांना करता येइल असा मदतीचा हात, सर्वांबद्दल आपुलकी हीच त्यांची शिदोरी

**सुधा मधुकर जोशी**
विरार.


*With Best Compliments From*

**UNIQUE**

**Unique Photo Offset Services**

**Ashok Nerkar**

132, Adhyaru Industrial Estate,
Sun Mill Compound, Lower Parel,
Mumbai 400 013.
☎ : 2496 4632, 2496 4633, 5660 6881
Fax : 5660 6882

*With Best Compliments From*

**Tel. : 022 4255 1414**
**Telefax : 2624 8589/65**

# MAHARASHTRA SOCIETIES WELFARE ASSOCIATION

(Regd. No. : Mumbai/1054/2002/GBBSD)

**-: H. O. :-**

A-2/302, Laram Centre, Opp. Railway Station,
Near Bus Depot, Andheri (W), Mumbai - 400 058

E-mail : mswa.hsg@gmail.com
Website : www.mswahousing.org
www.deemedconveyance.com

# जगी सर्वसुखी असा कोण आहे ।
# विचारी मना तूच शोधूनि पाहे ।।

– कु. सुनिता सुभाष प्रभू मुणगेकर

**शिर्डीच्या साई मंदिराच्या शतक महोत्सवा निमित्त लायन्स क्लब सकल्बने श्री. साईबाबांची शिकवण ह्या विषयावर स्पर्धेचे आयोजन केले होते. त्या स्पर्धेत आपल्या ज्ञातीतील कु. रागिणी सुभाष प्रभू, मुणगेकर व कु. सुनिता सुभाष प्रभू-मुणगेकर यांनी प्रथम व द्वितीयक्रमांकाचे पारितोषिक पटकावले ते लेख आम्ही आपल्या माहितीसाठी प्रसिद्ध करीत आहोत. – संपादक**



सुनिता प्रभू मुणगेकर

२१ व्या शतकात मागील दहा ते वीस वर्षात आपण खूप झपाट्याने प्रगती केली आहे. भ्रमणध्वनी दूरचित्रवाणी इत्यादी संपर्क माध्यमांमुळे आज जगाच्या कानाकोपऱ्यात घडलेली घटना देखील आपल्याला काही क्षणात समजते व त्यावर आपण प्रतिक्रियाही सहज देतो दळणवळणाच्या या सर्व प्रगत साधनांमुळे आपण एकमेकांच्या कितीही जवळ येत असलो व स्वत:ला खूप प्रगत समजत असलो तरी आज या जगात सर्वसुखी असा कोण मनुष्य आहे ही विचार करण्यासारखी बाब आहे.

आज आपण एकाकी जीवन जगत आहोत. प्रत्येक मनुष्य अशाश्वत जीवनशैलीमुळे चिंतेने ग्रासला गेला आहे. या सर्वातूनच मनुष्य शांती शोधण्यासाठी देवाधर्माच्या मार्गाला लागतो. १९१८ साली म्हणजेच १०० वर्षांपूर्वी ज्या समर्थ श्री. सद्गुरु साईबाबांनी समाधी घेतली ते साईबाबा प्रत्यक्षात या भूतलावर असताना सुद्धा व त्यांच्या समाधीनंतर सुद्धा अशा भरकटलेल्या, त्रासलेल्या व दु:खी-कष्टी जीवांना हे जीवन आनंदाने व सुखाने जगण्याचे मार्गदर्शन करीत आहेत.

बाबांनी या भूतलावरील वास्तव्यात सर्व प्राणीमात्रांना आपल्या स्वत:च्या कृतीतून योग्य ते ज्ञान व मार्गदर्शन दिलेच परंतु **'जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी'** इतक्या आत्मविश्वासाने समाधी नंतरही आपल्या भक्तांना अभयदान देत समस्त सृष्टीच्या कल्याणाचे कार्य केले आहे.

श्री साईबाबांच्या समाधीनंतर त्यांच्याच इच्छेने कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर यांनी बाबांचे अत्यंत मंगलमय व भावपूर्ण चरित्र आपणा समोर ठेवले आहे. आज केवळ हे सच्चरित्र वाचून देखील एखादा मनुष्य आपल्या जीवनाचे कल्याण साधू शकतो यात शंकाच नाही.

महाराज स्वत:ला कधीही परमेश्वर म्हणवून घेत नसत ते स्वत:ला भगवंताचा प्रिय भक्त म्हणवून घेत असत ऋषीचे कूळ व नदीचे मूळ पाहू नये असे म्हणतात तद्वत अशा श्रेष्ठ संतांचे जात, धर्म, जन्म या गोष्टी न पाहता त्यांनी आपल्या आचरणातून जी शिकवण दिली ती महत्त्वाची समजून तिचे अनुकरण करावे.

बाबा मशिदीत बसून नाना साहेबा सारख्या किंवा त्यांच्याच समवयस्कर ज्ञानी मंडळींबरोबर वेदांतावर पुष्कळ चर्चा करीत. याउलट शामा, काशिराम, तात्या कोते पाटील, अशा मंडळींना फारसे तत्वज्ञान न सांगता 'तुका म्हणे चाखून सांगे । मज अनुभव आहे अंगे ।।' असे अनुभवाचे खडे बोल आपल्या आचरणातून सुनावीत. तेच हे ''साईचरित्र''.

साईचरित्राची सुरुवातच मुळी गहू दळणे व ते स्वत: बाबांनी दळणे यातून अनेक प्रकारच्या शिकवणी मिळतात, बोध होतो. बाबा हे स्वत: स्वावलंबी होते. त्यांच्या एका हाकेसरशी अनेक भक्त पुढे आले असते परंतु बाबांनी स्वत: गहू दळून एक प्रकारे प्रत्येक व्यक्तीने स्वावलंबी जीवन जगावे ही शिकवण दिली. त्याचबरोबर मशीद व परिसर स्वत: झाडून नेहमी स्वच्छ ठेवण्यातून बाबांनी भक्तांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.

साईचरित्राच्या द्वितीय अध्यायात बाबांनी लेखकाला 'हेमाडपंत' हे नाव दिले. याचा अर्थ बाबांना हेमाडपंतांचा इतिहास तसेच त्यांची हुशारी धर्मशास्त्र ग्रंथ लिहिण्याची शैली या गोष्टी माहिती होत्या. परंतु याच बरोबर विनाकारण वितंडवाद घालणाऱ्या व्यक्तीला हेमाडपंत म्हणतात हे ही बाबांनी दाखवून दिले. यातून आपणांस हा बोध होतो की, एखाद्या व्यक्तीकडे कितीही विद्वत्ता, बुद्धिमत्ता असली तरी उगाच एखाद्या विषयाला धरून आपलेच म्हणणे खरे असा अट्टाहास धरू नये.


पाचव्या अध्यायात बाबा मातीच्या घागरीने स्वत: पाणी

With Best Compliments From



**Founder - Late Shri Dattatreya Ramchandra Samant**

# M/s. SHRIRAM WAREHOUSING AGENCY



14/16, Arches, Below Mahalaxmi Bridge,
Race Course Side, Dr. E. Moses Road,
Mahalaxmi, Mumbai - 400 034.
**Phone : 23549584**

वाहून आणत असा उल्लेख आहे. बाबांनी कुंभाराकडून पक्के भाजलेले घडे मागीतले असते तर त्याने ते आनंदाने दिले असते. परंतु अर्धे भाजलेले मडके घेण्याचा बाबांचा निग्रह असायचा व ते ही बाबा कुंभाराला पूर्ण रक्कम देऊन विकत घेत असत या कृतीतून बाबांनी एक शिकवण आपल्या भक्तांना दिली की कोणाकडूनही कोणतीही वस्तू त्याचा योग्य तो मोबदला दिल्याशिवाय घेऊ नये.

तसेच त्या अर्ध्या कच्च्या घड्यांच्या मातीचा व पाण्याचा योग्य तो वापर करून सुंदर अशी बाग तयार करून बाबांनी '**वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे**' हे संत तुकारामांचे वचन सार्थ ठरविले.

याचबरोबर वाण्याने तेल देण्यास नकार दिल्यामुळे बाबांनी तीव्र इच्छा शक्तीने पाण्याने पणत्या ठेवून दिपावली हा अज्ञान व अंधकार नाहीसा करून ज्ञानाचा प्रकाश उजळवणारा सण आहे ही शिकवण जगाला दिली.

सहाव्या अध्यायांत बाबांनी आग्रहाने गावांत उरूस व जत्रा भरवून घेऊन सर्व ग्रामस्थांनी भक्ती भावाने एकत्र नांदावे व वर्षातून एकदा तरी सामान्य, कष्टकरी जनतेने या निमित्ताने आनंद उत्सव साजरा करावा असा पायंडा पाडला. बाबांचे हे बहुउद्देशीय ध्येय आजही डोळ्यासमोर ठेऊन गावांत हे वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

सातव्या अध्यायांत बाबा हिंदू होते की यवन यावरील चर्चा विस्तृतपणे मांडताना बाबा सर्वधर्मसमभाव याची शिकवण देत रामनवमीचा सण जितक्या आनंदाने साजरा करायचे तितक्याच उत्साहाने मोहरमचा सणही सर्वांना साजरा करायला लावायचे याचे सुंदर वर्णन आढळते. बाबा एखाद्या संन्याशाचा जितका मान राखायचे तितकाच एखाद्या फकिराचाही बहुमान करायचे मानवता हाच सर्वांत मोठा धर्म हे केवळ बोलून नव्हे तर आपल्या आचरणातून बाबांनी दाखवून दिले.

बाबा योग पूर्णत: जाणत होते. परंतु त्यांनी त्याचे अवडंबर माजवले नाही. बाबांनी आपल्या योग सामर्थ्याने आतडी बाहेर काढून झाडावर ठेवली याचाच अर्थ असा की योग साधनेतील सर्वोच्च प्रयोग बाबा करू शकत होते. योग साधनेतून बाबांनी बरेच रोगी बरे केले भागोजी सारख्या रक्तपितीने आजारी असलेल्या व्यक्तीला जवळ केले व रोगी माणसांवर दया दाखववावी हा संदेश दिला.

बाबांना सर्व देवांबद्दल आदर होता हे त्यांनी पंढरपूरच्या विठ्ठलाचे भजन गाऊन नानासाहेब चांदोरकरांना दाखवून दिले.

बाबांनी माधुकरीचे महात्म्य आपल्या आचरणातून भक्तांना पटवून दिले. बाबांना प्रेमाने कोणीही काहीही खावयास द्यायचे ठरविले तर ते त्यांना अंतर्ज्ञानाने कळे व ती वस्तू त्याच्या कडून आठवणीने मागून घेत असत. असा अनुभव अनेक भक्तांना आला. यावरून असा बोध होतो की गुरूंना द्यायची वस्तू छोटी किंवा मोठी नसून त्या मागील समर्पण भाव महत्त्वाचा असतो.

सत्य संकल्पाचा दाता नारायण । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ या उक्तीप्रमाणे शिर्डीस राहण्याचा संकल्प करून जे लोक येतील त्यांचे मनोरथ बाबा पूर्ण करत व ज्याला राहावयाचे नसेल त्याला त्वरित परवानगीही देत.

तेराव्या अध्यायात बाबा सांगतात की सुखात असताना मनुष्य देवाची आठवण करत नाही. पण तोच मनुष्य दु:ख आल्याबरोबर भगवंताचा धावा करतो. म्हणूनच कुंती श्रीकृष्णाकडे नेहमी दु:ख मागायची. यावरून बाबांचा महाभारताविषयीचा सखोल अभ्यास कळून येतो.

नवव्या अध्यायांत बाबांनी पाच प्रकारच्या पापांचे वर्णन केले आहे. यावरुन बाबांचा शास्त्रा विषयीचा अभ्यास दिसून येतो या पापांवर उपाय म्हणून त्यांनी सामान्य मनुष्यांना चित्तशुद्धी हे प्रायश्चित्त सांगितले असून त्यामुळे शुद्ध मनाची प्राप्ती होऊन मोक्ष सहज मिळतो. श्वान व दिलेले अन्न बाबा स्वत:स प्राप्त झाले असे सांगतात. यावरुन भूतमात्रांवर दया करावी ही शिकवण बाबांनी जगाला दिली आहे. आपल्या ताटातील अन्न दुसऱ्याला खाऊ घालणे म्हणजे ते भगवंतास मिळते ही खूप मोठी शिकवण बाबांनी दिली. बाराव्या अध्यायात मुळे यांच्यासारखे विद्वान व ज्योतिर्विद्येत प्रवीण असलेले गृहस्थ श्रीमंत बापूसाहेब मुट्टींसोबत आले असताना बाबांचा हात पाहून भविष्य सांगावे ही मनीषा बाळगुन बसले होते. परंतु कर्मसिद्धांतावर विश्वास असणारे, बाबा भविष्यावर मुळीच विश्वास ठेवत नसत. स्वत:च्या आचरणातून त्यांनी हाच बोध दिला.

पंधराव्या अध्यायात दासगणू अंगरखा, उपरणे व फेटा असा किर्तनकाराचा पोशाख करून बाबांची आज्ञा मागण्यास गेले असता बाबांनी तो पोशाख उतरवायला सांगून केवळ धोतर परिधान करून कीर्तन करण्यास सांगितले. यावरून कीर्तनकाराने स्वत:च्या अंगी विरक्ती बाळगावी व बाह्य उपाधीस न भुलता ज्ञान व भक्तीने युक्तीच्या चार गोष्टी कथन कराव्यात असा बोध दिला.

*With Best Compliments From*



**CUSTOM HOUSE AGENT NO. 11-221**

# S. N. Mainkar & Sons

Founded by :

**Late Shri S. N. Mainkar**
**in 1947**

**Office :**
D-901, Raikar Chamber,
Near Nilkanth Garden
& Jain Temple,
Govandi Station Road,
Govandi (E), Mumbai-88.

**Regd. Office :**
2nd Floor, "VTDEOCON"
Calicut Street, Mumbai 400 001.

Tel. : 65093227 / 65094408
Email : datsan@vsnl.com / prashant@snmainkar.com
Mobile : D. R. Mainkar - 9820078791

सोळाव्या अध्यायात ब्रह्म जाणण्यासाठी आलेल्या एका दांभिक गृहस्थास बाबांनी आपल्या कृतीतून पंचप्राण, दशंद्रिये, अहंकार, बुद्धी व मन समर्पण करेल त्यालाच ब्रह्मज्ञान प्राप्त होते असा बोध दिला. खिशांत नोटांचे पुडके असताना बाबांना काही वेळेसाठी केवळ पाच रुपये देण्याची वृत्ति नसणाऱ्या मनुष्याला लोभ त्यागल्याशिवाय ब्रह्मज्ञान कधीच मिळू शकत नाही हे पटवून दिले.

एकोणिसाव्या अध्यायात एकत्र जमून निंदा करण्याचा जो मानवी स्वभाव आहे त्यावर बाबांनी प्रहार केला आहे. **अधिकार तैसा देऊ उपदेश ! आहे माझे त्यास तैसे देऊ ।।** या उक्तीप्रमाणे कोणास ज्ञानेश्वरी, कोणास अध्यात्म रामायण, कोणास हरिपाठ तर कोणास गुरुचरित्रावलोकन, कोणास विष्णुसहस्त्रनाम असा बोध दिला आहे.

चोविसाव्या अध्यायात थट्टा विनोदातून योग्य ती शिकवण देताना बाबांनी चरित्र लेखकाला फुटाण्यांचे निमित्त करून श्रीगुरुंना वा भगवंताला अर्पण केल्या शिवाय कोणत्याही गोष्टीचा उपभोग घेऊ नये अशी शिकवण दिली. हे सांगताना सुदामचरित्राचा आधार घेतला आहे. शब्द, स्पर्श, रुप, रस व गंध हे पाचही विषय सेवन करताना भगवंताला अर्पण करावे हा बोध दिला आहे.

याच अध्यायात बाबांनी कौजलगी नावाच्या मावशींचे व आण्णांचे विनोद पद्धतीने भांडण लावून जीवनात स्त्री-पुरुषात कामभावनेपेक्षा मातृवात्सल्य श्रेष्ठ असते असा टोला मारला आहे.

एकोणतिसाव्या अध्यांयात तेंडूलकर नामक दाम्पत्याचा मुलगा बाबू ज्योतिष शास्त्रावर विश्वास ठेऊन परीक्षेला बसण्यास तयार नसताना त्याला पास होण्याचे आश्वासन दिले व पत्रिका गुंडाळून ठेवण्यास म्हणजे ज्योतिषशास्त्राच्या फार आहारी न जाण्याचा सल्ला दिला. याच अध्यायात, खालेरास असणाऱ्या कॅप्टन हाटेंनी अर्पण केलेल्या वालपापडीच्या शेंगांचा नैवेद्य ग्रहण करून मनापासून अर्पिलेल्या गोष्टी कितीही दूरवर असलेल्या भगवंतापर्यंत पोहोचतातच हे दाखवून दिले.

बत्तीसाव्या अध्यायात वणजाऱ्याच्या गोष्टीतून आपल्या गुरुंवर अंधपणे विश्वास ठेवणाऱ्यास गुरु नेमहीच रस्ता दाखवितात हा बोध दिला. तसेच उपवासाचा मनोग्रह करून आलेल्या गोखलेबाईंना पुरणपोळी खायला लावून परमार्थ हा इंद्रियांना कष्ट देऊन, उपास करून साध्य करू नये असा सर्व भक्तांना अगदी सहज सोप्या शब्दांतून बोध दिला.

चौतिसाव्या अध्यायातील उदीचे चमत्कार पाहिल्यानंतर बाबांवर पूर्ण श्रद्धा आणि विश्वास ठेवणाऱ्या भक्तांना सर्पदंश, पोटशूळ इत्यादी अनेक संकटांपासून केवळ उदी देऊन रक्षण केले आहे हे लक्षात येते. मनुष्याचा जन्म मातीतून होतो व अंत झाल्यावर मातीच होते हा बोध बाबांनी भक्तांना दिला आहे.

चाळीसाव्या अध्यायात लेखकाच्या घरी छबीरुप जाऊन, मनापासून बोलविलेल्या भक्तांच्या घरी बाबा कुठल्या ना कुठल्या प्रकारे आजही पोहोचतात हा अनुभव येतो.

सत्तेचाळीसाव्या अध्यायात सर्प आणि बेडूक यांची पूर्वाश्रमीची कहाणी सांगताना, दूसऱ्याचे धन लोभ व कपटाने हिसकावून घेतल्यास पूनर्जन्म घेऊन वैर फेडावे लागते ही देखील शिकवण दिली.

एकोणपन्नासाव्या अध्यायात मनुष्य देवाच्या दारी जाऊन देखील ऐहिक गोष्टींमध्ये कसा अडकतो हे हरी कान्होबांच्या चपलेच्या कथेतून शिकवतानाची भगवंताकडे गेल्यावर पूर्णपणे त्यातच लीन व्हावे ही शिकवण दिली.

साई सच्चरित्र हे आजच्या २१ व्या शतकांत देखील सामान्य जनांना अनेक प्रकारचे बोध देत आहे. बावन अध्यायी साईचरित्रातून प्रत्येक व्यक्तीला जीवनाच्या कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर योग्य ते मार्गदर्शन व चुकीच्या मार्गावरुन जाणाऱ्या व्यक्तीला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य आजही साईचरित्र करीत आहे. पूर्वीच्या कृतयुगात दान दिल्याने, यज्ञ केल्याने, पूजन केल्याने जे पूण्य प्राप्त होत असे ते आजच्या कलियुगात केवळ नामस्मरणाने व संतचरित्राचे वाचन केल्याने सहज प्राप्त होते.

सद्गुरु श्री साईबाबांनी भक्तांना अभय देताना स्वत: सांगितले आहे की ज्या घरी या 'साईसत्चरित्राचा' पाठ केला जाईल तेथे मी स्वत: वास्तव्य करेन यावरून बाबांचे भक्ताविषयीचे प्रेम व वात्सल्य दिसून येते. आजही अनेक भक्तांना साईचरित्राच्या वाचनाने अनेक संकटांपासून मुक्ती मिळाल्याचा अनुभव येतो.

मनुष्य जन्माला येऊन मिळालेल्या पुण्याचा लाभ घेतानाच 'जो जे वांछिल तो ते लाहो' या श्री संत ज्ञानेश्वरांच्या उक्तीची साक्षात अनुभुती भक्तांनी साईचरित्राच्या वाचनाने, पठनाने व पारायणाने करून जन्माचे हित साधून घ्यावे. येणाऱ्या काळात आपल्या अनुभवांतून अधिकाधिक भक्तांना चरित्र वाचनाची आवड निर्माण व्हावी हीच सद्गुरु साईचरणी प्रार्थना!

❑ ❑ ❑

With Best Compliments From

# ANATEK SERVICES PVT. LTD.

8, Valmiki Apartment, C.S.T. Road,
Kalina, Mumbai 400 098.
Tel.: 2610 9608 / 4285, 2615 5475 / 76
Fax : 2610 4121
E-mail : anasales@rediffmail.com / anatek@vsnl.com

# स्वातंत्र्यवीर सावरकर एक झंझावात

विनायक दामोदर सावरकर म्हणजेच तात्याराव. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ मध्ये झाला. ते ९ वर्षाचे असतानाच त्यांचे मातृछत्र हरपले त्यामुळे त्यांना वाचनाचा छंद जडला. छोट्या हाताना जी पुस्तके उचलताही येत नसत असे घरातील जुने ग्रंथ, निबंधमाला इ. वाचन त्यांनी वयाच्या ८ व्या ९ व्या वर्षीच संपवले. अलौकीक बुद्धीमत्ता व तरतरीत व्यक्तीमत्व लाभलेले सावरकर शीघ्र कवी ही होते. भोळसर वडील बंधू गणेश उर्फ बाबाराव सावरकरांच्या पत्नी येसूवहिनी व बहीण माईशी ओव्या-उखाणे रचून ते भेंड्यांची चढाओढ लावीत. प्रेमळ व हुषार येसूवहिनींना तात्यांनी अक्षरओळख करून दिली. त्यांचे खेळही शूरता व्यक्त करणारेच असत. स्वत:च तारेचे धनुष्यबाण तयार करून नेमबाजीचा सराव छोटा विनायक करीत असे.

पुढे इंग्रजी शिक्षणासाठी त्यांना नाशिकला ठेवण्यात आले. त्याकाळी ब्रिटीशांची जुलमी राजवट होती चाफेकर बंधू फासावर गेले. त्यांच्या हौतात्म्यामुळे क्रांतिकारक हे मुलांचे आदर्श होते. आपली भारतमाता परकीयांच्या मगरमिठीतून केव्हा मुक्त होणार या एकाच विचाराच्या राष्ट्रप्रेमाने सर्व आयुष्य देशाला समर्पित करणाऱ्या बलशाही तरुणांना सावरकरांनी एकत्र केले. आणि दुर्गादेवीपुढे शपथ घेतली की 'स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा सेतू उभारून मारता मारता मरेतो मी झुंझेन' असे हे एक जहाल व्यक्तीमत्त्व होते.

१९०१ साली तात्यांचे लग्न झाले. (जव्हार संस्थानात मोठ्या अधिकारावर असलेल्या भाऊसाहेब चिपळूणकरांच्या मुलीशी) विनायकरावांच्या कॉलेजशिक्षणाचा सर्व भार भाऊसाहेबांनी उचलला व पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण सुरु झाले. तेव्हांच 'काळ' वृत्तपत्रकार शि. म. परांजपे/लोकमान्य टिळक यांच्याकडे जाणेयेणे सुरू झाले. टिळकांच्या प्रयत्नांनी स्कॉलरशिप मिळवून ते १९०६ मध्ये इंग्लंडला गेले. इंग्लंडला जाणाऱ्या हिंदू तरुणांची रहायची सोय म्हणून 'इंडिया हाऊस' मध्ये त्यांचा मुक्काम होता वयाच्या २२व्या वर्षी त्यांनी इटलीचा स्वातंत्र्यमंत्र द्रष्टा 'मॅझिनी याचे चरित्र' लिहिले. २४ व्या वर्षी १८५७ चे स्वातंत्र्यसमर हा ग्रंथ लिहिला. १८५७ च्या क्रांतिसमराला ५० वर्षे पूर्ण झाली म्हणून तात्यारावांनी लंडनच्या भारतभवनात एक मोठा समारंभ केला. सरकारला याचा सुगाव लागताच स्वातंत्र्य-समर या ग्रंथावर बंदी घालण्यात आली तरीही हा ग्रंथ इंग्रजीत भाषांतर करून हॉलंड व फ्रान्समध्ये छापला गेला. तात्यांचे एक सहकारी सेनापती बापट हे पॅरिसला बॉम्ब बनवायला शिकले तेव्हा इंडिया हाऊसमध्ये तात्यांनी बॉम्ब तयार करण्याचा उद्योगही सुरु केला. पिस्तुलांचा साठा केला. नाशिकला वडिलबंधूकडे (बाबारावांकडे) पुस्तकांच्या पार्सल मधून पिस्तुले पाठवली. अभिनव भारत संस्थेतून सशस्त्र क्रांतीचे शिक्षण देऊन त्यांनी क्रांतिकारक घडवले. विदेशी कपड्यांची होळी करून मनातील संताप सरकारला दाखवला म्हणून सरकारने त्यांना वकिलीची सनद नाकारली व अटक केली.

या सर्व पार्श्वभूमीवर अत्याचाराचा सूड म्हणून अनंत कान्हेरे याने नाशिकचा कलेक्टर जॅक्सनचा गोळ्या घालून खून केला. हिंदुस्थानच्या राज्यकारभाराची सर्व सूत्रे हलवणारा सर कर्झन वायली याला मदनलाल धिंग्राने ठार मारले. या सर्वामुळे सरकारने सावरकरांवर राजद्रोहाचा खटला भरून त्यांना काळ्या पाण्याची शिक्षा दिली. अंदमानात त्यांना तेलाच्या घाण्याला जुंपले, दोर वळण्याचे काम दिले, ज्या एका खोलीत अनेक कैद्यांना जेवण दिले जाई त्याच खोलीत सर्वांचे मलमूत्र विसर्जन चाले. कल्पनेनेही किळस यावा असे ब्रिटीशांनी त्यांचे हालहाल केले. तशाही स्थितीत त्यांनी तुरुंगातील कैद्यांची एकी केली व वेड्यांचे विशिष्ट आवाज करून संदेश पोचवण्याचे काम केले. तुरुंगातच त्यांनी 'कमला' नावाचे महाकाव्य लिहिले. बाबाराव सावरकर देखील तिथेच शिक्षा भोगत होते पण दोघा बंधूंची दृष्टीभेट नव्हती. सावरकर हे क्रांतिकारकांचा मेरूमणी होते त्यामुळे भारतातील लोक क्षुब्ध झाले. याचे सरकारवर दडपण आले तेव्हां १० वर्षानी शिक्षा कमी करून त्या दोघा बंधूना सरकारने सोडले परंतु अनेक बंधने घालून त्यांना रत्नागिरीला ठेवले. तिथे त्यांनी अस्पृश्योद्धाराचे महान कार्य केले. साक्षरता प्रसार, भाषाशुद्धी इ. अनेक उपक्रम केले हिंदू समाजाला लागलेली अंधश्रद्धेची कीड नष्ट करण्यासाठी अथक प्रयत्न केले. त्यांच्या वडिलांचे एक नावाजलेले वकील मित्र कोटी करीत की **''ज्याचा कर**

*With Best Compliments From*



**Founder - Late R. H. Samant**

# M/s. R. H. Samant & Sons Pvt. Ltd.

***Dealers of :***
*Industrial & Blasting Sand Glass & Foundry Grade Silica Sand, Cement, Minerals, Construction Chemicals.*

**Authorised Distributors of :**

**M/s. AMBUJA CEMENT LTD.**
**M/s. KRISHNA CONCHEM PRODUCTS PVT. LTD.**

D/4, Brick Bunder, Hay Bunder Road, Mumbai - 400 033.
Tel.: 2372 3778 , 2371 5196 ● Fax : 91-022-2375 6334
E-mail : rhsamant@rediffmail.com

**आपल्या पडत्या राष्ट्राला सावरतो तो म्हणजे सावरकर''.** पुढे १९३७ साली सरकारने भारताला प्रांतिक स्वराज्याचे अधिकार दिले त्यावेळेचे अर्थमंत्री बॅरिस्टर जमनादास मेहता यांच्या प्रयत्नाने सावरकर मुक्त झाले. त्यानंतर ते दादरला शिवाजी उद्यानाजवळ राहू लागले. त्यांनी तरुणांना 'लेखण्या सोडून बंदुका हातात घ्या' असा संदेश दिला. ते हिंदू महासभेचे व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. नंतर गांधी खून खटल्यात त्यांना गोवले त्यातूनही ते निर्दोष सुटले. वयाच्या २० व्या वर्षी त्यांनी 'स्वातंत्र्येचे स्त्रोत्र' ही कविता लिहिली. स्वातंत्र्य देवीला उच्चस्थानावर बसवून जागतिक वाङमयात समाविष्ट झालेले ते गीत म्हणजे

**जयो ऽ स्तुते श्री महन् मंगले । शिवास्पदे शुभदे ।**
**स्वतंत्रते भगवति । त्वामहं यशोयुतां वंदे ।।**

परंतु नंतर मदनलाल धिंग्रासारख्या शूर व त्यागी सहकाऱ्याची फाशी, वडिल बंधूना झालेली जन्मठेपेची अमानुष शिक्षा इ. अनेक गोष्टींनी ते व्यथित झाले व त्यांची प्रकृती ढासळली. तरीही अन्नपाणी औषधे वर्ज्य करून पोलिसांचा पाठलाग चुकवीत निरंजन पाल या आपल्या मित्राकडे ब्रायटनला ते गेले. एका संध्याकाळी संकटांचे ढग दिसत असतानाच ब्रायटनच्या सुंदर समुद्रकिनाऱ्यावर त्यांचे कवीमन उचंबळून आले. आपण परत मातृभूमीचे दर्शन घेऊ शकू की नाही? या विचाराने डोळ्यातून अश्रू वाहू लागले तेव्हां स्फुरलेले अजरामर गीत म्हणजे

**'ने मजसी ने परत मातृभूमीला**
**सागरा प्राण तळमळला'**

आणि अशी ही श्रेष्ठ दर्जाची कविता मराठी भाषेचे लेणे ठरली. प्रेतालाही संजीवन देणारे वक्तृत्व लाभलेला हा नेता २६ फेब्रुवारी रोजीच अनंतात विलीन झाला.

दोनवेळा जन्मठेपेची शिक्षा म्हणजे ५० वर्षे तुरुंगवास त्यांनी पत्करला. अशा या सावरकरांचे तैलचित्र संसदेत नको, ते काढून टाका म्हणणाऱ्या आजच्या नेत्यांना लाजा वाटल्या पाहिजेत. सावरकर नसते तर आज तेच नेते इंग्रजांचे बूट पुसत बसले असते.

**श्रीमती नीलिमा श. प्रभू**
बेळगाव
फोन : ८९७१९६१३६९

*With Best Compliments From*

**PHONDA GHAT PHARMACY**

**Honey ✦ Gulkand ✦ Bel-Amla Muramba**
**✦ Rose water ✦ Ayurvedic Medicines**



**PHONDAGHAT HONEY**






1-2, Shanti Building, Mogul Lane,
Mahim (West), Mumbai 400 016.
Ph.: 2432 8542 Mob.: 9820070545
E-mail : phondaghat_pharmacy@hotmail.com

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

२८, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, जे. एस्. रोड, गिरगांव मुंबई ४०० ००४.

**स्थापना : १९२९ (नोंदणी क्र. ६५० ऑफ १९२९ दि. ३०–०७–१९२९)**

E-mail : kdgb.society@gmail.com

## सुलभ कर्ज योजना

### ❖ तारणावरील कर्ज ❖

मागणीच्या दिवशीच कर्ज वितरण
तारण वस्तू : सोने-दागिने, संस्थेच्या मुदत ठेव पावत्या इ. वर (७५%) पोस्टाची बचत पत्रे / किसान विकास पत्रे यावर (९०%)
तारणावर कर्ज फक्त सोमवार आणि बुधवार दिले जाईल.

### ❖ कर्ज व्याजाचा प्रचलित दर ❖

जामीनकीवरील कर्ज दरसाल १०%
तारणावरील कर्ज दरसाल ९.५०%

### ❖ बचत ठेव ❖

**व्याजाचा दर :** द.सा.द.शे. ४%

### ❖ कर्ज मर्यादा ❖

तारणावरील कर्ज रु. ३.०० लाख, शिवाय
जामीनकीवरील कर्ज : उद्योजकांसाठी रु. २.५० लाख,
इतर सभासदांसाठी रु. २.०० लाख

### ❖ मुदत ठेव योजना ❖

ठेव मुदत : ६ ते १२ महिने - ५.००%
१३ ते २४ महिने - ५.५०%
२५ ते ३७ महिने - ६.५०%

**● कार्यकारी मंडळ सन २०१५–२० ●**

| | | | |
|---|---|---|---|
| **श्री. रजनिकांत वासुदेव प्रभु** | अध्यक्ष | **श्री. पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक** | सदस्य |
| **श्री. प्रफुल्ल जयवंत खानोलकर** | चिटणीस | **श्री. शैलेश शशीकांत सामंत** | सदस्य |
| **श्री. सुरेंद्रनाथ बाळकृष्ण ठाकूर** | सदस्य | **श्री. रत्नाकर प्रभाकर तेंडोलकर** | सदस्य |
| **सौ. अंजली अजित मातोंडकर** | सदस्या | **सौ. लता जयदीप सरनाईक** | सदस्या |
| **श्री. सतीश गजानन सामंत** | सहकार तज्ञ संचालक | **श्री. प्रभाकर बाळकृष्ण सामंत** | सहकार तज्ञ संचालक |

**साप्ताहिक सुट्टी : रविवार, सोम. ते शुक्र. स.८.३० ते ११.३० सायं. ४.०० ते ७.००**
**शनिवार अर्धा दिवस संध्याकाळी ४ ते ७ कार्यालय चालु राहिल.**

दूरध्वनी क्रमांक - मुख्य कार्यालय : २३८६ ०२९०
गोरेगाव कक्ष : २९२७ ५७७४ डोंबिवली कक्ष : ०२५१ २४५३८७६

**(ठेवी व कर्जासाठीच्या नियमांत वेळोवेळी आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील)**

**कृपया सभासदांनी आपले KYC अद्ययावत करावे.**

# पुस्तकांचा दरवळला वसंत (वसंत वाचनालय)

– निरूता भाटवडेकर



निरूता भाटवडेकर

शिवाजी पार्क, दादर म्हटले की काही स्थळे पटकन डोळ्यासमोर येतात. बालमोहन शाळा, आपल्या पोटाची भूक भागवणारे जिप्सी, प्रकाश, आस्वाद... श्रीशिवाजी मंदिर, सावरकर सभागृह ई. ह्या स्थळांमध्ये वाचकांची वाचनाची आवड जपणारे ''वसंत वाचनालय'' हे नाव आवर्जून घेतले पाहिजे. वसंतचे सर्वेसर्वा श्री. सावरकरकाकांशी माझे सूर २० वर्षापूर्वी वाचनामुळे जुळले, ते कायमचे... पुस्तके व वाचन ह्या विषयाच्या अनुषंगाने त्यांच्याशी अनौपचारिक गप्पा मारण्याचा योग नुकताच जुळून आला... ह्या गप्पांमधून वेगळेच काका समोर आले...

सावरकरकाकांचा जन्म ७ जानेवारी १९४० सालचा. कोकणातील खेड तालुक्यामधील सोनगाव हे त्याचं मूळ गाव. प्राथमिक शिक्षण सोनगावचेच. त्यांचे वडिल बंधू बाळाराव सावरकर हे स्वातंत्रवीरांचे स्वीय सचीव... ह्याच कारणास्तव त्यांचे घर वाळीत टाकले गेले.

पोटा-पाण्यासाठी काका मुंबईत आले. (१९५७ साली मे महिन्यात चिपळूण ते मुंबई हा प्रवास त्यांनी बैलगाडीतून केला !!!)

काकांना नेमक्या ह्या व्यवसायाची कल्पना कशी काय सुचली..? हा माझा प्रश्न. ते म्हणतात, खरं तर माझ्या पिढी पर्यंत त्यांच्या घरी कोणीच नोकरी केली नव्हती. मुंबईत आल्यावर खिशात पैसे नसल्याने त्यांनी महिना ४० रुपयावर एका बुक-स्टाल मध्ये नोकरी केली. आणि ह्याच नोकरीत त्यांना व्यवसायाची नवी संधी दिसली.

प्रत्यक्ष वाचनालय सुरू करायच्या आधी, त्यांनी जुनी शैक्षणिक पुस्तकं अर्ध्या किंमतीत विकण्याचा व्यवसाय सुरु केला. परंतु त्यात गुंतवणूक अधिक असल्याने त्यांनी ह्याच व्यवसायाला नवीन स्वरूप दिलं. त्याकाळी एकेका विषयावर अनेक लेखकांची गाईड्स निघायची.. जी घेणें प्रत्येकाला परवडायचं नाही. म्हणून त्यांनी चक्क गाईड्सचं वाचनालय चालू केलं शिवाजी पार्क मधील गडकरी चौकात, आता जिथे चायना ब्रीस्टो रेस्टारंट आहे. तिथे एका जुन्या कपाटापासून त्याचं वाचनालय चालू झालं... ह्या वाचनालयातून त्यांना पैसेही बरे मिळू लागले.

मग त्यांनी गाईड्स बरोबर काही पुस्तकही विकत घेतली. बाबुराव अर्नाळकरांच्या पुस्तकांवर वाचकांच्या उड्या पडायच्या. (काका २५ रुपये शेकडा ह्या दराने त्यांची पुस्तके घेत.) ह्यानंतर त्यांनी वाचकांच्या गरजा व स्वत: ची निरीक्षणशक्ती ह्या जोरावर वाचक व पुस्तकेही वाढवली. त्याकाळी र.वा.दिघे. ना.सी. फडके, वि.स. खांडेकर, पु.ल. देशपांडे ह्या प्रसिद्ध लेखकांची पुस्तके वाचनालयासाठी घेतली. सुरुवातीला ते सायकल वरून घरपोच पुस्तके द्यायचे. दादर, माहीम, बांद्रा ह्या विभागापर्यंत ते सायकलवरून सेवा देत. पण ह्या सेवेची मर्यादा यायला लागल्यावर ती बंद केली. पण ह्यामुळे त्यांच्यातील कळकळ लोकांपर्यंत पोचली व विश्वासही वाटू लागला.

आधीपासून दादर विभागातील बरेच मान्यवर त्यांचे सभासद आहेत किवा होते.. कै. श्रीकांत ठाकरे ह्यांचे कुटुंब, कै. सुधीर फडके, हंसा वाडकर, गजानन जहागिरदार, सुधीर जोशी, मनोहर जोशी सौ. रंजना जोगळेकर, रेखा कामत, माधव मनोहर...

सध्या वाचनालय असलेल्या जागेत वसंतकाकांनी दिनांक १७ जुलै १९५७ रोजी स्थलांतर केलं. ही जागा म्हणजे शिवाजी पार्क येथील दादासाहेब रेगे मार्गावर ब्राह्मण सहाय्यक संघाच्या समोर. तेथे हे वाचनालय गेली ६० वर्षे कुठच्याही सरकारी अनुदानाशिवाय, वैयक्तिक निधीशिवाय हे वाचनालय ८०० वाचकांची व १५० बालवाचकांची वाचनाची भूक भागवत आहे...

**व्यवसायातील ह्या ६० वर्षाच्या यशाचे गमक काय..? हा सर्वांनाच पडणारा प्रश्न...**

खरं 'वसंत'च्या नजीक दोन मोठी वाचनालये केवळ १०/१५ मिनिटाच्या अंतरावर आहेत. तरी देखील

## शहीदांना श्रद्धांजली

## शहीद

खुळेच आम्ही शहीद झालो, उगाच तुमच्यासाठी,
लाथाडून स्वातंत्र्य आपुले, लोचट तुम्ही जमाती.
अर्थ कळेना स्वातंत्र्याचा तुम्हांस इतकी वर्ष,
सरणावरही होता अमुच्या, चेहऱ्यावरती हर्ष
दिला तुम्हाला आम्ही तुमच्या हक्काचा हा श्वास,
होता क्षणी त्या तुमच्यावरती उगा आम्हां विश्वास
उगाच होता ज्वाळ, मनीं ती आग राग तो उगाच होता माथी
खुळेच आम्ही शहीद झालो, उगाच तुमच्यासाठी

आदर्शाचे पुतळे तुमचे, पुन्हा फिरंगी झाले
मनास आले पारतंत्र्य, मग काय आम्ही गायिले
स्थान देऊनी भ्रष्टचारा, स्वदेशास जाळले
आम्हां सर्वां नाममात्र मग, भिंतीवर टांगले
कशास दिधला लढा, जिवाचा, सहज हे विसरूनी जाती
खुळेच आम्ही शहीद झालो, उगाच तुमच्यासाठी

गुलाम झाला देश स्वदेशी, विकून ही संस्कृती
आपण घेतो गोड मानुनी, दुसऱ्याची विकृती
अपुल्या देशाचा अभिमानी, कोणंच कां ना दिसे
मानुनी परदेशा गुरूस्थानी, धन्य त्यातच तो असे
पुन्हाच करण्या लढा, सडा तो पाडू देहांचाही
खुळेच आम्ही कधीच नव्हतो, लढलो देशासाठी.

चिरनिद्रेत ही होते स्वप्न, स्वातंत्र्याचे नयनी
तुम्हांस होते सुख द्यायचे, आम्ही होतो सरणी
हार समजूनी फास घातला, भूषवी छाती गोळी
आम्हांस कि होती आई, अशा सुखी संसारी
घेऊ आम्ही शतजन्मेही, शहीद होण्यासाठी
खुळेच आम्ही मुळीच नव्हतो, लढलो देशासाठी

कवी : **केदार हरी परूळेकर**
मोबा.९८२१२७८७८२

## देवगड तालुक्यातील मुणगे येथील श्री देवी भगवती देवीचा जत्रोत्सव संपन्न



''धडकणाऱ्या हृदयाच्या प्रत्येक स्पंदनात भक्तीचा जागर असेल तर परमेश्वर आपल्याच सहवासात असल्याचा भास मनी निर्माण होत असतो. प्रत्येक संकटात परमेश्वराचा धावा करणारे आपले मन जेव्हा अंत:करणातून भक्तीची उपासना करू लागते, तेव्हा परमेश्वर आपल्या पाठीशी माऊलीसारखा उभा राहतो. ही माऊली संकटातून आपल्याला बाहेर काढतेच. शिवाय संकटाच्या त्या अनुभवातून जगण्याचा नवा अध्यायही देते. जीवसदृश प्रत्येक घटकाला संकटे आहेत. मात्र, संकटाच्या प्रत्येक पावलावर आपल्यासोबत परमेश्वराच्या रुपात माऊली नक्कीच उभी आहे. यासाठी मनी निखळ भक्ती व श्रद्धा हवी, अशीच परमेश्वररुपी माऊली देवगड तालुक्याच्या मुणगे गावात श्री भगवती देवीच्या रुपात आहे. या माऊलीचा वार्षिक जत्रोत्सव नववर्षाच्या सुरुवातीलाच म्हणजेच वीस जानेवारी ते चौवीस जानेवारी ह्या कालावधीत संपन्न झाला.

जत्रोत्सवात देवीची पूजाअर्चा, दर्शन, ओट्या भरणे, नवस बोलणे व फेडणे सायंकाळी गोंधळ, गायन, संगीत भजने, प्रवचन व पुराणवाचन, देवीची आरती, पालखी मिरवणूक आणि कीर्तन असे कार्यक्रम झाले. शेवटच्या रात्री लळिताच्या कार्यक्रमाने जत्रोत्सवाची सांगता झाली. मुंबईकर माहेरवाशिनी या जत्रोत्सवाला आवर्जुन उपस्थिती लावली. मंदिर परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने सजविला होता. देवीच्या डाळपस्वारीचा सोहळादेखील अविस्मरणीय ठरला.

वाचनालय उघडणे हे धाडस म्हटले पाहिजे. ते धाडस पुढेही त्यांनी वेळोवेळी दाखवलं. आरंभापासूनच ते वाचकांना देवासमान मानतात. कालानुरूप त्यांनी वाचनालयात अनेक बदल केले. सुरुवातीस गाईड्स जाऊन त्याची जागा निरनिराळ्या लेखकांच्या पुस्तकांनी घेतली. लहान मुलांसाठी रंजक गोष्टींपासून, विज्ञान, कथा, बडबडगीते, गोष्टींच्या सीडीज आदींचा समावेश त्यांनी वाचनालयात केला. लहान मुलांना उन्हाळ्याच्या सुट्टीत खेळण्यांची अधिक गरज असते. प्रत्येक वेळेस प्रत्येकाला सर्व प्रकारची, बौद्धिक, शैक्षणिक, शारिरीक विकास करू शकतील अशी खेळणी घेणं शक्य होत नाही.

तेव्हा त्यांनी खेळण्याची लायब्ररी २००५ सालापासून चालू केली. हवे तितके दिवस ती खेळणी ते मुलांना ठेवू देतात. खेळण्याच्या निमित्ताने सभासदांचे पाय वाचनालयास लागतात.

वाचनालयामधील सर्व पुस्तकांना कव्हर व ती शिवण्यासाठी त्यांनी त्यांच्या मित्राच्या सहाय्याने ''सुनिता'' नामक यंत्र विकसित केलं आहे.

सुरुवातीला वाचनालयाचा जम बसवण्यासाठी दादर, बांद्रा, माहीम, वरळी भागात सायकल वरून पुस्तकं घरपोच दिली आणि ह्याच मुळे त्यांना सभासद मिळत गेले. ह्या सभासदांनी वाचनालयाची इतर ठिकाणी प्रसिद्धी केली.

त्यांनी स्वत:हावरही काही नियम घालून घेतले आहेत. ते सकाळी बरोबर ८.३० वाजता वाचनालय उघडतात. तसच दुसऱ्या सत्रात दुपारी ३.३० वाजता वाचनालय सर्व वाचकांसाठी उघडलं जातं.

एखाद्या वाचकांनी त्यांची आवड सांगितल्यास, ते पुस्तक मागवलं जातं. एखाद्या लेखकाचं पुस्तक वाचकांना आवडल्यास त्या लेखकाची इतर पुस्तकेही त्या वाचकाला सुचवली जातात. सभासद वाचकांना पुस्तक परत करण्यासाठी वेळेचं बंधन नाही. सभासद ते पुस्तक कितीही काळ बाळगू शकतात.

वाचकांना वाचनालयात कितीही वेळ पुस्तक बघण्याची, हाताळायची मुभा आहे. एखादं पुस्तक मिळत नसल्यास वाचनालयाचा कर्मचारी वर्ग त्वरेने मदत करतात.

फोनवरूनही एखादं पुस्तक हवं असल्यास वाचक तसे सांगू शकतात. वाचक यायच्या आधी ते पुस्तक त्यांच्यासाठी काढून ठेवलं जातं.

काकांना एकदा का वाचकांची आवड कळली की, ते त्या आधारे पुस्तके वाचनासाठी सुचवतात. ह्या सर्वामुळे वाचकांशी त्याची नाळ कायमची जुळते.

वाचनालयात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषेतील बरीच मासिके, साप्ताहिके आहेत. वाचकाने इंग्रजी पुस्तक नेल्यास त्याला मराठी पुस्तक ही काका वाचायला देतात. हे ते मराठीच्या प्रेमापोटी करतात.

ह्या सर्व कामात त्यांची पत्नी सौ. सुखदा सावरकर, मुली मुलगा ह्यांचा व मनमिळावू कर्मचारी वर्गाचा मोलाचा वाटा आहे.

काकांनी कधीही शासकीय मदत (निधी), वैयक्तिक अनुदान घेतले नाही. **वाचक हाच धर्म आणि त्यांची सेवा हेच खरं कर्म, हे त्याचे ब्रीदवाक्य आहे.**

स्पर्धेच्या जगात मनोरंजन वाहिन्यांमुळे, इंग्रजी माध्यमातील शिक्षणामुळे वाचनालयाला सुद्धा कधी कधी मंदीचा सामना करावा लागतो. १० मिनिटावर दादर सार्वजनिक वाचनालय तर पुढे १५-२० मिनिटाच्या अंतरावर माहीम सार्वजनिक वाचनालय अशी दोन मोठी वाचनालये असतानाही त्याचं हे व्यावसायिक, अनुदानविरहीत, खाजगी मालकीचं वाचनालय विभागात लोकप्रिय आहे. मराठी भाषेची कितीही गळचेपी झाली, वाचकांचा दुष्काळ जरी जाणवला तरी जोपर्यंत वसंतकाका सावरकरांसारखे तळमळीने वाचनसंस्कृती जपणारे, आणि वाचक हाच परमेश्वर मानणारे लोक जोवर आहेत... तोवर साहित्य सहवासाचा वसंत असाच फुलत राहील असा विश्वास वाटतो...

**निरुता भाटवडेकर**
६, तक्षशीला, पाठारे मार्ग,
केटरिंग कॉलेज समोर,
शिवाजी पार्क, दादर, मुंबई-४०० ०२८.
फोन : ९८२०६ २२७०२

❑ ❑ ❑

## अखेरचा हा तुला दंडवत ...ऽऽऽ



कॅ. मोहन सामंत

भारतीय नौदलात महापराक्रम गाजविणारे आपल्या ज्ञातीतील महापराक्रमी योद्धा कॅप्टन मोहन नारायणराव सामंत ह्यांचे बुधवार, दिनांक २० मार्च २०१९ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी हृदय विकाराने आकस्मीक निधन झाले. त्यांच्या पच्छात पत्नी निर्मला, उज्ज्वला, नताशा आणि मेघना ह्या कन्या, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

१९४९ साली विल्सन महाविद्यालयात विज्ञान शाखेत शिकत असतानाच मोहन सामंत ह्यांनी ''रॉयल इंडियन नेव्ही' मध्ये कॅडेट म्हणून प्रवेश घेतला व आपल्या अंगच्या हुशारीने त्यांनी अनेक मानाची पदे भूषविली. कॅप्टन मोहन नारायणराव सामंत यांच्या कर्तृत्वाची ओळख जगाला पटली ती १९७१ च्या बांगला मुक्ती संग्रामात त्यानी आपल्या कर्तृत्वाने बांगला देशाच्या नौसैनिकांना घडवत पाकिस्तान सैन्याला चारीमुंड्या चित केले. त्यांनी गाजवलेल्या ह्या पराक्रमाबद्दल १९७२ साली भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते ''महावीरचक्र'' ह्या बहुमानाने त्यांना सन्मानीत करण्यात आले व त्यांच्या हयातीतच त्यांच्या जन्म गावी परूळे येथील चौकास ''महावीरचक्र वीजेते कॅप्टन मोहन नारायणराव सामंत'' असे नामकरण करण्यात आले. अशा ह्या महायोध्यास २५ डिसेंबर २०१८ रोजी ''गौड ब्राह्मण सभे'' तर्फे सन्मानीत करण्यात आले. समारंभाच्या व्यासपीठावर विराजमान होताच समस्त ज्ञातीबांधवांनी उभे राहून टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. त्यावेळी कोणलाही त्यांच्या जाण्याची पुसष्टी कल्पनाही आली नव्हती. अशा 'महावीरचक्र'' विजेत्या कॅप्टन मोहन सामंत यांस समस्त ज्ञाती बांधवांचा अखेरचा दंडवत.



**महावीरचक्र स्वीकारताना कॅप्टन मोहन नारायणराव सामंत व भारताचे तत्कालीन राष्ट्रपती**


## हार्दिक शुभेच्छा !

भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

## व्ही. डी. प्रभुकेळूसकर

**सदस्य अभिकर्ताओंके लिये अध्यक्ष क्लब**
**कोड नं. : १०८९१८**

## V. D. Prabhukeluskar

Member of the Chairman's Club for Agents
Code No. 108918

**LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA**

**Off.:** Br. 891, Swapna Siddhi, Akurli Road, Near Railway Station, Kandivali (East), Mumbai-400 101. Tel. : 28870023

**निवास :** भवानी नगर, प्लॉट नं.१, बिल्डींग नं.२, ब्लॉक नं. ४, लोटस को-हौ. सो., मरोळ, मुंबई ४०० ०५९. **टेली : २९२५ ९५५५ मो. : ९८६९०३०९६५**

# ज्येष्ठ ज्ञाती कार्यकर्त्या सौ. वंदना दाभोलकर यांच्याकडून गौड ब्राह्मण सभेच्या ''सभागृह कोष'' फंडाला रु. १,०५,००१/– देणगी!

– सुभाष दत्तात्रय वाघ



सौ.वंदना दाभोलकर

''कधी फळाची आस न धरता हसत कर्म करावे। जीवन सार्थक करावे ॥''

या पंक्ती ज्यांच्याबाबत सार्थ ठरतात अशा गोरेगाव (पूर्व) येथील कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक ज्येष्ठ कार्यकर्त्या आदरणीय सौ. वंदना गुरुदास दाभोलकर यांनी गौड ब्राह्मण सभेच्या **''स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर व स्व. श्री. दिनकर खानोलकर स्म. सभागृह कोष''** फंडाकरिता अलीकडेच रु. १,०५,००१/- एक लाख पाच हजार एक फक्त) इतकी देणगी दिली आहे. हा 'सभागृह कोष 'फंड' स्थापन करण्यामागची मूळ संकल्पना ही गोरेगावातील श्रीमती लक्ष्मी दिनकर खानोलकर यांची होती हे कसे बरे विसरून चालेल! लक्ष्मीबाईंनी सभागृह उभारणीसाठी गोरेगाव (पूर्व) येथील नीलाश्री सोसायटीतील स्वत:च्या मालकीची सदनिका तसेच रु. ५,४३,७९७,५९ इतक्या रकमेची भरीव देणगी देऊन गौड ब्राह्मण ज्ञातीवर त्यांनी फार मोठे उपकार करून ठेवले आहेत. त्यानंतर आपल्या ज्ञातीतील दानशूर श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर व सौ. स्नेहलता सुरेंद्र सामंत कोपराडकर (वसई) यांनी देखील लक्ष्मीबाई खानोलकर यांचा आदर्श जोपासत सदर सभागृह फंडाला रु. १,०२,०००/- इतक्या रकमेची देणगी दिली आहे. या सर्व दानशूर व्यक्तींचे गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आम्ही मन:पूर्वक आभार मानीत आहोत.

सौ. वंदना दाभोलकर ह्या गेली ३५ वर्षे गोरेगाव येथील ''गौड बाह्मण समाज, गोरेगाव'' या ज्ञाती संस्थेवर कार्यरत आहेत. या संस्थेच्या जडणघडणीत अगदी सुरुवातीपासूनच त्यांचा सिंहाचा वाटा आहे. अंगी असलेल्या संघटन कौशल्याने गोरेगाव येथे गौड ब्राह्मण ज्ञाती कार्यकर्त्यांची एक फळीच त्यांनी उभी केली आहे. त्यांनी अनेक व्यक्तिमत्त्वे घडवली आहेत हे विशेष!

स्व. श्रीमती मृणालताई गोरे, स्व. श्रीमती कमलताई देसाई यांच्यासारख्या मातब्बर नेत्यांच्या सहवासात राहून, त्यांचा आदर्श जोपासत एक सामान्य कार्यकर्ती म्हणून मिळालेल्या कामाची संधी हे त्या आपले अहोभाग्यच समजतात. साधी राहाणी अन उच्च विचारसरणी, कमालीचा प्रामाणिकपणा व प्रसिद्धी पराङ्‌मुखता ही त्रिसूत्री त्यांनी आपल्या जीवनात कसोशीने पाळली, हेच तर त्यांच्या जीवनाचे मुख्य सूत्र आहे. स्पष्टवक्तेपणा ही तर त्यांची खासीयत आहे. त्या कमालीच्या मेहनती आहेत. जीवनामध्ये 'श्रद्धा आणि सबुरी'' या तत्वावर ठाम विश्वास ठेवून, संकटाने कधीही खचून न जाता आलेल्या संकटांचे त्यांनी संधीत रुपांतर केले.

आपल्या देणगीचा धनादेश गौड ब्राह्मण सभेकडे सुपूर्द करताना सभेच्या या उपक्रमाविषयी वंदनाताईंनी आपल्या पत्राद्वारे पुढील विचार व्यक्त केले आहेत.

''गौड ब्राह्मण त्रैमासिकात, सभेने 'स्व.श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर व स्व. श्री. दिनकर खानोलकर स्म. सभागृह कोष' फंडाची स्थापना केल्याचे वाचले. गौड ब्राह्मण सभेने सभागृह कोषाची स्थापना करून एका समाजपयोगी प्रकल्पाला गती दिल्याबद्दल सभेच्या विश्वस्त मंडळाला तसेच कार्यकारी मंडळाला मी मन:पूर्वक धन्यवाद देते.

मुंबईसारख्या प्रगत आणि औद्योगिक शहरामध्ये गौड ब्राह्मण ज्ञातीचे सभागृह नसावे ही निश्चितच खटकणारी अशी बाब आहे. ज्ञातीबांधवांची ही गरज लक्षात घेऊन लक्ष्मीबाई खानोलकरांनी सभागृह उभारणीसाठी गोरेगाव येथील नीलाश्री सोसायटीतील स्वत:च्या मालकीची सदनिका तसेच भरघोस देणगी देऊन ज्ञातीवर अनंत उपकार केले आहेत. लक्ष्मीबाई ह्या गोरेगावलाच वास्तव्याला होत्या. त्यामुळे त्यांचे एकूण जीवन, सामाजिक कार्य अगदी जवळून पाहाण्याचे भाग्य मला लाभले. हा मी माझा सन्मान समजते. लक्ष्मीबाईंच्या विचारांची प्रेरणा घेऊन त्यांच्या ह्या मौलिक कार्यात खारीचा वाटा म्हणून मी माझे वडील स्व. श्री. सदाशिव नारायण प्रभुपाटकर (मूळगाव हुंबरट, ता. कणकवली) ह्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गौड ब्राह्मण सभेच्या सभागृह कोष फंडाला रु. एक लाख पाच हजार एक ची देणगी देत आहे. दानशूरांची नावे सभागृहात लावण्यात येणार असून सभेच्या त्रैमासिकात देखील कायम स्वरूपात छापण्यात येणार असल्याने ज्ञातीतील दानशूरांनी या

प्रकल्पाला सढळ हस्ते देणग्या द्याव्यात ही विनंती''.

एका सामान्य गृहिणीपासून ते असामान्य कर्तृत्वशालिनीपर्यंतचा वंदनाताईंचा हा प्रवास जीवनात स्वत: आनंद घेत व इतरांनादेखील देत सुरु आहे व तो असाच सुरु राहावा ही आम्हा सर्वांची सदिच्छा!

वंदनाताईंना परमेश्वर उदंड आयुष्य, उत्तम स्वास्थ्य, सुख-समाधान प्रदान करो आणि त्यांच्या मार्गदर्शनाचा आणि आशीर्वादाचा निरंतर लाभ आम्हाला मिळत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

''पिबान्ति नद्या स्वयमेव नाम्भं : ।
स्वयंन खादन्ति फलानी वृक्षा : ।
नादन्ति सस्यं खहु वारिवाहा ।
परोपकाराय सता विभूतया ॥''

खरंच वंदनाताईंसारख्या सज्जनांचे ऐश्वर्य हे परोपकारासाठी असते.

**– श्री. सुभाष दत्तात्रय वाघ**
गुरुसेवा, गोरेगाव (पूर्व)



प्रभो ! त्रिभवनोज्ज्वला कनकसुंदरा भास्करा !!
समस्त जनरक्षणा विमलरूप सर्वेश्वरा ॥
प्रकाश जगता तुझा सकळा विश्वसंरक्षणा ॥
सदैव तुझिया पदी नमन आदिनारायण ॥

अशा ह्या आदिनारायणाचा रथोत्सव दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील परूळे गावी व विरार नजीक कणेर येथील श्री. संजय प्रभाकर सामंत ह्यांनी बांधलेल्या मंदिरात मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला.

---

## अंधेरी (पूर्व) येथील श्री. दीपक दिगंबर सामंत यांच्याकडून गौड ब्राह्मण सभेच्या 'कर्करोग' वैद्यकीय' फंडासाठी रु.४ (चार) लाखाची भरगोस देणगी!



स्व.रविंद्र प्रभू देसाई



स्व.चित्ररेखा प्रभू देसाई

आपल्या ज्ञातीतील एक दानशूर व्यक्ती आदरणीय श्री.दीपक दिगंबर सामंत अंधेरी (पूर्व) यांनी आपले मामा स्व. श्री. रवींद्र चिंतामण प्रभुदेसाई व मावशी स्व. कु.चित्ररेखा (चित्रा) चिंतामण प्रभुदेसाई ह्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ गौड ब्राह्मण सभेच्या 'कर्करोग वैद्यकीय उपचार फंड' तसेच 'वैद्यकीय फंड' ह्या कायम निधी फंडाकरीता प्रत्येकी रु. दोन लाख अशी एकूण चार लाखाची देणगी देऊन ज्ञातीतील किडणी व कर्करोगग्रस्तांना एक फार मोठा दिलासा दिला आहे. त्याबद्दल गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आम्ही श्री.दिपक दिगंबर सामंत यांचे मन:पूर्वक आभार मानीत आहोत.

त्यांची मावशी कु. चित्ररेखा (चित्रा) प्रभुदेसाई ह्या गिरगावातील कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवासात वास्तव्याला होत्या. त्यांचे दि.२८-१-२०१५ रोजी किडणीच्या आजाराने निधन झाले. त्यांचे मामा श्री. रविंद्र प्रभूदेसाई ह्यांचे कर्करोगाच्या आजाराने दि.१२-१०-२०१८ रोजी निधन झाले त्याचवेळी त्यानी आपल्या मनाचा पक्का निश्चिय केला की, त्यांच्या मामा-मावशीला ज्या यातना व त्रास सोसावे लागले ते ज्ञातीतील इतरांच्या वाट्याला येऊ नयेत यासाठी ज्ञातीतील किडणी व कर्करोग ग्रस्तांना औषधोपचार घेता यावे म्हणून गौड ब्राह्मण सभेकडे भक्कम निधी सुपूर्द करायचा. आपल्या मामा-मावशीच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणगी देऊन त्यांनी खऱ्या अर्थाने त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

श्री. दीपक दिगंबर सामंत यांचे सभेच्यावतीने पुन्हा एकदा आभार मानताना परमेश्वर त्यांना उदंड आयुष्य, उत्तम स्वास्थ्य, सुख-समाधान प्रदान करो आणि त्यांच्या मार्गदर्शनाचा व आशीर्वादाचा आम्हा ज्ञातीबांधवांना निरंतर लाभ मिळत राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

**–कार्यकारी मंडळ**
(गौड ब्राह्मण सभा)

# Success Stories...


# "Hollywood Animation Director राहुल "

–मनीष दाभोलकर

**असं म्हणतात कि ''बाळाचे पाय पाळण्यात दिसतात''. त्याचेही दिसलेले होते. कारण चित्रकलेचा पहिलावहीला पुरस्कार त्याला वयाच्या ४थ्या वर्षी मिळाला होता. अभ्यासाचा त्याला कंटाळा होता. पण चित्रकला, नृत्यकला, अभिनय हे गुण त्याच्यात ठासून भरले होते. त्यामुळे त्यांच्याकरिता कितीही वेळ द्यायची त्याची तयारी असायची, विशेष करून चित्रकलेसाठी. ह्या सर्व कलागुणांना जोपासत हा प्रयोगशील बालकलाकार.... शालेय अभ्यासक्रम, सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्स मधून घेतलेली BFA ची पदवी, पुढे ॲनीमेशन क्षेत्रात प्राविण्य मिळवत हॉलीवुड मधेच ॲनीमेटर दिगदर्शक ह्या नाव लौकिका पर्यंत पोहचला. अशा कुडाळदेशकर गौड ब्राह्मण तरुणाची खास मुलाखत थेट लॉस एंजलीस शहरातील अत्यंत उचभ्रू ठिकाण म्हणजेच ''बेव्हर्ली हिल्स'' येथून खास आपल्यासाठी आज घेत आहोत. होय... आपण सुप्रसिद्ध ॲनीमेशन दिग्दर्शक ''राहुल दाभोलकर'' यांना आज भेटणार आहोत.**

**राहुल याच्या जीवनपटात सुप्रसिद्ध नाटककार, लेखक, दिग्दर्शक रत्नाकर मतकरी यांच्या बालनाट्यापासून ते ऑस्कर अवार्ड विजेता ''पायरेटस ऑफ द कॅरेबियन–३'' या व अशा अनेक हॉलीवुड सिनेमांच त्यांनी केलेले ॲनीमेशन हा प्रवास अतिशय रंजक तेवढाच कठीणही आहे. तो कायम यशाच्या शिखरावरच राहिला परंतु सकारात्मक विचार व अंगीभूत नम्रपणा या पायऱ्यांवर पाय ठेवूनच. राहुलच्या जीवन प्रवासाचा धावता आढावा आजच्या तरुणांसाठी व खास करून त्या पालकांसाठी ज्यांचे चित्रकला या विषयावर, कलांवर अतोनात प्रेम आहे, ज्या पाल्यांना चित्रकला अवगत आहे आणि आपल्या कलेच्या माध्यमातून काहीतरी भव्य–दिव्य करण्याची इच्छा आहे; अशा सर्व बालक–पालकांकरीता ''राहुल दाभोलकर'' दिपस्तंभ ठरणार आहे.**

**(''राहुल'' ह्या शब्दांची रचना कु. देविका दाभोलकर, गोरेगाव व रंग कु. सचिन सामंत, विरार यांनी केले आहेत.)**




राहुल दाभोलकर

''स्वतः कलाकार असल्याशिवाय ग्रेट ॲनीमेटर होणे अशक्य आहे, असे राहुल ठामपणे म्हणतो. बालपणी आय.ई.एस. स्कूल मध्ये जुनिअर K.G. इयत्तेत असताना वयाच्या ४ थ्या वर्षीच चित्रकलेचे पहिले बक्षीस त्याने मिळविले. पुढे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी आयोजित On The Spot Drawing Competition करिता ''डॉ. सलीम अली मेमोरियल अवार्ड'' व दिल्लीतील शंकरर्स इंटरनॅशनल तर्फे सिल्वर मेडल हे व असे अनेक पुरस्कार मिळवले. सुप्रसिद्ध लेखक/दिगदर्शक रत्नाकर मतकरींच्या ''अलबत्या गलबत्या'' बालनाट्यातून १०० हून अधिक केलेले प्रयोग.... ज्येष्ठ नाट्य सिने कलाकार दिलीप प्रभावळकर व इतर मान्यवर कलाकारांसोबत बालवयातच काम करण्याचा अनुभव यातून ह्या छुपा रुस्तमचे कलागुण फुलत गेले. इथेच त्याची दिग्गजांमार्फत अभिनय, संवाद फेक, दिग्दर्शन, वेशभूषा... नाटक व चित्रपटाच्या विविध अंगाची ओळख झाली., सर जे.जे इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट्स संस्थेतून BFA (BACHLOR OF FINE ARTS)ची पदवी त्याने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. डिग्रीकरिता त्याने "ILLUSTRATION" या विषयातून स्पेशलायझेशन केले. त्याच विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल मुंबई विद्यापिठाकडून त्याला पारितोषिक मिळाले होते. J.J. मधून बाहेर पडल्यावर त्याने ॲनिमेशन गुरु श्री. व्ही. जी. सामंत यांच्या मार्गदर्शना खाली 'सिल्वर लाईन' मध्ये २ वर्षे ॲनिमेटरची नोकरी केली. त्यानंतर राहुलने पुढील 3D ॲनिमेशन शिक्षणासाठी कॅनडा गाठले तेथूनच नंतर त्याचा खऱ्या अर्थाने जागतिक स्तरावरील ॲनिमेशन क्षेत्राचा प्रवास सुरु झाला. पुढे इंग्लंड मध्ये ''Framestore ॲनिमेशन'' मध्ये नोकरी मिळाली. तेथे काम करत असतानाच २००६ साली ILM स्टुडिओ निर्मित व सर

जॉर्ज लुकासदिग्दर्शित सुप्रसिद्ध हॉलीवूड चित्रपट ''पायरेटस ऑफ द कॅरेबीयन३'' साठी सिनियर ॲनिमेटर म्हणून सर वरबीनस्की गोर यांच्या सोबत बिग बजेट चित्रपटासाठी काम करण्याची संधी त्याला मिळाली. ज्याचे बजेट रु.२१०० कोटीचे होते. चित्रपटाला ऑस्कर अवार्डने गौरविले गेले. इथूनच पुढे ॲनिमिशेन क्षेत्रातील यशाची दारे राहूलसाठी उघडली गेली. या विषयाकडे तांत्रिकिरित्या किंवा अधिक खोलात या छोटेखानी मुलाखतीत आपण नक्कीच जाणार नाही, त्यासाठी राहुलची स्वतंत्र मुलाखत गौड ब्राह्मण सभेच्या स्नेह संमेलनात किंवा राहुलच्या वेळेप्रमाणे खास कार्यक्रम आयोजीत करुन घेण्यात येईल याचे कारण म्हणजे राहुल याने ''गौड ब्राह्मण सभेच्या'' स्नेह संमेलनात बालवयात सहभागी होऊन आपली कला सादर केलेली, त्याचा आम्हा सर्वांनाच अभिमान आहे.

तो पुढे म्हणतो एक ॲनिमेटर हा पडद्यामागे राहून चांगला अभिनय करणारा कलाकार असावा लागतो. चित्रपटातील पात्राची देहबोली अभिनित स्वत: करून त्यांचे चित्रीकरण करून. त्या हालचाली पात्रांना दिल्यातर ती पात्र खरी वाटतात. अर्थात त्यात विविध तज्ञांचा सहभाग देखील महत्त्वाचा असतो. परदेशात ॲनिमेशन तंत्र अत्याधुनिक झालेले आहे. ''पायरेटस ऑफ द कॅरेबियन-३'' व इतर चित्रपटामध्ये live action annimation अनुभवायला मिळते. त्यातील बारकाव्यावर काही तंज्ञानी अहोरात्र काम केलेलं असतं.



**जागतीकरणाच्या काळात अमेरिकेच्या जगप्रसिद्ध "MAD" मॅगझीनचा भारतातील प्रवेशावरील प्रोजेक्ट (Big Idea Award)**

ॲनिमेशन क्षेत्र फक्त कार्टून किंवा चित्रपटापर्यंत मर्यादित नसून दूरचित्रवाणी, जाहिराती, व्हिडीओ गेम मध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात विस्तारलेले आहेत. त्यामुळे ह्या क्षेत्रातील संधीचे प्रमाणही खूप वाढल आहे असे राहुल म्हणतो.

जपान, चीन, फ्रान्स, कोरिया, कॅनडा, अमेरिका सोबत भारतातही आज अनेक ॲनिमेशन चित्रपट तयार होत आहेत. ''ओ माय फ्रेंड गणेशा'' ''घटोत्कच'' व्ही. जी. सामंत यांचा ''बालहनुमान'' हे चित्रपट सुद्धा प्रचंड लोकप्रिय झालेले आहेत.

राहुलने हॉलिवूडच्या जवळ-जवळ सर्व नामवंत स्टुडिओंसाठी ॲनिमेशन आर्टिस्ट /ॲनिमेशन डायरेक्टर म्हणून काम केलंय. Walt Disney Studio निर्मित Big Hero-6, Feast, Wreck It Ralph, Tangled Ever After, Naughty V/S Nice तर Sony Pictures Image Work च्या Green Lantern आणि Cloudy with The chance of Meat Balls, Alice In Wonder land Dream Works Animation Studio च्या Penguins of Madagaskar-2, ILM Studio च्या Pirates of The Caribbeans-3, Frame Store London च्या Tales of Tespereaux ह्या व अशा अनेक चित्रपटांच्या ॲनिमेशनमध्ये त्याचा सहभाग आहे. ह्या चित्रपटांची बजेट रू.१००० ते २५०० करोड डॉलर्सहुन अधिक ची राहुलने आतापर्यंत उत्तमोत्तम हॉलिवूड दिग्दर्शकांसोबत काम केलं आहे. उदा. Sir Dan Hal, Chris Williams, Rich Moore, Nathan Greno, Byron Howard, Eric Darnell, Simon Smith, Tim Burton, Gore Verbinski, John Hoffman, Kevin Deters, Stevie Wernerss Phil Lord, Chris Miller आणि Christopher Reeve (पहिला सुपरमॅन)



**गौड ब्राह्मण सभेच्या वार्षिक स्नेह संमेलनात ''विच्छा माझी पुरी करा'' या नाटकातील प्रवेश सादर करतांना राहूल दाभोलकर.**

राहुल हा स्वतः नृत्य कलेत पारंगत असून तुर्कस्थान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय डान्स फेस्टिव्हल मध्ये भारता तर्फे प्रमुख नृत्यकलाकार म्हणून राहुलने भाग घेतला होता हे विशेष! सेंट झेवियर महाविद्यालयाच्या मल्हार फेस्टिवलमध्ये वेस्टर्न डान्स (सोलो) मध्ये राहुलचा यशस्वी सहभाग होता. लहानपणी चित्रपटात पाहिलेला डायनासोर, विविध खेळलेले खेळ, केलेले नृत्यविष्कार अभ्यासासोबत केलेले अनेक इतर उद्योग, भावी आयुष्यात कसे उपयोगी पडतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे राहुल दाभोलकर. राहुल आजही नम्र पणे म्हणतो. अल घुर्रघुर्र, ''निम्माशिम्मा राक्षस'', ढग ढगोजिचा पाणी प्रताप, तसेच इंडियन कॅन्सर सोसायटी साठी केलेल्या हिंदी पथनाट्याचे ५० हून अधिक प्रयोग, अलबत्या गलबत्या चे १०० हून अधिक प्रयोग, या सर्वातून इंडियन टीव्ही, थिएटरचा अनुभव व नॅशनल ॲवार्ड विजेते दिगदर्शक रत्नाकर मतकरींचा सहवास, मार्गदर्शन व प्रेम लाभले, त्यामुळे, रंगमंचावर सहज वावरण्याचा आत्मविश्वास प्राप्त झाला, लहानपणी अंतरराष्ट्रीय डान्स फेस्टिवलच्या माध्यमातून मिळालेला अनुभव देखील व्यावसाईक आयुष्यात कामी आला. राहुलच्या अंगी असलेल्या कला व अंतर्गत गुण त्याच्या पालकांनी वेळीच ओळखल्या हे महत्वाचे. आज राहुलचे वय काही मोठे नाही तो फक्त ४० वर्षाचाच आहे. ॲनिमेशन क्षेत्राचे आपण ऋणी आहोत, असे नम्रपणे नमूद करतानाच ॲनिमेशन कोच म्हणून तो अनेक मुलांना मार्गदर्शन करतो. ''ॲनिम'' स्कूल मार्फत २०१३ पासून ''टीचिंग लेवल ७ ॲक्टिंग अँड ॲनिमेटिंग अपील सुद्धा करतो. सध्या राहुल "RESPAWN ELECTRONIC ARTS" यात प्रोडक्शन मध्ये ॲनिमिशेन डायरेक्टर म्हणून काम पहातोय ज्याचे बजेट ४० मल्टी मिलियन डॉलर एवढे आहे.

चांगले चित्रपट, लघुपट, माहितीपट, जागतिक दर्जाचे आशयघन, वर्ल्ड पॅनोरमा, फिचर व नॉन-फिचर फिल्म्स यातून आपल्यासमोर नवीन विषय प्रखरपणे मांडले जातात ते अधिक जिवंत करण्यासाठी डायरेक्टर व त्यांची संपूर्ण टिम अहोरात्र झटत असते. अनेक चित्रपट येतात परंतु काही उत्कृष्ट पोहचतात ऑस्करच्या स्पर्धेत.... आणि त्यातून सुद्धा काही मोजकेच अवार्ड साठी निवडले जातात. अशा चित्रपटांचा दर्जा व पातळी काय उच्च प्रतीची असेल. याचा नुसता अंदाज करावा.

राहुलचे आत्तापर्यंतचे यश हे त्याचे एकट्याचे नसून त्यात त्याची आई श्रीमती संगीता शामसुंदर दाभोलकर (महाराष्ट्र राज्य सरकार नोकरी), वडील स्व. श्री. शामसुंदर विश्वनाथ दाभोलकर (BMC-निवृत्त) व आत्ते वीणा दाभोलकर (BEST-EX PRO) यांचा सहभागही महत्वाचा आहे. आणि सर्वच कु.दे.गौ. ब्राह्मण ज्ञातिबांधव व समाजाकरिता हि अभिमानाची गोष्ट आहे.

आजच्या तरुण पिढीला व पालकांना काय संदेश द्याल असे विचारल्यावर राहुल म्हणतो, माझ्या तरुण मित्रांनो, आपल्या स्वप्नांवर निष्ठा ठेवा, तुमची आवड आणि अंतर्मन जे तुम्हाला सांगते त्याचा सातत्याने पाठपुरावा करा. कारण ह्याच मार्गाने तुम्ही यशाच्या शिखरांपर्यंत पोहचू शकता. अथक परिश्रम करा आणि अक्कल-हुशारीने वाटचाल करा, छोट्याश्या अपयशाने डगमगून जाऊ नका, तुमच्यातील क्षमता तुमच्या स्वत: व्यतिरिक्त इतर कोणीही जोखू शकत नाही. तुमच्या समोरील अगदी ९९ दरवाजे जरी बंद झाले आहेत असे वाटत असले तरी लक्षात ठेवा तुमच्या समोरचा तो एक उघडा दरवाजा देखील चमत्कार घडवू शकतो.

**सर्व पालकांना मला नम्रपणे विनंती करावीशी वाटते कि, आयुष्यातील तुमचे अनुभव.... अपयश... भीती ह्या सर्वांना तुमच्या मुलांच्या स्वप्नांवर हावी होऊ देऊ नका. तुम्ही फक्त एवढे करा, तुमच्या मुलांना प्रोत्साहन द्या, त्यांच्या स्वप्नांना पंख द्या. मळलेल्या वाटेचा अवलंब करणारे सचिन तेंडुलकर किंवा शाहरुख खान होऊ शकत नाहीत.**

आम्ही राहुलला त्याच्या भावी प्रयोगशील आयुष्यासाठी व हाती घेतलेल्या सर्व प्रोजेक्ट्सना उदंड यश मिळवून देण्यासाठी कुलदैवत श्री देव गौतमेश्वरा जवळ प्रार्थना करतो... तसेच श्री. व्ही. जी. सामंत यांनी जसे अनेक विद्यार्थी घडवून देश परदेशात नोकरी-व्यवसायाकरिता प्रोत्साहित केले, त्याच प्रमाणे राहुल यांनी सुद्धा त्यांच्या ज्ञानाचा लाभ आपल्या समाजातील/ज्ञातीतील तरुण मुलांना करून द्यावा हि नम्र विनंती! राहुलला उदंड, निरामय, आयुष्य, कीर्ती, यश प्राप्त होवो अशी गौड ब्राह्मण सभेतर्फे आम्ही शुभेच्छा देतो.

**मनीष दाभोलकर**
गोरेगाव (पूर्व)

॥ उत्तिष्ठ यशो लभस्व ॥ गौड ब्राह्मण

# गौड ब्राह्मण सभा, गिरगांव
# संस्थेचया १२१ व्या वार्षिक स्नेह संमेलनाचया (२०१८) सोहळयाचा विशेष वृत्तान्त-

✍ सुभाष द. वाघ

आपल्या ज्ञातीतील पूर्वसूरींनी स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून ज्ञातीबांधवांचा सर्व स्तरांवर विकास घडवून आणण्यासाठी गौड ब्राह्मण सभेची स्थापना (१८९७) व त्यानंतर 'गौड ब्राह्मण' या त्रैमासिकाची वाटचाल (१९३९) सुरू झाली. १२१ वर्षांची महान परंपरा लाभलेल्या गौड ब्राह्मण या संस्थेचे दरवर्षी भरणारे वार्षिक स्नेह-संमेलन हे संस्थेच्या सभासदांसाठी आणि ज्ञाती कार्यकर्त्यांसाठी एक आनंद मेळावाच असतो. सदर संस्थेचे १२१ वे वार्षिक स्नेह-संमेलन तसेच ज्ञातीतील वधू-वरांचा मेळावा मंगळवार, दि. २५ डिसेंबर २०१८ रोजी गोरेगाव (प.) येथील पाटकर कॉलेजच्या सभागृहात मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. आदरणीय श्री. मोहन नारायणराव सामंत (निवृत्त कॅप्टन, भारतीय नौदल) हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते तर आदरणीय श्री. अरविंद रामचंद्र पाटील (निवृत्त मेजर, भारतीय भूदल) हे समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. दिमाखदार सुशोभित सभागृह, कलात्मक व्यासपीठ, कार्यक्रमाला अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेली ज्ञातीतील प्रतिभासंपन्न, उतुंग भारतीय सैन्य दलात पराक्रम गाजवणारी अशी दोन व्यक्तिमत्त्वे, पुरस्कार विजेत्यांची उपस्थिती, मान्यवर कलाकारांनी सादर केलेला सुरेल संगीताचा आणि भक्तिगीतांचा कार्यक्रम आणि रसिक प्रेक्षकांची उत्साहवर्ध उपस्थिती यामुळे सदर वार्षिक स्नेह संमेलन सोहळा उत्तरोत्तर रंगत गेला हे विशेष !

गौड ब्राह्मण सभेचे आजी-माजी पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सभासद, आजीव सभासद, विद्यावृद्धि समाज, निराश्रित सहाय्यकारी फंड, कु.दे. गौ. ब्रा. क्रेडीट सोसायटी, टोपीवाला ज्ञान मंडळ, कु.दे.गौ. ब्रा. समाज (गोरेगाव) तसेच बोरिवली, वसई-विरार, ठाणे, विक्रोळी, डोंबिवली आदि संस्थांचे पदाधिकारी अन्य ज्ञातीबांधव यांच्या उपस्थितीने या सोहळ्यास विशेष शोभा आली.

सुरुवातीला सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या




उपस्थितीत सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. आकाश पंडित (बेळगाव) यांचा सुरेल संगीताचा आणि भावगीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यानंतर सर्व उपस्थित कलाकारांचा सभेच्यावतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या संगीत कार्यक्रमाचे सुरेख निवेदन आपल्या ज्ञातीतील सौ. अंजली श्याम सामंत यांनी केले.

या कार्यक्रमानंतर वार्षिक स्नेह-संमेलनाच्या मुख्य सोहळ्याला प्रारंभ झाला. सभारंभाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन केल्यानंतर प.पू. श्रीमत् पूर्णानंदस्वामींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष माननीय डॉ. विलास देसाई यांनी सभेच्या वतीने उपस्थित ज्ञातीबांधवांचे मन:पूर्वक स्वागत केले व आपल्या प्रास्ताविक भाषणात आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या १२१ वर्षांच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच ज्ञाती कार्याचा सखोल आढावा घेताना सभेने भविष्यात आखलेल्या काही उपक्रमांचा परामर्श घेतला.

त्यानंतर समारंभाचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांचा, कार्यक्रमाच्या सूत्र-संचालीका सौ. अंजली श्याम सामंत यांनी आपल्या ओघवत्या भाषेत परिचय करून दिल्यानंतर संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई व संस्थेचे उपाध्यक्ष श्री. देवदत्त खानोलकर यांच्या हस्ते संस्थेच्या प्रथेनुसार

शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन त्यांच्या कार्याचा येथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. अरविंद रामचंद्र पाटील व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मोहन नारायणराव सामंत यांनी आपल्या भाषणात १९६५ च्या भारत-पाक युद्धामध्ये तसेच १९७१ च्या बांगला मुक्ती संग्रामामध्ये (त्यांचा प्रत्यक्ष सहभाग असल्यामुळे) त्यांनी अनुभवलेले काही रोमहर्षक युद्ध प्रसंग कथन करताना भारतीय तरुणांनी Indian Army मध्ये भरती होण्यासाठी विशेष आवाहन केले.

संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाचे औचित्य साधून दरवर्षी ज्ञातीतील महनीय व्यक्तींचा, त्यांनी समाजात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी संस्थेतर्फे विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येते. यंदादेखील ह्या कार्यक्रमाचे हेही एक विशेष आकर्षण होते. पुरस्कार विजेते सर्वश्री श्रीपाद शंकर उर्फ बाळासाहेब पंतवालावलकर (जीवन गौरव पुरस्कार), महेश मंगेश तेंडुलकर (स्व. रावबहादूर वासुदेवराव अनंतराव बांबर्डेकर इतिहास संशोधन पुरस्कार), काशीनाथ आत्मराम सामंत (स्व. बा.नी. देसाई आदर्श समाजसेवक पुरस्कार), कृष्णाजी नारायण पाटकर (स्व. डी.पी. नाईक आदर्श स्वयंसेवक पुरस्कार), हेमंत गजानन सामंत (स्व. सूर्याजी रामकृष्ण उर्फ काका कोचरेकर आदर्श समाजसेवक पुरस्कार) गणेश प्रभु खोत, चारुदत्त वामन शेणई (क्रीडा क्षेत्रात नैपुण्य संपादन केल्याबद्दल समाज पारितोषिक) या सर्वांचा मान्यवरांच्या उपस्थितीत, सभेच्यावतीने यथोचितच नव्हे तर विशेष आदर प्रेमभावाने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह देऊन त्यांच्या सामाजिक, शैशणिक, सांस्कृतिक आणि ज्ञाती कार्याचा सन्मान करण्यात आला.

सन्मानाला उत्तर देताना ज्येष्ठ इतिहास संशोधक श्री. महेश मंगेश तेंडुलकर म्हणाले की आतापर्यंत मला अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. परंतु ज्ञाती संस्थेकडून प्राप्त झालेल्या पुरस्कारामुळे मी जास्त प्रभावित झालो आहे. यासाठी मी संस्थेचा सदैव ऋणी राहिन. गौड ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या कार्यातील एक अग्रणी आणि ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व श्री. श्रीपाद शंकर उर्फ बाळासाहेब पंतवालावलकर आपल्या सत्काराच्या भाषणात गौड ब्राह्मण सभेच्या १२१ वर्षांच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करताना संस्थेच्या कार्यकर्त्यांविषयी अत्यंत आदराची भावना व्यक्त केली.

सदर कार्यक्रमाच्या मध्यंतरात गौड बाह्मण सभेच्या Website उद्घाटनाचा सोहळा पार पडला तसेच याच कार्यक्रमात गौड ब्राह्मण त्रैमासिकाच्या अमृतमहोत्सवानिमित्त (२०१४) गौड ब्राह्मण ज्ञाती गौड ब्राह्मण त्रैमासिक व गौड ब्राह्मण सभा यांच्या आतापर्यंतच्या वाटचालीवर तयार केलेला माहितीपटदेखील सभागृहात दाखविण्यात आल्यामुळे सदर कार्यक्रमाला एक विशेष रंगत आली.

सायंकाळच्या सत्रात जवळजवळ तीन तास चाललेल्या वार्षिक स्नेह-संमेलनाचा हा सोहळा, समारंभाचे उत्कृष्ट आयोजन, सत्कारमूर्ती, प्रमुख पाहुणे व समारंभाध्यक्षांची अभ्यासपूर्ण शब्दात करून दिलेली ओळख, सुसंगत निवेदन यामुळे हा कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला हे विशेष! कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, समारंभाचे अध्यक्ष तसेच सत्कारमूर्तींनी व्यक्त केलेली आपापली मनोगते एवढी हृदयस्पर्शी होती की श्रोतृवृंद तन्मयतेने त्याचा आस्वाद घेत राहिला.

समारंभ उत्तमरीत्या साजरा होण्यासाठी चतुरस्त्र हजरजबाबी, ज्ञानपूर्ण, चौफेर व्यक्तित्त्वाच्या निवेदिकेची झालेली निवड ही समारंभाला उपस्थित असणाऱ्यांना आनंद देणारी तर होतीच पण समारंभाचे वातावरण उत्कंठा वाढविणारी होती. या समारंभाला लाभलेल्या निवेदिका सौ. अंजली श्याम सामंत यांचे निवेदन अफलातून होते. निवेदनाची भाषा इतकी सुंदर आणि ओघवती, योग्य संदर्भपूर्ण होती की त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली. स्पष्ट शब्दोच्चार, शब्दमाधुर्य, अचूक पाठांतर त्यामुळे संस्कृत सुभाषितांचा निवेदनावर झालेला सुखद शिडकावा खूप आनंददायक होता. सत्कारमूर्तींचे सत्कार करतेवेळी त्यांनी शब्दफुलांचे हार सहजतेने गुंफले, त्यामुळे ३ ते ३ ॥ तास रंगलेला हा सोहळा केव्हा संपला ते कळलेच नाही. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, कार्यकारी मंडळाचे सभासद व कार्यकर्ते इत्यादींनी अपार मेहनत घेतली.

सारस्वत बँक, एनकेजीएसबी बँक, श्री. फायनान्सिअल सर्व्हिसेस आदि संस्थांनी आपल्या जाहिरातीचे बॅनर्स देऊन

कार्यक्रमाला विशेष शोभा आणली.

या कार्याक्रमाला बहुसंख्य ज्ञातीबांधव उपस्थित होते. शेवटी संस्थेचे कार्यवाह सुभाष द. वाघ यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर पसायदान व राष्ट्रगीताने समारंभाची यशस्वी सांगता झाली.

संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे सकाळच्या सत्रात याच सभागृहात १० ते १ या वेळेमध्ये ज्ञातीबांधवांसाठी वधू-वर पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासदेखील ज्ञातीबांधवांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला हे विशेष! सदर मेळाव्यात जवळजवळ ९० वधू-वरांनी आपल्या नावाची नोंदणी करून एकमेकांची ओळख करून घेतली. या सोहळ्यातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे ज्ञातीतील एक तरुण कार्यकर्ते श्री. आदित्य सरनाईक यांनी आपल्या ओघवत्या भाषेत कार्यक्रमाचे सूत्र-संचालन करून संपूर्ण वधू-वरांची ओळख करून देण्याचा एक आगळा-वेगळा कार्यक्रम सादर केला आणि तरुणाईच्या मनामध्ये एक प्रकारचा उत्साह व विश्वास निर्माण केला.

सदर मेळाव्याला सर्वश्री आप्पा सामंत (डोंबिवली), किरण सामंत (भायखळा), नागेश पाटील (गोरेगाव), सौ.वंदना दाभोलकर (गोरेगाव), सौ. अंजली मातोंडकर (गिरगाव), श्रीमती रोहीणी कोचरेकर (वसई) आदिंचे उदंड सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रमाला वधू-वर, पालक, त्यांचे नातेवाईक, सभासद, ज्ञाती संस्थांचे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते.



संस्थेच्यावधू-वर पालक मेळाव्यातवधू व पालक माहिती घेताना

With Best Compliments From

Shrikant S. Joshi
Jitendra N. Joshi

R

# Ramchandra Keshav & Co.


GOLD, SILVER, DIAMOND AND PEARL JEWELLERY

TIME : 10.30 A.M. To 8.00 P.M.
Friday Closed

53, Mohan Bldg., 162, J.S.S. Road, Girgaum, Mumbai 400 004.
Tel.: 2388 7874 / 2388 2060

# गौड ब्राह्मण सभेच्या १२१व्या वार्षिक स्नेहसंमेलनातील संस्थेच्या अध्यक्षांचे प्रास्ताविक व विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेल्या ज्ञातीतील मान्यवरांचा परिचय–

## संस्थेचे अध्यक्ष मा. विलास देसाई यांचें प्रास्ताविक


डॉ. विलास देसाई

गौड बाह्मण सभेच्या आजच्या या १२१ व्या वार्षिक स्नेह-संमेलनाचे अध्यक्ष आदरणीय श्री. मोहन नारायण सामंत (निवृत्त कॅप्टन, भारतीय नौदल), कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय श्री. अरविंद रामचंद्र पाटील (निवृत्त मेजर, भारतीय भूदल), आजच्या कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती, गौड ब्राह्मण सभेचे विश्वस्त, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, सभेचे अन्य पदाधिकारी आणि उपस्थित ज्ञाती बंधू-भगिनींनो

आपणा सर्वांचे मन:पूर्वक स्वागत!

गौड ब्राह्मण ज्ञातीचे दैवत प.पूज्य श्रीमत् पूर्णानंद स्वामींच्या प्रतिमेला वंदन करून सभेचं हे १२१ वे वार्षिक स्नेह-संमेलन या ठिकाणी संपन्न होत आहे. सकाळच्या सत्रात याच सभागृहामध्ये ज्ञातीतील वधू-वरांसाठी मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

आपल्या ज्ञातीतील पूर्वसुरींनी स्वातंत्र्यापूर्व काळात ज्ञातीबांधवांचा सर्व स्तरांवर विकास घडवून आणण्यासाठी आपल्या ज्ञातीसंस्थेची संस्थापना प्रथम १८९० ते १९०० च्या कालखंडात ''गौड ब्राह्मण सोशल क्लब'' या नावाने झाली. पुढे काही वर्षे कार्य केल्यानंतर १८९७ साली या संस्थेचे ''गौड ब्राह्मण सभा'' या संस्थेत रुपांतर झाले. आज ही संस्था १२१ वर्षात पदार्पण करत आहे हे नवल विशेष!

गौड ब्राह्मण ज्ञातीचं एक मुखपत्र असावं या भावनेनं सुमारे १९२६ साली ''आद्य गौड'' या नावानं सभेच्यावतीने एक द्वैमासिक सुरू करण्यात आले. त्यांनतर म्हणजे जुलै १९३९ पासून त्याचे ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकात रुपांतर करण्यात आलं. या त्रैमासिकानेदेखील आपल्या वयाची ७९ वर्षे मोठ्या दिमाखात पूर्ण केली असून ज्ञातीबांधवांना संघटित करून समाज प्रबोधनाचं कार्य अंगिकारत या त्रैमासिकाची आजही यशस्वी वाटचाल चालू आहे.

आपल्या ज्ञातीतील प्रत्येक घटकाला सभेचं अस्तित्व प्रगट होते हे ''गौड ब्राह्मण'' या सभेच्या त्रैमासिकामुळे ज्ञातीतील सर्व संस्थांच्या विकासाला गौड ब्राह्मण सभेने त्रैमासिकाद्वारे हातभार लावला आहे असं म्हटलं तर काही वावगं ठरणार नाही. त्यामुळे ज्ञातीच्या मुखपत्राचे जुने अंक हे ऐतिहासिक दस्तऐवज ठरले आहेत.

गौड ब्राह्मण ज्ञातीमध्ये परस्पर दळणवळण वाढून समाजास व्यवस्थित व सुसंघटीत स्वरूप प्राप्त व्हावं, ज्ञातीतील लोकांना परस्परांच्या अनुभवाचा ज्ञानाचा आणि प्रेमयुक्त सहानुभूतीचा फायदा वाढत्या प्रमाणात घेता यावा, गौड ब्राह्मण समाजातील ज्ञातीबांधवांच्या अंगभूत कलागुणांना वाव देऊन त्यांचा उचित सन्मान करवा, ज्ञातीतील साहित्य, शैक्षणिक, सांस्कृतिक, औद्योगिक, क्रीडा, सामाजिक आदि क्षेत्रांतील मान्यवर, कर्तबगार, निपुण व्यक्तींचा सन्मान करवा, सभा-स्नेह-संमेलनं, क्रीडा महोत्सव आयोजित करावी ज्ञातीतील गुणवंत मुलांचा गुणगौरव करून त्यांना शिष्यवृत्ती द्यावी, ज्ञातीतील निराश्रित, निराधार तसेच ७० वर्षावरील वयोवृद्धांना, ज्ञातीतील रुग्ण व्यक्तींना आर्थिक साहाय्य करावे, ''गौड ब्राह्मण'' या सभेच्या मुखपत्राचे नियमित प्रकाशन करावे आणि अशा तऱ्हेने ज्ञातीचा विकास साधावा ही या संस्थेची प्रमुख उद्दिष्ट्यं आणि ध्येयं आहेत.

ज्ञातीबांधवांना सर्वेतोपरी साहाय्य करण्याच्या आंतरिक प्रेरणेपोटी स्वत:च्या तन, मन, धनाचे खतपाणी घालून गेल्या १२१ वर्षांच्या मशागतीने ज्या माजी व विद्यमान समाजपुरुषांनी हा जो भव्य समाजवृक्ष निर्माण केला, वाढवला त्या समाज धुरंधरांना आमचे शतश: प्रणाम!

आमच्या समाज धुरीणांनी अत्यंत कल्पकतेनं गौड ब्राह्मण समाजाच्या बालवयापासून वृद्धावस्थेपर्यंत काळजी वाहणाऱ्या अनेक ज्ञाती संस्था उभ्या केल्या व या सर्वांचा समन्वय साधण्यासाठी गौड ब्राह्मण सभा ही मध्यवर्ती अशी

संस्था उभी केली. आपल्या ज्ञातीला ललामभूत झालेले स्व. रा. ब. अनंत शिवाजी देसाई टोपीवाले या थोर महापुरुषाने समाजावर व ज्ञातीसंस्थांवर एवढे उपकार करून ठेवले आहेत की त्यांचे स्मरण होताच नेत्र कृतज्ञतेच्या आनंदाश्रूंनी भरून येतात.

सभेच्या १२१व्या वार्षिक स्नेह-संमेलनाच्या सोहळ्यात सहभागी होताना मनात अनेक विचारांची दाटी झाली आहे. व्यक्तीच्या त्याचप्रमाणे संस्थेच्या वाटचालीत चढ उत्तार, अडचणी, संकटे येतातच व त्यावर मात करणे ही कार्यकर्त्यांची खरी कसोटी असते. कार्य अर्धवट सोडून जाण्यात काय हशील? ज्ञातीसंस्थांचे व्यवहार हे निरलस सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच अव्याहत चालू आहेत व तसेच ते पुढे चालू राहतील यात दुमत होण्याचं कारण नाही. काळ झपाट्याने बदलतो आहे. मोबाईल, संगणक, इमेल, व्हाटसअप, वेबसाईट हे परावलीचे शब्द झाले आहेत. या साधनांचा यथार्थ वापर करायला सभेने प्रारंभ केला आहे.

सभेच्या वार्षिकोत्सानिमित्त मला इथे कही गोष्टींचा खास उल्लेख करावासा वाटतो. विलेपार्ले येथील आपल्या ज्ञातीतील थोर दानशूर स्व. श्रीमती लक्ष्मीबाई बाळकृष्ण पाटील तसेच स्व. श्री. विष्णू मंगेश पाटील यांनी आपल्या मृत्यूपत्राद्वारे सभेला आतापर्यंत रु. ८५,४८,०००/- (रु.पंच्याऐंशी लाख अठ्ठेचाळीस हजार) इतक्या रकमेची देणगी दिली आहे. तर अलीकडेच वसईच्या श्री. सुरेंद्र दत्तात्रय सामंत कोपराडकर व सौ. स्नेहलता सुरेंद्र कोपराडकर यांनी संभेच्या विविध कायमनिधी फंडासाठी रु. २,५५,०००/- इतक्या रकमेची देणगी दिली आहे. स्व. श्री. एकनाथ केशव ठाकूर कर्करोग वैद्यकीय उपचार फंडासाठी ज्ञातीतील दानशूरांकडून सभेला उत्तम प्रतिसाद मिळतो आहे. ह्या देणग्यांच्या व्याजातून ज्ञातीतील गरीब, निराश्रित वृद्धांना, रुग्णांना, ज्ञातीतील गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या ज्ञातीतील एक दानशूर महिला स्व. श्रीमती लक्ष्मीबाई दिनकर खानोलकर (गोरेगाव) यांनी आपल्या मृत्यपत्राद्वारे आपली सदनिका गौड ब्राह्मण सभेला दान करताना त्यांच्या नावे गोरेगाव येथे सभागृह उभारण्याची इच्छा व्यक्त केली आहे. यासाठीदेखील रु.५,४३,७९८.५९ इतकी देणगी सभेला प्राप्त झाली आहे.

यावर्षी शालान्त तसेच उच्च माध्यमिक शालान्त तसेच अन्य परीक्षामध्ये गुणवत्ता यादीत आलेल्या ज्ञातीतील मुलामुलींचे आम्ही अभिनंदन करत आहोत. अशा विद्यार्थ्यांचा सभेच्यावतीने पारितोषिके देऊन त्यांचा गुणगौरवदेखील करण्यात आला आहे.

आपल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांनी, तरुणांनी पुस्तकी शिक्षणाबरोबर क्रीडा क्षेत्रात प्राविण्य संपादन करण्यासाठी गेली तीन वर्षे, गौड ब्राह्मण सभा ''कुडाळदेशकर गौड ब्राह्मण प्रीमिअर लीग'' क्रीडामहोत्सवांचे आयोजन करत असते. यावर्षी दि. १९ व २० जानेवारी २०१९ रोजी गोवा येथील ''कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण उन्नती मंडळ'' या ज्ञातीसंस्थेच्यावतीने आयोजन करण्यात येणार आहे. तसेच All India Saraswat Culture Organisation या संस्थेच्यावतीने दि. १९ व २० जानेवारी २०१९ रोजी माटुंगा येथे अखिल भारतीय सारस्वत संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांना ज्ञातीबांधवांनी आवर्जून उपस्थित राहावे.

यंदा सभेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्कारांसाठी सर्वश्री महेश मंगेश तेंडुलकर (पुणे), श्रीपाद शंकर उर्फ बाळासाहेब पंतवालावलकर, (मालवण) काशीनाथ आत्माराम सामंत (कुडाळ), कृष्णाजी नारायण पाटकर (बोरिवली), हेमंत गजानन सामंत (विक्रोळी), गणेश प्रभु खोत (नांदगाव) चारूदत्त वामन शेणई (तिरोडा) या ज्ञातीतील मान्यवरांची एकमताने निवड झाली आहे. या सर्व उपस्थित मान्यवरांचे सभेच्यावतीने मन:पूर्वक अभिनंदन! गौड ब्राह्मण सभेला अशा या बहुसंपन्न आदर्श व्यक्तिमत्त्वाचा सार्थ अभिमान वाटतो. परमेश्वर आपणास उदंड आयुष्य, उत्तम स्वास्थ्य, सुख-समाधान प्रदान करो आणि आपल्या ज्ञानाचा, मार्गदर्शनाचा आणि आशीर्वादाचा समाजास निरंतर लाभ मिळत राहो ही प्रार्थना!

श्रीमत् पुर्णानंदांच्या कृपाशीर्वादाने, कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मणांच्या कुलदेवतांच्या व स्थानिक देवतांच्या आशीर्वादाने, ज्ञातिबांधवाच्या तन-मन-धन सकट सहभागाने गेली सलग १२१ वर्षे गौड ब्राह्मण सभेची यशस्वी वाटचाल चालू आहे.

ज्ञानेश्वर माऊलींनी म्हटल्याप्रमाणे-

''**इवलेसे रोप लाविलेले द्वारी,**

**त्याचावेलू गेला गगनावरी**''

आपल्या पूर्वजांनी असा हा सभेचा लावलेला ज्ञातीवृक्ष आज बहरला आहे, फुलला आहे. दिवसेंदिवस गौड ब्रह्मण ज्ञातीमध्ये प्रगतीचा सुगंध चारी दिशांत दरवळू लागला आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आदि क्षेत्रांमध्ये ज्ञातीतील विद्यार्थ्यांच्या जीवनाची पहाट फुलू लागली आहे. पहाटेच्या क्षितीजावर उगवणाऱ्या सूर्याची किरणे जशी आसमंत उजळून टाकतात त्याप्रमाणे गौड ब्राह्मण ज्ञातीतील कित्येक विद्यार्थ्यांनी आपल्या अंगच्या कलागुणांनी ज्ञातीची कीर्ती देशातच नव्हे तर परदेशातही पोहचवली आहे.

१२१ वर्षांची सभेची ही स्नेहदिंडी प्रगतीच्या, भक्तीच्या, सौख्याच्या पंढरीकडे चालली आहे. दिंडीतील ही १२१ वी पताका आभाळात उंचावते आहे, तिच्यावर आम्हा प्रत्येकांच्या भक्तीची, शक्तीची आणि सहकार्याची मूठ घट्ट असू दे!

संपूर्ण वर्षभरात संस्थेच्या सभासदांनी, दानशूरांनी, जाहिरातदारांनी, हितचिंतकांनी संस्थेच्या उपक्रमांना अर्थसहाय्य केल्याबद्दल त्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहोत. संस्थेवरील आपला हा लोभ असाच कायम ठेवावा ही विनंती.

१२१ वर्षात पदार्पण केलेल्या गौड ब्राह्मण सभेचे कार्यक्षेत्र दिवसेंदिवस वाढावे फुलावे, त्याचा सुगंध सर्वत्र पसरावा हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

आगामी नवीन वर्षाच्या आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करून माझे लांबलेलं हे प्रास्ताविक इथेच थांबवतो.

**धन्यवाद ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !**

--- ---

**आदरणीय श्री. मोहन नारायण सामंत**



(निवृत्त कॅप्टन भारतीय नौदल)

(भारतीय नौदलात दिलेल्या विशेष योगदानासाठी गौड ब्राह्मण सभेकडून सन्मानित)

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीमध्ये बरीच कर्तृत्ववान मंडळी होऊन गेली. त्यात काहींचे कर्तृत्व समाजास ज्ञात आहे तर काहींचे अज्ञात. कर्तृत्ववान असलेल्या अशा ज्ञातीतील मान्यवरांचा शोध घेऊन त्यांना ज्ञातीच्या व्यासपीठावर आणून त्यांचा गौड ब्राह्मण सभेच्यावतीने यथोचित सत्कार केला जातो. भारतीय नौदलामध्ये सेवाव्रत राहून ज्यांनी मानाचे स्थान पटकावले आणि स्वत:च्या व्यक्तित्त्वाचा ठसा उमटवला ते हे महान व्यक्तिमत्त्व-आदरणीय श्री. मोहन नारायण सामंत.

१९६५ सालच्या भारत-पाक युद्धामध्ये आपण दिलेल्या विशेष योगदानासाठी तसेच १९७१ सालच्या बांगला मुक्ती युद्धात आपण गाजविलेल्या विशेष पराक्रमासाठी लष्करी सेवेतील दुसऱ्या क्रमांकाचे ''**महावीरचक्र**'' ने राष्ट्रपतींच्या हस्ते आपल्याला सन्मानित करण्यात आल्याबद्दल गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आपले मन:पूर्वक अभिनंदन!

कॅ. मोहन सामंत यांचा जन्म वसईतील रमेदी आळी परिसरात झाला. त्यांचा जन्म १९.१०.१९३० चा. त्यांचे वडील स्व. नारायण रामचंद्र सामंत हे ब्रिटीश आर्मीमध्ये '**सुभेदार मेजर**' या पदावर कार्यरत होते. त्यावेळच्या शिरस्त्याप्रमाणे त्यांच्या मातु:श्री लक्ष्मीबाई नारायण सामंत गृहिणी होत्या. वडिलांच्या सैन्यदलातील नोकरीत सततच्या होणाऱ्या बदल्यांमुळे कॅ. मोहन सामंत यांचे प्राथमिक शिक्षण मेरठ, सीतापूर (उत्तर प्रदेश), चखलालाल (आता पाकिस्तानात) इत्यादी ठिकाणी झाले. परंतु दुसऱ्या महायुद्धातील सततच्या अस्थिर वातावरणामुळे त्यांना १९३९ साली माध्यमिक शिक्षणासाठी प्रथम परुळे व त्यानंतर मालवणच्या धुरीवाडा येथील डॉ. काका देसाईंच्या वाड्यात कुटुंबासह यावे लागले. त्यानंतर मालवणच्या टोपीवाला हायस्कूलमधून माध्यमिक शिक्षण पूर्ण करून १९४७ साली महाविद्यालयीन शिक्षणासाठी ते मुंबईत येऊन दाखल झाले. विल्सन महाविद्यालयात विज्ञान शाखेत असतानाच त्यांना भारतीय नौदलाने भुरळ घातल्याने सन १९४९ साली त्यांनी विल्सन महाविद्यालयाचा निरोप घेतला आणि त्यांनी 'रॉयल इंडिअन नेव्ही' मध्ये कॅडेट म्हणून प्रवेश घेतला. आपल्या अंगच्या हुषारीमुळे त्यांना अल्पावधीतच पुढील शिक्षणाकरिता इंग्लडमधील 'रॉयल नेव्हल कॉलेज' मध्ये भारतीय नौदलातर्फे पाठविण्यात

आले. अनेक महत्त्वपूर्ण घडामोडींनी भरलेल्या या कालखंडात कॅ. सामंत यांनी इंग्लडची दुसरी राणी एलिझाबेथ (सध्याची राणी) यांना कोलंबो ते लंडन प्रवासादरम्यान संरक्षण देण्याबरोबरच ब्रिटिश नौदलातर्फे कोरिअन व मलेशियन युद्धात भाग घेऊन प्रत्यक्ष युद्धाचा अनुभव घेतला. त्यानंतर १९५२ साली ते भारतीय नौदलात 'सब-लेफ्टनंट' या पदावर रूजू झाले. विविध नौदल कामगिऱ्यामधील प्रत्यक्ष सहभाग, नौकानयन शास्त्र, पाणबुडी/विमान इत्यादींची दिशा, अंतर त्यांची नोंद करणाऱ्या यंत्राचा विशेष अभ्यास असणाऱ्या कॅ. सामंत अवघ्या तीन महिन्यात लेफ्टनंट झाले. पुढे पुन्हा एकदा त्यांनी इंग्लडला जाऊन 'नेव्हिगेशन ॲण्ड एअरक्राफ्ट ग्रॅजुएशन कोर्स केला. त्यामुळे एका वर्षात ते 'लेप्टनंट कमांडर' या पदावर पोहचले. कॅ. सामंतांनी तिसऱ्यांदा १९६२ साली इंग्लडला जाऊन सबमरीन (पाणबुडी) विषयांतर्गत विशेष प्रावीण्य संपादन केले. त्यामुळे १९७१ साली भारतीय नौदलाने आपल्या मुख्यालयातील 'डायरेक्टर ऑफ सबमरीन आर्म' या विभागाचे दुसरे डायरेक्टर म्हणून त्यांची नेमणूक केली.

यापूर्वी INS जी, INS राणा यासारख्या युद्धनौकांवर आपल्या ऐन उमेदवारीच्या काळात विविध प्रकारची अधिकारपदे भूषविलेले कॅ. सामंत यांची 'INS विक्रांत' या भारतीय नौदलचा मानबिंदू असलेल्या युद्धनौकेवर नेमणूक झाली.

भारत सरकारने काळाची गरज ओळखून सोव्हिएत रशियाकडून पाणबुडी घ्यायचे ठरविले. त्याचाच एक भाग म्हणून गठीत केलेल्या तुकडीत ले. कमांडर सामंत यांचा समावेश करण्यात आला. सोव्हिएत रशियातील लॅटाव्हिया देशातील ''रिगा'' शहरातून भारतात पहिली पाणबुडी विशाखापट्टणम या ठिकाणी आणली गेली त्याचे कमांडिंग ऑफीसर होते कॅ. मोहन नारायण सामंत!

कॅ. सामंतांच्या कर्तृत्वाचा आलेख दिवसेंदिवस उंचावत होता व तो सन १९७१ च्या बांगला मुक्ती संग्रामात सर्वोच्च उंचीवर पोहचला असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. कमांडर मोहन सामंत यांनी बांगला मुक्तिवाहिनीची स्थापना करून राष्ट्रभावनेने प्रेरित झालेल्या मुक्तिवाहिनीच्या युवकांना अंडरवॉटर स्विमिंग, विध्वंसक साहित्याचा वापर करणे, तोफखाना चालविणे, पाणसुरुंग पेरणे, नि:शस्त्र असताना स्वसंरक्षण करणे इत्यादीचे प्रशिक्षण दिले. जंगलातील तीन महिन्यांच्या खडतर प्रशिक्षणात मुक्तिवाहिनीचे त्यांनी अनेक सशस्त्र सैनिक घडविले. मोठ्या प्रमाणावर नद्या असलेल्या पाकिस्तानच्या पूर्व प्रांतात पाकिस्तानी लष्कराचे मोठे तळ होते. कॅ. सामंतांनी गनिमीकाव्याचा वापर करीत पाकिस्तानी लष्करावर जोरदार हल्ले करून लष्कराची वाताहात तर केलीच; शिवाय या कारवाईत मोठ्या प्रमाणावर पूल जमीनदोस्त करणे, जहाजांना जलसमाधी देणे यासारखी महत्त्वाची कामगिरी पार पाडली अनेक पाक सैनिकांना कंठस्नान घालत पाक नौसेनेचे महत्त्वाचे लष्करी तळ उध्वस्त केले.

खुलना बंदरात प्रवेश करीत असतानाच गैरसमजुतीमुळे भारतीय हवाईदलाने कमांडर सामंतांच्या ताफ्यातील 'पद्मा' व 'पलाश' या युद्धनौकांवर क्षेपणास्त्रांनी मारा सुरू केला. दुर्दैवाने या दोन्ही जहाजांना जलसमाधी मिळाली. सुदैवाने कमांडर मोहन सामंत हे INS पनवेल? या युद्धनौकेवर असल्याने बचावले. ताफ्यातील युद्धनौकेने वॉर्निंग फायर करताच चूक लक्षात आल्याने हवाईदलाने हल्ला थांबवला.

परंतु या हल्ल्यामुळे सावध झालेल्या पाक सैन्यदलाने कॅ. सामंत यांच्या जहाजावर हल्ला चढवला. आधीच दोन जहाजाना जलसमाधी मिळाली होती. अशावेळी भयंकर चक्रव्यूहात सापडलेल्या कॅ. सामंतांना माघार घेणेही शक्य नव्हते. आता कॅ. सामंतांनी मागचापुढचा विचार न करता आपल्या सहकाऱ्यांचे मनोबल वाढवीत खुलना बंदरावर हल्लाबोल करण्याचा धाडसी निर्णय घेतला. 'करो या मरो' या निश्चयाने तुटून पडलेल्या आपल्या नौदलाने प्रचंड ताकदीने मारा करून मुख्यालयासकट खुलना बंदर उद्ध्वस्त केले. पाकचे अनेक सैनिक कामी आले तर काही सैनिकांनी अक्षरश: भर रणांगणातून पळ काढला. 'ऑपरेशन जॅकपॉट' पूर्णत: यशस्वी झाल्याने पाकला आपला पराभव मान्य करण्यावाचून गत्यंतर नव्हते.

बांगला मुक्ती युद्धात कॅ. सामंतांनी संघटीत केलेल्या नौसैनिकांनी 'फ्रॉगमन पोशाखात' (बेडकासारखे पाय धारण करणाऱ्या पाणबुड्यांचा पोशाख) हल्ला करून पाक

संरक्षण दलाला मिळणारी रसद निष्प्रभ ठरविली तेव्हा भारतासह संपूर्ण जगाने कॅ. सामंतांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन मुक्त कंठाने स्तुती केली. बांगलादेश मुक्ती समाप्तीनंतर १९७२ मध्ये भारतात परल्यावर भारत सरकारकडून युद्धात महापराक्रम गाजविणाऱ्यांना देण्यात येणारा भारतातील दुसऱ्या क्रमांकाच्या 'महावीरचक्रा'ने कॅ. सामंताना राष्ट्रपतींच्या हस्ते गौरविण्यात आले.

असे हे आपल्या ज्ञातीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून लाभावेत हे सभेचे अहोभाग्यच म्हणावे लागेल. त्यांच्या भावी आयुष्याला आम्ही सुयश चिंतित असताना त्यांना दीर्घायुष्य लाभावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

--- ---

**आदरणीय मेजर अरविंद रामचंद्र पाटील**

(निवृत्त मेजर, भारतीय भूदल)

(भारतीय भूदलात दिलेल्या विशेष योगदानासाठी गौड ब्राह्मण सभेकडून सन्मानित.

भारतीय भूदलामध्ये उच्चतम पदावर राहून शौर्य



गाजवले ते हे आदरणीय श्री. अरविंद रामचंद्र पाटील (निवृत्त मेजर, भारतीय भूदल)- आपल्या ज्ञातीतील एक उत्तुंग व्यक्तिमत्त्व! मेजर अरविंद रामचंद्र पाटील हे मुळचे कणकवली तालुक्यातील आशियेमठ गावचे. जन्म दि. २४.४.१९४२ चा. त्यांचं बालपण, प्राथमिक शिक्षण गिरगावामध्ये झालं. त्यानंतर गिरगावातील विल्सन कॉलेजमधून Bsc (Hon) ही पदवी त्यांनी संपादन केली. आपल्या शालेय शिक्षणाकरिता त्यांनी '**विद्या वृद्धि समाज**' ह्या ज्ञातीसंस्थेकडून आर्थिक साहाय्य घेतले होते आणि विशेष म्हणजे त्याची परतफेड केली.आपल्या ज्ञातीतील एक ज्येष्ठ माजी कार्यकर्ते, ज्ञातीसंस्थांचे माजी पदाधिकारी स्व. श्री. वामनराव परुळेकर हे त्यांच्या बहिणीचे सासरे होते याचा ते आवर्जून उल्लेख करतात. सहाजिकच त्यांच्या जीवनात एका वेगळ्या संस्कारांची रूजवण झाली. वडिलांचा आदर्श त्यांच्यापुढे असल्याने त्यांचा वारसा पुढे चालविण्याचा त्यांनी पक्का निर्धार केला. त्यांची पाऊले इंडियन आर्मीकडे वळली. त्यानुसार सुरुवातीला त्यांनी 'Indian Military Academy', Dehradun मधून Army चे Training घेतले. Training पार पडल्यानंतर १९६४ साली त्यांचे पहिले Posting 'Infantry Jot' मध्ये झाले. त्यानंतर लागलीच त्यांची 'NEFA Chinese Border' वर नेमणूक करण्यात आली. १९६५ सालच्या भारत-पाक युद्धामध्ये (पंजाबच्या अत्तारी सीमेवर) तर १९७१ सालच्या बांगला मुक्ती युद्धामध्येदेखील (राजस्थानच्या वाळवंटामध्ये) त्यांचा विशेष सहभाग होता. त्यांनी केलेल्या ह्या अतुलनीय कामगिरीमुळे पुढे १९७२ साली जम्मु-काश्मिरमध्ये, १९७४ साली न्यू. दिल्ली येथील Army Head Quarter मध्ये तर १९७६ साली Colaba Head Quarter मध्ये 'General Staff Officer' म्हणून त्यांचे Posting झाले होते.

१९८२ साली त्यांनी Indian Army मधून निवृत्ती स्वीकारली आणि लगेचच ESSR Group मध्ये 'CEO' म्हणून पदभार स्वीकारला. त्यानंतर पुढे १९९१ साली वसई येथील एका Factory मध्ये त्यांनी पदभार स्वीकारला. पण २००५ साली सदर Factory बंद पडल्याने एका US कंपनीमध्ये 'Consultancy' सुरू केली. MIDC, तळेगाव येथे त्यांनी स्थापन केलेल्या 'ICD International Co. चे ते Founder Director होते.

त्यानंतर मात्र २०१२ साली या सर्व कार्यांतून निवृत्ती घेत त्यांनी समाजसेवेचे व्रत अंगिकारले. जमशेट नावाच्या एका आदिवासी गावात समाजसेवेमध्ये स्वत:ला झोकून दिले. त्यांनी अंगिकारलेले समाजसेवेचे हे व्रत आजही अव्याहतपणे चालू आहे हे विशेष! असे हे चतुरस्त्र व्यक्तिमत्त्व संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभावेत हे संस्थेचे महद्भाग्य! त्यांचा हा आदर्श तरुण पिढीला प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्या ह्या सन्मानानिमित्त सभेच्यावतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा व्यक्त करताना त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या कुलदेवतेच्या आशीर्वादाने त्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायु लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**आदरणीय श्री. श्रीपाद शंकर पंतवालावलकर** (मालवण)



(गौड ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या कार्यातील एक अग्रणी, ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व)

(शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांत तसेच गौड ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या कार्यात दिलेल्या विशेष योगदानासाठी गौड ब्राह्मण सभेच्यावतीने ''जीवनगौरव'' पुरस्काराने सन्मानित)

समाजामध्ये काही व्यक्ती अशा असतात की त्या प्रसिद्धीपासून नेहमीच दूर राहून अत्यंत नि: स्वार्थीपणे सामाजिक कार्य करत असतात. अशा व्यक्तिमत्त्वांचा समाजाने नेहमीच आदर केला पाहिजे असे हे प्रसिद्धीविन्मुख राहिलेले आदरणीय व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. श्रीपाद शंकर उर्फ बाळासाहेब पंतवालावलकर!

अशा व्यक्तीचे मर्म म्हणजे त्यांचे भारलेपण! आपल्या ज्ञातीची खडान खडा माहिती असणे आणि ज्ञातीसाठी जीवनातील क्षण-न् क्षण वेचणे हेच पंतवालावलकरांचे रुपरंग आहे.

श्रीपाद शंकर पंतवालावलकर हे मूळचे मालवणचे डॉ. शंकर कृष्णाजी पंतवालावलकर ह्यांचे ते चिरंजीव! त्यांचा जन्म २९ मे १९४२ चा. मालवणविषयी त्यांना विलक्षण ओढ आहे, प्रेम आहे. त्याकरताच निवृत्तीनंतर ते मालवणला स्थायिक झाले. त्यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मालवणलाच झाले तर महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूर आणि त्यानंतर मुंबईला झाले. M.P.S.C. परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते सचिवालयात सरकारी सेवेत रुजू झाले. व अल्पावधीत सचिवालयातून Rationing Dept मध्ये 'Rationing Officer' म्हणून त्यांची नेमणूक झाली. Rationing Officer या पदावर राहून त्यांनी अनेक व्यक्तिमत्त्वे घडविली.

तत्पूर्वी १९६६ साली डोंबिवलीच्या कुंदा पाटकर यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. Rationing Officer म्हणून कार्यरत असताना त्यांना अनेकदा Dept कडून मान-सन्मान प्राप्त झाले. मान-सन्मानातून मिळणारी रक्कम ते मुख्यमंत्री साहाय्य निधीस देत असत.

साधी रहाणी अन् उच्च विचारसरणी ही तर श्रीपादरावांची खासियत! प्रसन्न व्यक्तिमत्त्व, माणसे जोडण्याची उपजत कला, उमदा स्वभाव आणि कठोर परिश्रम करण्याची मानसिकता ही अद्भूत देणगी विधात्याने त्यांना जन्मजात दिली आहे. त्यामुळे लहानपणापासून सहाजिकच ते समाजकार्यात ओढले गेले.

उद्योग-व्यवसाय, नोकरी, समाजसेवा ही सारी शिवधनुष्य पेलीत असताना आपल्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीकडे घारीच्या नजरेप्रमाणे त्यांचे लक्ष असायचे. ध्यानी, मनी, स्वप्नी ज्ञातीकार्य हे त्यांनी आपल्या उराशी बाळगल्यामुळे सहजिकच ते ज्ञातीकार्यात ओढले गेले. आपण आपल्या समाजाचे काहीतरी देणे लागतो, या जाणीवेपोटीच त्यांनी स्वत:ला ज्ञातीकार्याला वाहून घेतले. अशी ही व्यक्ती आजही ज्ञातीसंस्थांचा पिंपळवृक्ष आहे.

सामाजिक कार्य करताना मतभेद टाळून एक दिलाने कार्य करावे व ज्ञातीसंस्थांचा उत्कर्ष साधावा यासाठी आजही त्यांचे प्रामाणिक प्रयत्न असतात. १९६३ साली कुडाळदेशकर गौड ब्राह्मण क्रेडिट सोसायटीच्या चिटणीसपदी राहून संस्थेची भरभराट केली हे सर्वश्रुत आहे. त्याकाळात आपल्या क्रेडिट सोसायटीने १०%चा १५% डिव्हीडंट केला. आजही सोसायटीने हा निर्णय कायम ठेवला आहे हे विशेष!

गौड बाह्मण सभा, विद्यावृद्धि समाज, निराश्रित सहाय्यकारी फंड, क्रेडिट सोसायटी आदी ज्ञातीसंस्थांच्या कार्यकारिणीवर प्रतिनिधित्व करून गौड ब्राह्मण ज्ञातीची त्यांनी ४० वर्षे अविरत सेवा केली. आजही त्यांच्या सेवेत कुठेही खंड पडलेला नाही हे विशेष!

सामाजिक तसेच ज्ञातीकार्य करत असताना एका कठीण प्रसंगाला त्यांना सामोरे जावे लागले. प्रवासात एका ठिकाणी अपघात झाल्याने त्यांना मुंबईला रामराम करावा लागला. त्यांनी मालवण मुक्कामी कायम राहण्याचा निर्णय घेतला.

आपल्या सामाजिक कार्याविषयी बोलताना ज्ञातीतील काही व्यक्तींच्या नावांचा ते आवर्जून उल्लेख करत असतात. ज्ञातीतील मान्यवरांचा व विचारवंतांचा सहवास लाभल्याने त्यांना वैचारिक प्रगलभता लाभली. त्यामुळेच गेली ४० वर्षे

ज्ञातीसंस्थांच्या उन्नतीसाठी त्यांनी महान कार्य केले.

श्रीपादरावांचा ज्ञातीकार्याचा आवाका फार मोठा आहे. मुंबई, कोकण, गोवा, बेळगाव, कोल्हापूर, भूदरगड या परिसरातील ज्ञातीतील गरजू विद्यार्थ्यांना तसेच निराश्रित महिला/पुरुषांना ज्ञातीसंस्थांच्या माध्यमातून आर्थिक साहाय्य पोहचवण्याचे महान कार्य आजही ते करताना दिसतात. आज वयाच्या ७६ व्या वर्षीदेखील त्यांचा तरुणांना लाजवेल असा उत्साह व कामाचा उरक आहे. अनेक सामाजिक संस्थेवर ते कार्यरत आहेत.


सध्या १०५ वर्षात पदार्पण केलेल्या एक शैक्षणिक संस्थेत ते कार्यरत असून ह्या संस्थेच्या अशा अनेक कार्यात त्यांनी स्वत:ला वाहून घेतले आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांशी त्यांचे घनिष्ट संबंध आहेत.

हे सामाजिक कार्य करण्यासाठी प्रेरणादायी ठरलेल्या त्यांच्या प्रिय पत्नीचे (सौ. कुंदा (वंदना) अलीकडेच अल्पशा आजाराने दु:खद निधन झाल्यामुळे त्यांचा आधारवडच गेल्यासारखे झाले आहे. गौड ब्राह्मण सभेच्या १२१व्या वार्षिक स्नेह संमेलनानिमित्त त्यांच्या कार्याचा होणारा हा सन्मान पहाण्यासाठी त्यांच्या सौभाग्यवतींचे असणे महत्त्वाचे होते. पण शेवटी काय कालाय तस्मै नम: असेच म्हणावेसे वाटते.

आजवरच्या श्रीपादरावांच्या शैक्षणिक, सामाजिक, ज्ञातीकार्याला सलाम ! गौड ब्राह्मण सभेच्यावतीने त्यांच्या उत्कर्षासाठी तसेच त्यांच्या भावी कार्याला सुयश चिंतीत असताना त्यांना दीर्घायूष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

--- ---

**आदरणीय श्री. महेश मंगेश तेंडुलकर,** B.E. Electronics (इतिहास संशोधन तसेच साहित्य, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रांतील विशेष योगदानासाठी **"स्व. श्री. रावबहादूर वासुदेवराव बांबर्डेकर इतिहास संशोधन पुरस्काराने"** गौड ब्राह्मण सभेकडून सन्मानित)



तेंडुलकर या आड नावाभोवतीच तेजोवलय निर्माण करणारे त्यांचे पूर्वज, त्यांचे नातेवाईक हे आपापल्या कर्तृत्वाने वलयांकित होतेच. त्यांच्या कर्तृत्वला कुलदेवता मंगेश-महालक्ष्मी यांचा आशीर्वाद लाभला होता. अशा वलयांकित तेंडुलकरांच्या घराण्यात दि. १९ जून १९६५ रोजी दादर येथे महेश तेंडुलकरांचा जन्म झाला. परंतु त्यांचे वडील हे पुण्यात नोकरीला असल्याकारणाने त्यांचे बालपण पुण्यातल्या सुप्रसिद्ध सदाशिवपेठेत गेले. शाळा, कॉलेज आणि व्यवसाय हे सर्वकाही पुण्यातच असल्यामुळे ते पक्के सदाशिवपेठतील पुणेकर झाले.

त्यांचे घराणे हे मुळातच साहित्यिकाचे असल्याने त्यांच्या घरात नेहमी साहित्यिकांचा ये-जा असायची. त्यांचे आजोबा धोंडोपंत रघुनाथ हे तर उत्तम लेखक होते. त्यांची आजी कोकणातल्या डोरल्या गावातली. त्याकाळाला अनुसरून ती जरी निरक्षर होती तरी ती कुशाग्र बुद्धीची होती, विलक्षण हुषार होती. अगदी उतारवयात ती लिहायला-वाचायला शिकली. एके दिवशी तर तिने एकांतात बसून मोठ्या चिकाटीने ज्ञानोबा माऊलींची ज्ञानेश्वरी वाचून काढली!

पोतकरांच्या घरातून तेंडुलकरांच्या घरात सून म्हणून आलेली सुशील त्यांची आजी, त्याहीपेक्षा त्यांची शिक्षिका होती. त्यांच्या आजोबांनी लग्नात तिचे नाव बदलून सई असे ठेवले माँटेसरीपासून ते अगदी इयत्ता पाचवी-सातवी पर्यंत आजीचे लहानपणीच्या तेंडुलकरांच्या शिक्षणावर बारीक लक्ष असे. चुकांना तिने कधीच दयामाया दाखविली नाही. व्रात्यपणा केला तर ओरडायची पण चार बोटांनी कधी फटकासुद्धा मारायची नाही, फक्त त्यांच्या आईकडे तक्रार करायची. मग काय विचारता, त्यांचा आईचा मुरारबाजी देशपांडे व्हायचा अन तेंडुलकरांचा गनीम.

आजीला चार मुलगे आणि एक मुलगी होती. यापैकी थोरले रघुनाथराव, त्यांच्या पाठोपाठ लीला, मग विजय, मंगेश (त्यांचे वडील) आणि सुरेश हे मुलगे. आजोबांच्या अकाली निधनामुळे घराची जबाबदारी तेंडुलकरांच्या आत्याच्या अंगावर येऊन पडली. अविवाहीत राहून तिने शिक्षकीपेशा पत्करला अन आपल्या भावंडांच्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले. तेंडुलकरांचे थोरले काका नोकरीनिमित्त मुंबईला स्थाईक झाले. त्याकाळी महेशरावांचे घर ज्ञानेश्वरांच्या घरासारखे होते. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई एकाच घरात राहात होती

पण फरक इतकाच होता की तेंडुलकरांची लीलाबाई ही थोरली होती. आजोबांच्या अकाली निधनामुळे सर्व भावंडांना परिस्थितीची चांगलीच जाण होती अन् पैशांची किंमत होती. सरस्वती देवीच्या मुलांना लक्ष्मीदेवीचाही वरदहस्त असतो हे त्यांना उमगले होते. विजय तेंडुलकरांनी प्र. के. अत्रे यांच्या मराठा नामक दैनिकात सहसंपादक म्हणून नोकरी पत्करली आणि पत्रकारितेच्या पेशापासून पदमभूषण सारख्या सन्मानापर्यंत आपली यशस्वी वाटचाल चालू ठेवली. महेशजींच्या वडिलांनी सरकारी नोकरी पत्करून दुसरीकडे व्यंगचित्र रेखाटण्याचे आवडते काम अगदी शेवटपर्यंत चालू ठेवले. शब्दाविना संवादला व्यंगचित्रासारखा प्रभावी माध्यमाचा उपयोग करून महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतभर मोठा नावलैकिक मिळवला, मोठमोठे सन्मान अन सत्कार प्राप्त केले. धाकटे सुरेशकाका त्यांना सारेजण पुतणे-पुतण्या भाऊकाका म्हणत असत. अत्यंत साधा, सरळ आणि सज्जन माणूस म्हणून त्यांची ओळख तर होतीच. पण हॉवर्ड युनिव्हर्सिटीची अर्थशास्त्रातील डॉक्टरेट ही पदवीही त्यांनी प्राप्त केली होती. तेंडुलकर कुटुंबातले ते लालबहादूर शास्त्रीच होते. त्यांनी आपल्या शिक्षणाचा, श्रीमंतीचा किंवा त्यांना प्राप्त झालेल्या पदांचा कधीही दुरुपयोग केला नाही, की कधी आपल्या नावापुढे ''डॉक्टर'' ही पदवीसुद्धा लावली नाही. त्यांनी वर्ल्ड बँकेत उच्चपदावर काम केले, पण विदेशात स्थाईक व्हायचा विचार त्यांच्या मनाला कधीही शिवला नाही. आपल्या शिक्षणाचा, अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा लाभ आपल्या देशवासीयांना व्हावा या उद्देशाने त्यांनी दिल्ली युनिव्हर्सिटीमध्ये शिक्षकी पेशा पत्करला आणि त्यात ते कार्यरत राहिले. दिल्लीसारख्या ठिकाणी विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून मोठी ख्याती व नावलौकिक कमावला. पुण्यातील बी.एम.सी.सी. कॉलेजमधून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या त्यांच्या धाकट्याकाकाने पंतप्रधान मनमोहनसिंग, पी. चिदंबरम यांच्यासारख्या राजकारणी विद्वानांची मनं लिलया जिंकली. पण त्यांच्याकडून कधी अपेक्षा ठेवली नाही. जे त्याच्या योग्यतेने त्याना मिळाले त्यात ते कायम समाधानी राहिले अन् ज्ञानार्जनासारख्या पवित्रकार्यात शेवटपर्यंत मग्न राहिले.

महेशजींचे थोरले काका त्यांच्या जन्मापूर्वीच वारल्यामुळे त्यांना बघण्याचा प्रश्नच उद्भवत नसला तरी त्यांनी इंग्रजी विषयात मिळवलेली पदवी, त्यात प्राप्त केलेले डिस्टिंक्शन आणि एक बैठकीत त्या काळचा टाइम्स ऑफ इंडिया वाचून काढण्याची विद्वता याबद्दल त्यांनी अनेक जुन्याजाणत्या लोकांकडून एकले होते. पहिल्या प्रतीचे बुद्धिमान, गोरापान वर्ण, सरळ तरतरीत नाक, नीडर पण तसेच प्रेमळ असलेले त्यांचे थोरले काका त्यांना कधीच पाहाता आले नाहीत याची खंत त्यांच्या मनातआजही कायम आहे. ज्ञानाचा, विद्वत्तेचा आणि कर्तृत्वाचा अलौकिक वारसा लाभलेल्या तेंडुलकर घराण्यात महेशजींचा जन्म झाला याबद्दल ते ईश्वराचे आभार मानतात. या सर्वांकडून कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे महेशजींना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या आणि त्यांच्या अनुभवांच्या शिदोरीवर त्यांनी आपल्या आयुष्याची वाटचाल सुरू केली. परंतु यापैकी एकही व्यक्ती त्यांनी डोळ्यांसमोर आदर्श म्हणून ठेवली नाही. कारण त्यांना आपला आदर्श बालपणीच मिळालेला होता आणि तो म्हणजे त्यांची थोरली चुलत बहीण प्रिया! लहानवयात तिने जो नावलौकिक प्राप्त केला, साहित्यक्षेत्रात जी उंची गाठली, ज्या अथक परिश्रमानंतर जे यश मिळवले आणि जबरदस्त इच्छाशक्तीच्या जोरावर कॅन्सर सारख्या असाध्य रोगाशी झगडा दिला हे सर्व काही शब्दांच्या पलीकडले आहे.

लेखकी हे तेंडुलकर घराण्याला ईश्वराने दिलेले वरदानच आहे असे ते मानतात. त्याच्या लेखनाचे विषय वेगळे असतील, दिशा वेगळ्या असतील, प्रतिभाही एकसारखी नसेल, पण लेखनाला विचारांची जोड मात्र आजही कायम असलेली आढळेल. विजय तेंडुलकर जगप्रसिद्ध लेखक झाले ते त्यांच्या विचारांनी. त्यांनी लिहिलेली नाटके माणसांना विचार करायला लावणारी होती, भाषा प्रभावी असल्यामुळे सर्वसामान्यांना भावणारी होती. महेश तेंडुलकरांच्या वडिलांनी व्यंगचित्रांच्या माध्यमातून अनेक सामाजिक व राजकीय प्रश्नांना वाचा फोडली, शेकडो पाने लिहून जे व्यक्त होऊ शकणार नाही ते त्यांनी आपल्या ब्रशच्या एका फाराट्याने करून दाखविले. भाऊकाकांनी

तर साक्षरतेची व्याख्या बदलण्याची भूमिका मांडून भल्याभल्या विद्वानांची मती गुंग केली तर प्रियाने लेखणी हातात धरून आपल्या शैलीने महिलांचे असंख्य प्रश्न जगासमोर मांडून त्यांच्या हक्कांसाठी लढा दिला आणि अनेकजणींना न्याय मिळवून दिला. आता तर तेंडुलकर घराण्याची आदर्श परंपरा पुढे नेण्याची जबाबदारी महेशजींवर होती.

पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मराठीतून झाले नंतर पुढची दोन वर्षे पुण्यातील स.प. महाविद्यालयात आणि त्याच्या पुढची चार वर्षे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये त्यांचे शिक्षण झाले. यापैकी शेवटच्या सहा वर्षात त्यांचा मराठी भाषेशी फारसा संबंध आला नाही. फक्त बोलता, समजता येईल इतपतच तो मर्यादित राहिला. त्यावेळी जर कोणी त्यांना म्हणाले असते की एखाद्या आवडत्या विषयावर पानभर लिहून दाखव तर ते अवघडच नाहीतर अशक्य होते! एकदा तर मराठीत आठ हा आकडा कसा काढायचा असा त्यांना मोठा प्रश्न पडला! त्यानंतर मात्र त्यांनी मनाशी ठरवले की, वाटेल ते झाले तरी आपली मातृभाषा सुधारायची. पण प्रश्न अजुनही सुटत नव्हता. सुरुवात करायची कशी? वाचायचे काय? त्यावेळी त्यांच्या हाती शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेले शिवचरित्र आले आणि त्यांच्या आयुष्याला एक वेगळेच वळण लागले. एरवी सलगपणे दोन-तीन पानांचा मराठी मजकूर वाचू न शकणारे ते, त्या पुस्तकाला अक्षरशा: घोरपडीसारखे चिकटले! पूर्ण पुस्तक वाचून काढले आणि त्यांना त्यांच्या ध्येयाची जाणीव झाली. मराठीभाषेतील शब्दांची ताकद काय असते याची प्रचिती पानापानावरुन आली. साध्यासोप्या शब्दांनी मोठा अन्वयार्थ कसा सांगावा याचे आकलन त्यातून त्यांना झाले. एकीकडे आर्थाजनाकरिता व्यवसाय सुरू होता आणि दुसरीकडे शिवचरित्राची पारायण होत होती. दोन्हीकडून उदंड यश पदरी पडत होते. तरीसुद्धा काहीतरी कमी पडत असल्याची जाणीव सतत होत होती. व्यवसाय सांभाळून इतिहासाकडे वळणे धोकादायक वाटत होते. कारण कितीही झाले तरी व्यवसायातील लक्ष विभागले जाणार हे निश्चित होते. त्यामुळे करायचं काय हा त्यांच्यासमोर मोठा गहन प्रश्न होता. तेंडुलकर असल्यामुळे कोणाचे अनुकरण करायचे नाही हा हट्ट! वडिलांची, काकांची किंवा प्रियाची मदत घ्यायची नाही हा देखील पुन्हा हट्टच! अशा परिस्थितीत त्यांच्या आयुष्यात बायको नावाची एक सुंदर मैत्रीण आली आणि त्यांचे जगच बदलून गेले. त्यांच्यासारख्या माणसाबरोबर संसार करण्याचे तिने नुसते ठरविले नाही, तर तसा निश्चय केला. त्यांचा प्रेमविवाह नंतर लवकरच पार पडला. गोखल्यांची चित्रा तेंडुलकरांची मंजिरी झाली आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली.

शिवचरित्राविषयी वाटणाऱ्या कुतुहलापोटी त्यांची पावले पुण्यातील भारत इतिहास संशोधक मंडळ या ख्यातनाम संस्थेकडे वळली. व्यवसायाची वेळ संपली की, मंडळात जाऊन काही ना काही तरी नवीन वाचायची सवय लागली. त्यांना अनेक प्रश्न पडायचे पण उत्तरे देणारा सापडायचा नाही. मग एका वहीत प्रश्नांची नोंद करून वाचन कायम ठेवायचे असे त्यांनी ठरवले. पण त्याने काही त्यांचे समाधान होईना. त्यांचा हा उद्योग एका विद्वानाच्या जाणकार नजरेतून हुकला नाही. त्यांच्याशी एकही शब्द ही ते बोलले नसतानाही त्यांनी त्यांच्या मनाची घालमेल अचूक ओळखली. तहानलेला माणूस पाणी पिण्यासाठी जलाशयाकडे जातो, जलाशय त्याच्याकडे चालून येत नाही हे त्यांना ठाऊक होते. पण गुरु शिष्याच्या शोधात असतो हे मात्र कधी ऐकले नव्हते. एक दिवस न राहून त्यांना आपल्या अडचणी सांगाव्या म्हणून त्यांनी आपले पुस्तकात खुपसलेले डोके वर करून त्यांच्याकडे पाहिले आणि आश्चर्य म्हणजे त्यांनी ते काही बोलयच्या आतच संभाषणाला सुरुवात केली. काही अडचण आहे का? असा नेटका प्रश्न विचारला. अहो, प्रश्नच काय प्रश्नांचे डोंगरच्या डोंगर त्यांच्या वहितून उंचावलेले होते. त्या पैकी एक प्रश्न घेऊन ते त्यांच्याकडे गेले आणि ज्ञानाच्या भांडाराने संपन्न असलेल्या त्या विद्वानाने त्यांचा प्रश्नच सोडवला नाही, तर असे प्रश्न पडले तर काय करायचे याचे देखील मार्गदर्शन केले. प्रश्नाचे समाधानकार उत्तर मिळाले याचा आनंद मनाला होत असतानाच त्यांनी महेशजींना विचारले, चहा घेताना तुम्ही? तत्काळ होकार दिला आणि मंडळा बाहेरच्या चहाच्या दुकानात बसून भरपूर गप्पा मारल्या. त्या

सगळ्या इतिहासासंबंधीच होत्या असे नाही. सर्व विषयांवर गप्पा झाल्यावर महेशजींनी त्यांना त्यांचे नाव विचारले आणि ते नाव ऐकून त्यांच्या डोळ्यांवर आणि कानांवर विश्वास बसेना अन् आपण कोणाशी बोलतो आहोत हेच उमगेना. त्यांनीही अगदी सहजपणे आपले नाव सांगितले. गजानन भास्कर मेहेंदळे! इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, डॉ. पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर, ग. ह. खरे यांच्यासारख्या प्रकांड पंडितांच्या पंक्तीत बसण्याची योग्यता असलेल्या व्यक्तीशी आपली आज ओळख झाली या विचाराने ते पार भारावून गेले इतिहाससंशोधनाच्या कार्यात यांनाच आपले, गुरु करायचे असा त्यांनी मनोमन निश्चय केला. मग रोजच्या रोज मंडळात जाणे, गुरुजींकडून शंकांचे निरसन करून घेणे, वेगवेगळे संदर्भग्रंथ वाचून त्यातून संदर्भ काढून त्यांचा इतिहास लेखनात कसा उपयोग करायचा हे समजून घेणे वगैरे प्रकार सुरू झाले.

पाहता पाहता दोन-तीन वर्षे कशी गेली ते कळलेच नाही. गुरूजींनी त्यांना फक्त इतिहास संशोधन कसे करायचे हे शिकवले असे नाही, तर त्यांनी इतिहासाच्या व्याप्तीबरोबरच इतिहासाच्या मर्यादाही स्पष्ट केल्या. It is always good to be true' म्हणजे 'सत्य हे चांगल्यापेक्षा अधिक चांगले असते हे पटवून दिले. Facto Defacto म्हणजे काय हे उदाहरणांसह समजून सांगितले. इतिहास हा पुराव्यांनीच अचुक लिहायचा असतो याची योग्य जाणीवही त्यांनी त्यांना करून दिली. थोडक्यात गुरुजींनी त्यांचा विचार बदलला. जगात सर्वात अवघड गोष्ट जर कोणती असेल तर ती म्हणजे एखाद्याचा विचार बदलणे आणि ती गुरुजींनी त्यांच्या बाबतीत सहजपणे केली. एक दिवस स्वत: लिहिलेल्या 'श्रीराजा शिवछत्रपती' या ग्रंथाचा पहिला खंड त्यांच्या हाती सोपवला तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. तो ग्रंथ त्यांना मोठ्या पुरस्कारासारखा वाटला आणि आजही वाटत आहे. त्या दिवसापासून आपल्याला कोणताही पुरस्कार मिळाला नाही, तरी काही हरकत नाही अशी अवस्था त्यांना प्राप्त झाली. वाचन वाढवत गेले, शंकाचे निरसन होत गेले, इतिहासाचे वेगळेच चित्र डोळ्यांसमोर तरळू लागले हे सगळे होत असले तरी विचार लेखणीतून कागदावर काही उमटेना. पण योगायोग असा की, त्या उमेदवारीच्या काळात त्यांची निनादराव बेडेकरांशी ओळख होऊन पुढे त्या ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. त्यांच्याकडूनही त्यांना खूप शिकायला मिळाले. मुद्देसूद बोलणे, आपला विचार प्रभावीपणे कसा मांडायचा हे शिकणे, बोलता बोलता इतर दाखले देणे आणि लेखनाबरोबरच वक्तृत्वावरही लक्ष केंद्रित करणे अशा अनेक गोष्टी ते त्यांच्याकडून शिकले. त्यामुळे मोडीलिपीतील अक्षरांचा योग्य अर्थ लावताना त्यांना फारशी अडचण आली नाही.

व्यवसायाबरोबरच इतिहास अभ्यासाचा उद्योगही जोरात सुरू असताना अचानक महेशजींना दैनिक सामनामधून फोन आला की, आमच्या दैनिकात आपण इतिहास या विषयावर काही लेखन करू शकाल का? त्यांनी त्याला होकार दिला आणि शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था या विषयावर लेखमाला लिहिली. ती वाचकांना आवडली अशी प्रतिक्रियाही त्यांना दैनिकाच्या संपादकांकडून मिळाली. मग आत्मविश्वास आला की आपण लिहू शकतो आणि आपला विचार वाचकांना पटतो. ती लेखमाला संपते ना संपते तोच दैनिक लोकमतने किल्ल्यांवर वेगळ्या स्वरुपाच्या लेखनाची त्यांच्याकडे मागणी केली. तीही त्यांनी आव्हान म्हणून स्वीकारली आणि महाराष्ट्रातील वेगवेगळ्या किल्यांवर घडलेल्या इतिहासावर लेखमाला सुरु केली. त्याही लेखमालेला वाचकांकडून उदंड प्रतिसाद लाभला. ती लेखमाला नितीन केळकर नावाच्या प्रकाशकाने वाचून त्या लेखांचे पुस्तकात रुपांतर करावे असे सुचवून ते प्रकाशित करण्याचीही तयारी दर्शवली. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी ते मान्यही केले. लवकरच त्या लेखांनी पुस्तकाचे रूप धारण केले आणि त्याचे प्रकाशन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते एका कार्यक्रमात झाले. त्यांनी आपल्या पहिल्या पुस्तकाचे नाव 'कथा दुर्गांच्या' असे ठेवले. त्याच्या दोन आवृत्या संपल्या. नंतर त्यांनी कधी मागे वळून पाहिले नाही. कारण त्यांच्या मागे अनेक प्रकाशक उभे होते!

व्यवसाय, प्रपंच, अभ्यास, लेखन, भटकंती आणि व्याख्यान असा जीवनाचा षट्सूत्री कार्यक्रम सुरू होता. त्यांची एका पाठोपाठ एक पुस्तके प्रकाशित होत गेली.

आपले पुस्तक इतरांपेक्षा वेगळे कसे करता येईल याचे प्रयत्न सुरू झाले. नव्याविचारांची भर पडली. भटकंतीतून अनेक विषय हाती लागायला लागले, इतिहासातील विनोद ठासवले आणि लेखणी कागदांवरून घोड्यासारखी दौडू लागली. मुरारबाजी देशपांडे, संताजी घोरपडे, प्रतापराव गुजर यांच्यासारख्या सेनानींवर लेखन केले. सिंहगडावर पुस्तक लिहिले. औरंगजेबाच्या कारकिर्दीतील विनोदी किश्य यांनी हसरी मोगलाई साकारली, घंटा फक्त वाजवण्यासाठीच नसतात तर त्या अभ्यासाचा विषयही होऊ शकतो हे हिंदू देवालयातील पोर्तुगीज घंटावरून दाखवून दिले. गडांच्या अणि मंदिरांच्या दरवाजांवर फक्त शिलालेखच लावत नसत, तर द्वारशिल्पही तिथे असत या बद्दल लोकांना जाणीव करून देण्याकरिता गड-मंदिरांवरील 'द्वारशिला' हे पुस्तक लिहिले. शिवछत्रपतींच्या स्वराज्यकार्यातील दुर्गांचे महत्त्व पटवून देणारे साद शिवकालीन दुर्गांची' अन् 'शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था' अशी दोन पुस्तके शिवशाहीर आणि शिवभूषण (निनादराव बेडेकर) यांना अर्पण केली. भटकंतीतून मिळालेला आनंद आदर्श असणाऱ्या प्रियाला अर्पण करता करता 'भटकंती अनलिमिटेड' साकारले. ज्या प्रकाशन संस्थेच्या सावलीत राहून हे लेखनकार्य केले त्या संस्थेच्या संचालिका दिवंगत अंजली घाटपांडे यांना 'भटकंती कुडाळ-वेंगुर्ल्याची' हे पुस्तक अर्पण केले. सावलीसारखी त्यांना साथ देणाऱ्या आपल्या पत्नीला 'तेंडुलकर' झाल्याबद्दल गोव्यातील पर्यटन अर्पण केले. ज्यांच्यामुळे त्यांना त्यांची पत्नी मिळाली त्या सासूबाईंना त्यांनी किल्ल्यांच्या दंतकथा अर्पण केल्या आणि गडांवरील चढाई उतराईत त्यांना जीवाभावाची साथ देणाऱ्या मित्रांनाही दोस्तीखात्यात पुस्तके अर्पण केली. जसजशी पुस्तकांची संख्या वाढत गेली तसतशी संधी मिळत गेली. त्या संधीचा वेळेवर उपयोग करून घेऊन वेगवेगळ्या विषयांना यशस्वीपणे भिडले, आव्हाने स्वीकारली आणि पुरस्कारही त्यांना प्राप्त झाले.


एखादी भाषा शिकल्यावर ज्ञानाचे मोठे भांडार आपल्याकरिता खुले होते! हे गुरुजींचे वाक्य, त्याचे तंतोतंत पालन करून ते फारसी भाषा शिकले. मुळाक्षरांपासून सुरुवात करून आदिलशाही फर्माने वाचण्यापर्यंत त्यांनी मजल मारली. उजवीकडून डावीकडे वाचायचे आणि त्यांचा डावीकडून उजवीकडे मराठीत अर्थ लिहायचा हा उद्योग सुरू केला. दरम्यान मराठी संस्कृत शिलालेखांच्या विश्वात ते रमले, शिवकालीन दुर्गपत्रे उलगडून दाखविली, इतिहासातील प्राण्यांचे योगदान जगासमोर आणले, उद्‌गारांमधून अनेक दुर्ग साकारले. या सर्वांतून खूप आनंद मिळाला, सन्मान प्राप्त झाले आणि हा सरस्वतीदेवीचा पुत्र फक्त नावालाच नाही, तर खरोखरच पुत्रच आहे हे निंदकांना त्यांनी दाखवून दिले.

आतापर्यंतचा त्यांचा हा लेखन प्रवास असा होता. अपेक्षांची ओझी त्यांच्या डोक्यावर होती. परंतु आत्मविश्वास, चिकाटी, ज्ञान मिळवण्याची तीव्र लालसा, सामाजिक बांधिलकीची जाणीव यांनी ती ओझी ते समर्थपणे पेलू शकले. यशाला शॉर्टकट नसतो हे जाणून वेळ वाया घालवला नाही. आपल्याला शेवटपर्यंत काम करीत राहायचे आहे असा मनाशी निश्चय केला. प्रसिद्धी मिळाली तीचा स्वीकार केला पण यशाने हुरळून गेले नाहीत की अपयशाने खचून गेले नाहीत, चुका दुरुस्त करून पुढे वाटचाल करीतच राहिले. प्रसिद्धी हेच यश असे कधी मानले नाही. उलट यश चांगल्या कामात दडलेले असते त्याची त्यांना वेळोवेळी प्रचिती आली. कोणत्याही भाषेचा, व्यक्तींचा द्वेष त्यांनी कधी केला नाही. त्यामुळे सगळ्यांकडून भरभरून प्रेम मिळाले, सहकार्यही मिळाले. निर्व्यसनी राहून हे करता आले याबद्दल ईश्वराचे आभार मानायलाही ते कधी विसरत नाहीत. स्वत:च्या अल्पप्रौढीसाठी लेखणी कधीच हातात घेतली नाही. हेच तर त्यांच्या यशाचे खरे गमक आहे. जीवनप्रवास असाच शेवटपर्यंत चालावा तसेच त्यांच्या कुलदेवतेच्या आशीर्वादाने त्यांना दिर्घायू आरोग्य लाभावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

--- ---

**आदरणीय मुख्याध्यापक**

**श्री. काशीनाथ आत्माराम सामंत**



M.A.BEd

(शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रांत तसेच गौड ब्राह्मण ज्ञाती संस्थांच्या कार्यात विशेष योगदानासाठी गौड ब्राह्मण सभेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या

'स्व.बा.नी. देसाई आदर्श समाज सेवक पुरस्कारा'ने सन्मानित

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ येथील माजी मुख्याध्यापक श्री. काशीनाथ आत्माराम सामंत हे आपल्या ज्ञातीतील एक विलक्षण व्यक्तिमत्त्व!

गेली ३८ वर्षे शिक्षण क्षेत्रात अध्यापनाचे काम करत असताना सांस्कृतिक, सामाजिक तसेच गौड ब्राह्मण ज्ञातीसाठी त्यांनी केलेले कार्य न विसरण्याजोगे आहे. त्यांनी आपल्या या अध्यापनाच्या कार्यातून अनेक व्यक्तिमत्त्वे घडविली आहेत हे विशेष!

श्री. काशीनाथ आत्माराम सामंत हे मुळचे कुडाळ तालुक्यातील पिंगुळी गावचे जन्म दि. २६.७.१९३९ त्यांचे वडील श्री. आत्माराम सामंत उर्फ अण्णा साळगावकर हे कुडाळ बाजारपेठेतील एक प्रतिष्ठीत व्यापारी, आई इंदिरा गृहिणी, ५ भाऊ, ४ बहिणी असा त्यांचा परिवार.

त्यांचे प्राथमिक शिक्षण पिंगुळी येथे तर माध्यमिक, शिक्षण कुडाळ येथे झाले. पुढे कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजमधून त्यांनी 'B.A' ची पदवी संपादन केली. त्यानंतर पुणे येथील Ferguson College मधून ते M.A. झाले. अशी आहे त्यांची शैक्षणिक वाटचाल.

त्यानंतर ते कुडाळ येथील हायस्कूलमध्ये शिक्षकपदी रूजू झाले आणि अल्पावधीतच ते एक आदर्श शिक्षक म्हणून नावारुपाला आले. इतिहास, भूगोल, नागरिक शास्त्र, राज्यशास्त्र हे विषय शिकविण्यात त्यांचा विशेष हातखंडा होता. पुढे १९८७ साली त्यांचे या क्षेत्रातील कार्य लक्षात घेऊन सिंधूदुर्ग जिल्हा परिषदेने त्यांना आदर्श शिक्षकाच्या पुरस्काराने गौरविले. १९९५ साली तर त्यांना महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ३८ वर्षे अध्यापनाचे तर १९ वर्षे मुख्याध्यापक पदावर कार्यरत राहून त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वत:चा ठसा उमटविला.

श्री. काशीनाथ सामंत हे सध्या खालील सामाजिक आणि व्यवसायिक संस्थांवर कार्यरत आहेत.

बाबा वर्दम थिएटर्स, कुडाळ या नामांकित नाट्य संस्थेचे संस्थापक, सदस्य रोटरी क्लब ऑफ कुडाळ-माजी अध्यक्ष, Assistant governor, chartered member. पिंगुंळी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष म्हणून पिंगुळी गावाला तंटामुक्त गाव पुरस्कार मिळवून दिला. पिंगुळी ग्राम शिक्षण समिती माजी अध्यक्ष महाराष्ट्र शासनांच्या इयत्ता दहावी निकाल सुधार समिती वर समाजशास्त्र विषयाचे तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले. कुडाळदेशस्थ आद्य गौड ब्राह्मण युवा प्रतिष्ठान, कुडाळ चे ते मार्गदर्शक होते.

यावरून त्यांच्या सामाजिक कार्याची चुणूक दिसून येते. शिवाय उत्तम व्हॉलिबॉलपटू, उत्तम लेदर बॉल क्रिकेटपटू ही त्यांची विशेष ओळख. त्यांची वक्तृत्व शैली तर विशेष वाखाणण्याजोगी आहे.

सामंत सरांच्या आजवरच्या ३८ वर्षातील शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांतील कार्याला सलाम! गौड ब्राह्मण सभेच्यावतीने आम्ही त्यांच्या भावी कार्यात सुयश चिंतित असताना त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

--- ---

**आदरणीय श्री. हेमंत गजानन सामंत**



(गौड ब्राह्मण ज्ञाती कार्यकर्ते)

(शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रांत तसेच ज्ञाती संस्थांच्या कार्यात विशेष सहभागासाठी गौड बाह्मण सभेकडून दिल्या जाणाऱ्या 'स्व. सूर्याजी रामकृष्ण उर्फ काका कोचरेकर आदर्श समाजसेवक पुरस्कारा'ने सन्मानित)

गेली कित्येक वर्षे स्वत:चा नोकरी-व्यवसाय सांभाळुन ज्यांनी ज्ञाती कार्याला वाहून घेतले आहे ते श्री. हेमंत गजानन सामंत एक आगळंवेगळं व्यक्तिमत्त्व आहे. ज्ञाती कार्यासाठी जी एक जाण असावी लागते ती त्यांच्यामध्ये ओतप्रोत भरलेली दिसते. सध्यातर कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सभा, विक्रोळी या संस्थेचे सर्वेसर्वा आहेत. अशा गुणी कार्यकर्त्याचा गौड ब्राह्मण सभेच्या व्यासपीठावरून त्यांच्या ज्ञाती कार्याचा सत्कार-सन्मान होतो आहे ही एक मनाला आनंद देणारी बाब आहे.

श्री. हेमंत गजानन सामंत ह्यांचा जन्म जरी मुंबईचा असला तरी त्यांचे मूळ गाव गोवा राज्यातील तांबोसे गावचे होय.

त्यांचे प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षण मुंबई येथे झाले. बी.कॉम, डिप्लोमा इन मटेरियलस मॅनेजमेंट हा अभ्यासक्रमदेखील त्यांनी अल्पावधीत पूर्ण केला.

संध्या गेली ३५ वर्षे 'प्रिमियर लि.' या कंपनीत लिगल डिपार्टमेन्टमध्ये मॅनेजरपदी कार्यरत आहेत.

ऑफीस कामानिमित्त देशातील विविध शहरांना भेट देण्याचा त्यांना योग आला. तसेच कंपनीच्या कामासाठी हायकोर्टापासून सुप्रीम कोर्टाच्या कामाचा अनुभव घेण्याची संधी त्यांना प्राप्त झली.

उद्योग-व्यवसाय, नोकरी सांभाळत असताना त्यांची पाऊले ज्ञाती कार्याकडे वळली. १९८५ साली त्यांनी कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सभा विक्रोळी संस्थेचे सभासदत्त्व स्वीकारले. संस्थेचे त्यावेळचे कार्यवाह स्व.श्री. मनोहर रा. खानोलकर यांची कार्यपद्धती पाहून ते प्रभावित झाले. त्यांना ज्ञातीबद्दल असणारी कळकळ, त्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची तयारी, कामामध्ये सचोटी या गुणांमुळे हेमंत सामंत भाराऊन गेले. ज्ञातीकार्यासाठी तेच त्यांचे प्रेरणास्थान बनले. आज जवळजवळ ३३ वर्षे विक्रोळीच्या ज्ञाती संस्थेत ते सक्रिय आहेत. स्व. श्री. मनोहर रा. खानोलकर यांच्या व्यतिरिक्त स्व. श्री. दत्तात्रय नि. प्रभु, श्री. गणेश खानोलकर, श्री. महाजन, श्री. जनार्दन सामंत यांच्यासोबत काम करण्याची संधी प्राप्त झाली ते स्वत:चे अहोभाग्य समजतात. आज ते कु.दे. गौ. ब्रा. सभा, विक्रोळी संस्थेवर कार्यवाह म्हणून कार्यरत आहेत.

संस्थेची सभासद संख्या वाढविण्यासाठी त्यांनी एक विशेष योजना राबवली. त्यासाठी ज्ञातिबांधवांच्या घरी भेट देणे, त्यांना संस्था करीत असलेल्या कार्याची माहिती देणे, ज्ञाती कार्यासाठी ज्ञातीतील तरुणांना प्रोत्साहित करणे, संस्थेच्यावतीने वार्षिक सहल, ज्ञातीतील बटूंसाठी सामुदायिक मौजीबंधन सोहळा या सारखे अनेक उपक्रम राबवून ज्ञातीबांधवांना संघटित करून त्यांना एकत्र जोडण्याचे काम केले.

सन १९८९ साली सध्याची ज्ञातीची विक्रोळी संस्था धर्मादाय आयुक्त मुंबई यांच्याकडे नोंदवून तिला चॅरिटेबल ट्रस्टचा दर्जा प्राप्त करून देण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

सध्या संस्थेच्या सभासद असलेल्या सर्व ज्ञातीबांधवांची माहिती गोळाकरून ती संगणकामध्ये कायमस्वरूपात साठवून ठेवणे, संस्थेची घटना सुटसुटीत करून ती धर्मदाय आयुक्तांच्या कार्यालयातून संमत करून घेणे, आयकर कार्यालयातून '१२ अ' ची मंजुरी घेणे आदी उपक्रम त्यांनी हाती घेतले आहेत.

ज्ञाती संस्थांव्यतिरिक्त ते अनेक सामाजिक संस्थांवर कार्यरत आहेत. श्री. श्री. रविशंकर यांच्या 'आर्ट ऑफ लिव्हींग' या संस्थेशी गेली १० वर्षे ते संलग्न आहेत.

आपली नोकरी सांभाळून आपले संपूर्ण आयुष्य सामाजिक व ज्ञातीकार्यासाठी त्यांनी वाहून घेतले असले तरी त्याचा कुठेही ते गाजावजा करीत नाहीत.


प्रसिद्धीपासून ते दोन हात नेहमीच दूर असतात. अशा या गुणी ज्ञाती कार्यकर्त्याचा ज्ञातीबांधवांना परिचय व्हावा म्हणून हा लेख प्रपंच.

श्री. हेमंत सामंत यांना त्यांच्या भावी कार्यात उत्तम यश लाभो अशी मनोमन इच्छा प्रदर्शित करताना त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

--- ---

**आदरणीय श्री. कृष्णाजी नारायण पाटकर**

(गौड ब्राह्मण ज्ञाती कार्यकर्ते)



(सांस्कृतिक, सामाजिक तसेच कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञाती कार्याला विशेष योगदानासाठी सभेतर्फे दिल्या जाणाऱ्या '**स्व. श्री. डी.पी. नाईक आदर्श स्वयंसेवक पुरस्कारा**'**ने** सन्मानित)

गौड ब्राह्मण सभेतर्फे दिला जाणारा या वर्षाचा (२०१८) ''स्व.श्री.डी.पी. नाईक स्वयंसेवक पुरस्कारा''साठी बोरिवलीमध्ये सर्वांना सुपरिचित असलेले आपल्या ज्ञातीतील एक ज्येष्ठ ज्ञाती कार्यकर्ते श्री. कृष्णाजी नारायण पाटकर यांची निवड झाल्याबद्दल सभेतर्फे त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!

श्री. कृष्णाजी पाटकर हे मूळचे कुडाळ तालुक्यातील पाट गावचे. त्यांचा जन्म दि. १४ नोव्हेंबर १९४८ चा. शालेय शिक्षणानंतर ते पुढील शिक्षणाकरिता मुंबईत येऊन दाखल झाले. त्यानंतर ते लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनी, पवई येथे

रूजू झाले. कंपनीचे काम करत असताना कामगार कर्मचारी संघटनेचे काम करण्याची संधी त्यांना चालून आली. पुढे आपल्या कर्तबगारीच्या जोरावर ते संघटनेचे पदाधिकारी देखील बनले. त्यानंतर कंपनीच्या ३६ वर्षांच्या सेवेतून ते निवृत्त झाले.

स्वत:चा नोकरी व्यवसाय सांभाळत असताना अचानकपणे ते ज्ञाती कार्यात ओढले गेले आणि ते रमले देखील. आज गेली कित्येक वर्षे ते बोरिवलीच्या ज्ञाती संस्थेवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. सध्या ते ज्ञाती संस्थेच्या वेबसाईटचे काम करत असून ज्ञातीतील वधू-वरांची सूची संगणकावर त्यांनी अद्ययावत केली आहे. ज्ञातीबांधवांच्या सतत संपर्कात राहून त्यांना ज्ञाती कार्यात सक्रिय करण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात हे विशेष! देशातील सर्व कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीबांधवांची एकच वधू-वर सूची व वेबसाईट तयार करण्याच्या कामाला त्यांनी सुरूवात केली आहे.


आपल्या ज्ञातीविषयीच्या त्यांच्या तळमळीबद्दल त्यांना मिळालेला पुरस्कार त्यांच्या कार्याला मिळालेली पोचपावाती आहे.

त्यांच्या ह्या सन्मानानिमित्त सभेच्यावतीने त्यांना हार्दीक शुभेच्छा देतानाच त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या कुलदेवतेच्या आशीर्वादाने त्यांना दीर्घायू लाभावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना !

--- ---

**'सन' २०१८ साली मलेशिया येथे संपन्न झालेल्या ३२व्या 'मलेशिअन ओपन मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धे'मध्ये ज्यांनी मानाचे स्थान पटकावून पदकांचे मानकरी ठरले ते आपल्या गौड ब्राह्मण ज्ञातीतील दोन महान क्रीडापटू श्री. चारूदत्त वामन शेणई (तिरोडा) व श्री. गणेश मनोहर प्रभुखोत (नांदगाव) यांनी आपली आर्थिक परिस्थिती बिकट असतानादेखील अनेक अडचणींना तोंड देत अत्यंत जिद्दीने सदर स्पर्धेत भाग घेऊन यशस्वी झाल्याबद्दल, गौड ब्राह्मण सभेतर्फे दिल्या जाणाऱ्या (क्रीडा क्षेत्रात नैपुण्य संपादन करणाऱ्या ज्ञातीतील क्रीडापटूंना) 'समाज भूषण पारितोषिक पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्ताने ह्या दोन्ही क्रीडापटूंच्या क्रीडा क्षेत्रातील कार्याचा हा आढावा!**

**श्री. चारूदत्त वामन शेणई (तिरोडा)**



श्री. चारूदत्त वामन शेणई हे मूळचे सावंतवाडी तालुक्यातील तिरोडा गावचे. जन्म दि. १९.१२.१९७७ चा शिक्षण : बी.ए. (अर्थशास्त्र)

**कौटुंबिक माहिती :** श्री. चारुदत्त यांना घडविण्यात त्यांचे वडिल श्री. वामन शेणई आई सौ. राधा, भाऊ बाळकृष्ण यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच त्यांची पत्नी सौ. सुखदा व बहिण सौ. शीतल ह्या देखिल त्यांना प्रोत्साहित करीत असतात.

**बालपण व शिक्षण:** तिरोडा गावातील जि. प. शाळा नं. १ मध्ये त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले तेव्हा पासूनच त्यांना खेळाची आवड होती. इयत्ता ५ वी मध्ये विद्याविहार हायस्कूल आजगाव येथे शिक्षणाला प्रारंभ केला. ते खेळात व अभ्यासातसुद्धा हुशार होते. १० वी पर्यंत त्यांनी अनेक जिल्हा स्तरापर्यंत स्पर्धेत सर्टिफिकेटं मिळवली बास्केट बॉल, खोखो सोबत लांब उडी, उंच उडी या खेळांत प्रावीण्य मिळवले. तसेच ११वी १२ वीसाठी गोगटे एज्यू. कॉलेज, शिरोडा येथे असताना उंच उडीत जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला आणि यानंतर खऱ्या अर्थाने खेळाविषयी प्रेम निर्माण झाले.

**कॉलेज जीवन:** १२ वी नंतर कॉलेज शिक्षणासाठी सावंतवाडीतील श्री. पंचम खेमराज महाविद्यालया मध्ये त्यानी प्रवेश घेतला आणि येथे प्रोफेशनल स्पर्धा कशा खेळाव्यात हे समजू लागले. कॉलेजमध्ये असताना तीन वर्षात युनिवर्सिटींची तब्बल ११ पदके पटकावली. यामध्ये उंच उडी, लांब उडी, तिहेरी उडी, हर्डल्स या स्पर्धामध्ये ते भाग घेत असत.

कॉलेज जीवनात खेळाविषयी प्रेम व आस्था असणारे अनेक मित्र त्यांना मिळत गेले. यामधूनच 'जागृती' क्रीडा मंडळा'ची (वेंगुर्ला) स्थापना झाली आणि ओपन मिट खेळू

लागले. तेव्हा कामगार कल्याण स्पर्धा, अमॅच्युअर असोशियेशन स्पर्धा अशा प्रकारे अनेक स्पर्धेत जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावर त्यांनी भाग घेतला. राज्य स्तरावर १३ सुवर्ण, ११ रौप्य, ४ कास्य पदके त्यांनी पटकावली.

**निराशा:** सिधुदुर्ग जिल्ह्यातील खराब मैदाने, न मिळणारे मार्गदर्शन व टेनिस क्रिकेट सोडून इतर खेळांना न मिळणारे आर्थिक पाठबळ यासर्व गोष्टीवर मात करून वरील सर्व यश मिळवून सरकारी नोकरी मिळेल यासाठी सतत प्रयत्न करूनही कोणतीही नोकरी न मिळाल्याने कंटाळून स्पर्धा खेळणे सोडून दिले. या गोष्टीची खंत सतत त्यांच्या मनाला टोचत राहीली.

**१७ वर्षांनी परत मैदानात:** प्रापंचिक जीवनात अडकल्यानंतर खेळाला अल्प विराम दिला आणि १७ वर्षांनी मुंबईच्या वास्तव्याला असलेले त्यांचे मित्र श्री. प्रशांत सारंग, श्री. निलेश म्हसकर व श्री. गणेश प्रभूखोत यांनी ठाणे मास्टर्समध्ये त्यांना सामावून घेतले. तब्बल १७ वर्षांनी ते परत मैदानात उतरले आणि येथेच खेळाचे चीज झाले. मंगलोर (कर्नाटक) मध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत उंच उडीत सुवर्ण पदक, तिहेरी उडीत रौप्य पदक, लांब उडीत कास्य पदक मिळवले आणि गेली ४० वर्षे आंतरराष्ट्रीय स्पर्धा खेळून पदक मिळवावे हे त्यांनी बघितलेले स्वप्न, आता पूर्णत्वास येणार होते.

मलेशिया येथे संपन्न झालेल्या ३२ व्या ‘मलेशिअन ओपन मास्टर्स ॲथलेटिक्स चॅम्पिअनशिप २०१८ ही स्पर्धा खेळायला जाताना अनेक अडचणी आल्या त्यावर मात करून उंच उडीत सुवर्ण व तिहेरी उडीत कास्य अशी दोन पदके प्रथम प्रयत्नातच संपादित केली. देवता, आई वडील यांचे आशीर्वाद, कुटुंब आणि मित्र परिवार यांच्या सहकार्यानेच हे यश त्यांना संपादित करता आले.

**संदेश/मनोगत:** खेडेगावातील तळकोकणातील एखादा माणूस वयाच्या ४० व्या वर्षी आपल्या उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण करू शकतो. म्हणून आत्ताच्या तरूण पिढीला ते एकच संदेश देतात की... निराश होऊ नका. आत्मविश्वास, योग्य प्रयत्न व मेहनत यातून तुम्ही कोणतेही यश संपादित करू शकता. मोबाईल, कॉम्प्यूटर मधून बाहेर या. मैदानात धावा, चाला, उड्या मारा जरी तुम्हाला पदक नाही मिळाले तरी शारीरिक तंदुरुस्ती तरी नक्की मिळेल.

--- ---

**श्री. गणेश मनोहर प्रभुखोत** (नांदगाव, कणकवली)



श्री. गणेश मनोहर प्रभुखोत हे कणकवली तालुक्यातील नांदगावचे. जन्म दि. १५.१२.१९७८ चा. कणकवली तालुक्यातील कासार्डे हे त्यांचे जन्मगाव.

शिक्षण : बी.ए. (इतिहास)

**कौटुंबिक माहिती :** वडील श्री. मनोहर रामचंद्र प्रभुखोत आई सौ. मनिषा त्यांना घडविण्यात व खेळात पाठबळ देण्यात सर्वांत महत्त्वाचा वाटा आई वडिलांचा आहे. बहीण सौ. अंजली सतत त्यांना प्रोत्साहित करीत असतात.

**बालपण व शिक्षण :** नांदगाव गावातील जि. प. शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण झाले. इयत्ता ५वी ते १०वी पर्यंतचे शिक्षण सरस्वती हायस्कूल, नांदगाव येथे झाले. १०वी पर्यंत शालेय स्तरापर्यंत स्पर्धेत सर्टिफिकेट मिळाली खोखो सोबत लांब उडी, धावणे या खेळात प्रावीण्य मिळाले. तसेच ११ वी व १२वी पर्यंतचे शिक्षण एस. एम. हायस्कूल, कणकवली येथे झाले. येथे पण कॉलेज स्तरावरील स्पर्धेत सर्टिफिकेटस मिळाली.

**कॉलेज जीवन :** १२वी नंतर त्यांनी कणकवली कॉलेज, मध्ये प्रवेश घेतला ते सतत ३ वर्षे ते कॉलेजचे चॅम्पियन होते. २ वर्षे कॉलेज आणि विभाग स्तरापर्यंत त्यांनी स्पर्धा जिंकल्या. पण म्हणावे तसे यश त्यांना मिळत नव्हते. कॉलेजच्या शेवटच्या वर्षी म्हणजे १९९९ मध्ये त्यांची भेट चारूदत्त शेणई, प्रशांत सारंग आणि निलेश म्हसकर यांच्याशी झाली आणि त्यांच्याकडून त्यांना मार्गदर्शन मिळत गेले व प्रोफेशनल स्पर्धा कशा खेळाव्यात हे समजले. कॉलेज मध्ये विविध स्पर्धामध्ये ते भाग घेत असत. सोबत जागृती क्रीडा मंडळ वेंगुर्ले, कामगार क्रीडा मंडळ यांच्या मार्फत राज्य स्तरीय स्पर्धा खेळले. पदवीत्तर शिक्षणासाठी त्यांनी देवगड येथील स.ह. केळकर महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्या वर्षी त्यांना कॉलेजच्या

विभागीय स्तरावर चॅम्पिनशीप मिळाली पण त्यावेळी रत्नागिरी येथे खेळताना तिहेरी उडी या खेळप्रकारात त्यांना अपघात होऊन त्यांच्या पायाचे हाड मोडून फॅक्चर झाले आणि त्यावेळेपासून त्यांच्या खेळण्याला ब्रेक लागला. नोकरी निमित्त ते २००५ साली मुंबई मध्ये आले.

**१८ वर्षांनी परत मैदानात :** पायाला झालेल्या अपघातामुळे ते पुन्हा कधी खेळतील असे त्यांना कधीच वाटले नाही. कॉलेज मधील मित्र आणि खेळामधील मार्गदर्शक प्रशांत सारंग यांनी त्यांना ठाणे मास्टर्स मध्ये सामावून घेतले. तब्बल १८ वर्षांनी ते परत मैदानात उतरले आणि येथेच खेळाचे चीज झाले. मँगलोर, कर्नाटकमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत त्यांना रौप्यापदक व कास्यपदक मिळाले.

मलेशिया येथे संपन्न झालेल्या ३२ व्या मलेशियन ओपन मास्टर्स ॲथलेटीक्स चॅम्पियनशींप-२०१८ लांब उडी व तिहेरी उडीमध्ये कास्यपदक अशी दोन पदके प्रथम प्रयत्नातच त्यांनी संपादीत केली. देवतांचे व आईवडिलांचे आशिर्वाद, कुटुंब आणि त्यांचे मित्रपरिवार यांच्या सहकार्यानेच त्यांनी हे यश संपादित केले. त्यामुळे त्यांचे तसेच अध्यक्ष गौड ब्राह्मण सभा, गिरगाव आणि श्री. मनीष दाभोलकर साहेब यांचे ते शतश:ऋणी आहेत.

-संकलन : **श्री. सुभाष दत्तात्रय वाघ**
गोरेगाव (पूर्व), भ्रमणध्वनी: ९९०७५२४७९

## 'श्रीमठ संस्थान दाभोली'
## या संस्थेच्यावतीने सामुदायिक उपनयन विधी सोहळयाचे आयोजन


'श्रीमठ संस्थान दाभोली' या ज्ञाती पीठाच्यावतीने दि. १४ मे व दि. २१ मे २०१९ रोजी ज्ञातीतील बटूंसाठी सामुदायिक उपनयनविधी सोहळा श्रीमठामध्ये आयोजित करण्यात आला असून यासाठी बटूंच्या पालकांनी आपली नावे श्रीमठात नोंदवावीत अशा आशयाची सूचना 'श्रीमठ संस्थान दाभोली' या संस्थेच्या कार्यवाहांनी एक पत्रकाद्वारे केली आहे. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा ही विनंती.

१) श्रीमठ संस्थान दाभोली- ०२३६६/२६२२४१
२) श्री. सतीश श्रीपाद सामंत- ९४२०८२१६९८
३) श्री. सदानंद प्रभाकर सामंत- ८१४९१६९३८२

॥ श्री गणेशाय नम: ॥ ॥ श्री राम प्रसन्न ॥

## संस्थान श्रीराम मंदिर, अर्नाळा

(स्थापना : चैत्र शु. ८, शके १८०६, सन १८८४)
रजि. क्र. ए. - ९७ (ठाणे)



स.न.वि.वि.

सालाबादप्रमाणे ''श्री रामनवमीचा १३५ वा उत्सव'' चैत्र शु.१ शके १९४१, शनिवार दिनांक ६ एप्रिल २०१९ पासून सुरू होईल. तरी आपण आपल्या स्नेहीजन परिवारासह अवश्य येण्याचे करावे.

कळावे, ही विनंती.

अरनाळा,
चैत्र शु. १
शके १९४१

आपला नम्र
**देवदत्त भास्कर सामंत**
(अध्यक्ष, संस्थान श्रीराम मंदिर, अरनाळा)

**उत्सवाचाकार्यक्रम**

**किर्तन –** शनिवार चैत्र शु.१, दि. ६ एप्रिल २०१९ ते शुक्रवार चैत्र शु. ७ दि. १२ एप्रिल २०१९ पर्यंत संध्याकाळी ४ ते ६ (ह.भ.प. ज्योत्स्ना मोदले)

**वाढदिवसा निमित्त प्रवचन–** शुक्रवार दि. १२ एप्रिल २०१९ सकाळी १०.०० वा.

**जन्मदिवसा निमित्त किर्तन–** शनिवार दि. १३ एप्रिल २०१९ सकाळी १०.०० वा.

**श्रींच्या पालखीची मिरवणुक–** रात्रौ ८.३० वा.

**ललीत किर्तन व तीर्थप्रसाद–** रविवार दि. १४ एप्रिल २०१९ रोजी सायं. ५ ते ७ वा.

**हनुमान जयंती–** शुक्रवार चैत्र पौर्णिमा दि. १९ एप्रिल २०१९ रोजी.

**किर्तन–** गुरुवार दि. १८ एप्रिल २०१९ रोजी सायं. ४ ते ६ व शुक्रवार दि. १९ एप्रिल २०१९ रोजी पहाटे ५.०० वा. जन्म दिनानिमित्त कीर्तन.

वरील कार्यक्रमाशिवाय चैत्र शु. १ ते ८ शके १९४१ दि. ६ एप्रिल ते १३ एप्रिल २०१९ पर्यंत श्री रामरायाची पूजा, अभिषेक, आरती इ. धार्मिक विधी होतील.

**सूचना–** ऐच्छिक दान-देणगी/सुंठवडा प्रसाद/ अन्नदान/ रोषणाई वगैरे धार्मिक कार्याच्या देणगीसाठी संस्थेशी संपर्क साधावा.

**संपर्क: ९८२०२८९८६५ / ९०२८९८८६६९**

# उत्कंठा-उत्साह-जल्लोष आणि बंधुभावाच्या वातावरणात ।। गोव्यातील KPL-2019 सोहळा संपन्न ।।

– वीणा दाभोलकर

**वातावरण निर्मिती–**

ऑगस्ट २०१८ ला वाजलेल्या KPL-2019 च्या बिगुलचे स्वर दूरदूर पसरलेल्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञाति बांधवांपर्यंत पोहचले आणि सर्वात एक उत्साहाचं वातावरण निर्माण झालं. महाराष्ट्र, गोवा, बेळगाव, मंगलोर असे दूरवर स्थायिक कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातिबांधव ह्या नवचैतन्या लाटेवर स्वार होऊन आपआपल्या परीने KPL-2019 वर आपली छाप उमटवण्याच्या दृष्टीने तयारी करू लागले तर तिथे गोयंकर ज्ञातिबांधवही KDGB उन्नती मंडळाचे गोवा अध्यक्ष श्री. विश्वनाथ तुकाराम प्रभु यांच्या मार्गदर्शना खाली KPL-2019 Super-duper यशस्वी करण्यासाठी कंबर कसून कामाला लागले.

**अशी केली तयारी–**

आदरातिथ्य ही गोयकरांची खासियत! KDGB उन्नती मंडळाच्या सदस्यांनी KPL-2019 करिता एक खास समिती स्थापन केली. सर्वांशी नेहमीच प्रेमाने व आदराने वागणाऱ्या हसतमुख दीपराज प्रभूकडे KPL-2019 समितीचं अध्यक्षपद दिलं गेलं. हां.... हां म्हणता विकास प्रभू, मंदार पाटील, जगन्निवास पाटील, वैभव सामंत, सिद्धेश सामंत, श्रीपाद सामंत, किशोर तेंडोलकर, संकेत तेंडोलकर, नीतिन देसाई, वसंत तेंडोलकर.... अशा खंद्या कार्यकर्त्यांची फौज दीपराजच्या खांद्याला खांदा लावून उभी राहिली. सोबत वि.तु. प्रभू दादांची देखरेख व मार्गदर्शन ह्या सर्वांच्या पाठीशी उभं होतंच. त्यातूनच नियोजन बद्ध कार्याची मेढ रोवली गेली.

KPL-2019 च्या सोहळ्याकरिता उपस्थित रहाणाऱ्या मान्यवर पाहुणे मंडळी, खेळाडू यांची रहाण्याची, खाण्या-पिण्याची सोय करणं, क्रिकेट करिता मैदान शोधणं, स्वत:च्या हाताने शेणाने सारवून खेळपट्टी तयार करणं, बॅडमिंटन आणि टेबल टेनिस सामन्यांकरिता योग्य जागेचा शोध घेणं व त्यांच्यासाठी 'कोर्ट' तयार करणं... ह्या आणि अशा अनेक कामांचा फडशाच ह्या तरुण ब्रिगेड सदस्यांनी पाडायला सुरुवात केली. अडचणी आल्या पण पठ्ठे डगमगले नाहीत. उलट त्यावर मात करीत नियोजनबद्ध कार्यक्रम उभा केला.

**आणि तो क्षण आलाच!**

अशा रितीने क्रीडा स्पर्धांचा क्षण येऊन पोहोचलाच. सर्व संमतीने आधी ठरलेल्या १९-२० जानेवारी ह्या तारखेसोबत १८ जानेवारी ही तारीखाही KPL-2019 च्या तारखांत समाविष्ट केली गेली.

१८ जानेवारी २०१९ च्या सकाळपासूनच फोंडा (गोवा) येथील निरंकाल भागातील किर्ती हॉटेलमध्ये देशभरातील कुडाळदेशकर खेळाडू पाहुणे जमा होऊ लागले. पाहुणे मंडळींची सरबराई करण्यात श्री. वि. तु. प्रभु आणि दीपराज प्रभू गूंगून गेले. १८ जानेवारीच्या रात्रीपर्यंत जवळ -जवळ सर्व खेळाडू व पाहुणे मंडळींची बस्तान उत्तमरित्या बसविली गेली. त्या रात्री झोपताना उपस्थित सर्वजण सकाळीच सुरु होणाऱ्या KPL-2019 च्या सोहळ्याची स्वप्न रंगवितच निद्राधीन झाले.

देशभरातील अंदाजे ६००KDGB फोंड्यांत हजर होते.

**अशी झाली KPL-2019 ची सुरुवात**

फोंड्यातील गुलाबी थंडी अंगावर पांघरत १९ जानेवारीच्या सकाळी ७.३० वाजता सर्व खेळाडू व पाहुणे मंडळी फोंड्याच्या लोहिया क्रीडा संकुलात जमा झाले. आयोजक मंडळी स्वागताला तयार होतीच. उपस्थितांचा चहा-नास्ता झाल्यावर सर्व खेळाडूंना सुंदर जर्सीचे वाटप करण्यात आले आणि मुख्य सोहळ्याला सुरूवात झाली.

सोहळ्याच्या अध्यक्ष स्थानी 'पॉवर लिफ्टींग' मध्ये राष्ट्रीय व आंतर-राष्ट्रीय स्तरावर मानाचं स्थान निर्माण करणाऱ्या The Iron Lady म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अनुजा तेंडोलकर विराजमान झाल्या. अनुजाताई व इतर मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली.

सुरुवातीला KPL-2019 समितीचे अध्यक्ष श्री. दीपराज प्रभु यांनी केलेल्या प्रास्ताविकात, सर्व खेळाडूंना खेळाची मजा घेत असतानाच खिलाडू वृत्ती ही जागृत ठेवत KDGB मधील सांघिक भावना व एकोप्याचे प्रदर्शन घडवण्याचे आवाहन केले. जिंकण्याच्या जिद्दी पुढे जाऊन उत्कृष्ट खेळाचे व माणुसकीचं दर्शन घडवण्याचे आवाहनही दीपराजने सर्वांना केलं.

प्रास्ताविकानंतर स्वागत सोहळा संपन्न झाला. KDGB उन्नती मंडळाचे अध्यक्ष व सर्वांचे लाडके श्री. वि. तु. प्रभु काकांच्या हस्ते सर्वप्रथम सोहळ्याच्या अध्यक्षा श्रीमती अनुजाताई तेंडोलकर यांना गोव्याच्या परंपरेनुसार मानाचा शेला, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्री. वि. तु. प्रभु काकांच्या हस्ते श्री मठ संस्थान, दाभोलीचे अध्यक्ष श्री. विभाकर नाईक, KDGB संस्था गिरगावचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई KPL क्रीडा संघटक श्री. मनीष दाभोलकर, अंपायर्स व मंचावरील इतर मान्यवरांचे ही मानाचा शेला, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले गेले.

सोहळ्याच्या अध्यक्ष या नात्याने बोलताना श्रीमती अनुजाताई तेंडोलकर यांनी KPL-2019 च्या बहारदार सोहळ्याचे अध्यक्षपद बहाल केल्याबद्दल आयोजकांचे व ज्ञातिबांधवांचे आभार मानले व ज्ञातिबांधवांची उत्तरोत्तर प्रगती होवो अशी भावना व्यक्त केली. आपल्या भाषणात अनुजाताईंनी आपल्या खेळानेच आपल्याला मानमरातब व प्रसिद्धी दिल्याचे सांगून खेळाडूंना मिळत असलेल्या सन्मानाबद्दल समाधान व्यक्त केले. सर्व खेळाडूंना शुभेच्छा देत Let the "BEST TEAM" Win अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

आपल्या भाषणात KDGB बांधवांचा गौरव करत असताना अनुजाताई म्हणाल्या की, आपले ज्ञातिबांधव हे आरक्षण किंवा इतर कुठल्याही मागण्यांसाठी कधीच आग्रही राहिले नाहीत; कारण आम्ही KDGB कधीच कुणाकडे काही मागत नसतो. उलट समाजाला काही देण्याचाच आमचा कल राहिलेला आहे.

KPL स्पर्धांचे संघटक श्री. मनीष दाभोलकर यांनी, यंदाच्या स्पर्धेत १८ ते ८० अशा विस्तृत वयोगटातील खेळाडू सहभागी होत असल्याचे अधोरेखित केलं व यंदाच्या KPL-2019 चा स्तर आणि कु.दे. गौ. ब्रा. समाजाची प्रतिष्ठा व संस्कृती आणखी उंचावण्याचे आवाहन केले.

उन्नती मंडळ, गोवा अध्यक्ष श्री. वि.तु. प्रभु यांनी आपल्या भाषणात उपस्थित ज्येष्ठ व श्रेष्ठांना त्यांच्या मानानुसार नमस्कार व आशिर्वाद दिले. त्यांनी सर्व स्पर्धकांना KDGB ज्ञातिच्या कीर्तिला शोभेल अशा खेळाचं प्रदर्शन करण्याचं आवाहन केलं.

सोहळ्या प्रसंगी मुख्य संस्था व क्रीडा महोत्सवाचे जनक या नात्याने गौड ब्राह्मण सभा गिरगावचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई यांनी गौड ब्राह्मण सभेतर्फे भरघोस रुपये १ लाख ५० हजारचा धनादेश आयोजकांकडे सुपूर्द केला व सर्व खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

क्रीडापटू श्री. अविनाश माईणकर यांनी उपस्थित सर्व खेळाडूंना आपल्या खेळाप्रती निष्ठा ठेवण्याची व मैदानावर खेळत असताना तसेच स्वत: चे अधिकार जपत असतानाच सह-क्रीडापटूंप्रती आदर, प्रेम व सहकार्याची भावना मनांत जागृत ठेवण्याची शपथ दिली.

त्यानंतर गोव्यातील शारिरीक दृष्ट्या विकलांग खेळाडू श्री. तुषार प्रभूच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्ज्वलित करण्यात आली व त्याच्या पासून क्रीडा ज्योतीचं भ्रमण सुरु करण्यात आलं व नंतर साखळी पद्धतीने इतर खेळाडूंमार्फत लोहिया क्रीडांगणात सदर क्रीडा ज्योत फिरविण्यात आली.

क्रीडा ज्योत भ्रमणानंतर क्रिकेट सामन्यांना सुरुवात झाली. लोहिया क्रीडांगणावरील २ खेळपट्यांवर गोवा संघ-१ विरुद्ध उर्वरित भारत संघ आणि वेंगुर्ला संघ विरुद्ध पुणे संघ अशा दोन सामन्यांनी क्रीडा स्पर्धेची सुरुवात झाली. पुढचे दोन दिवस (१९ जानेवारी व २० जानेवारी) एकूण २१ संघामार्फत उत्साह व उत्कंठावर्धक अनेक क्रिकेट सामने खेळले गेले. **लीग पद्धतीने खेळवल्या गेलेल्या ह्या मर्यादीत षटकांच्या सामन्याचे विजेतेपद गोवा संघ-१ ने पटकावले तर वेंगुर्ला संघ उपविजेता ठरला. सर्वोत्कृष्ट फलंदाजाचे पारितोषिक श्री. जगन्निवास पाटील (गोवा) यांनी पटकावले**

**सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिक श्री. विनय (आजगांव) यांना मिळाले**

**महिला क्रिकेट सामने**

गतवर्षी सुरु झालेल्या महिला क्रिकेट सामन्यांचे आयोजन यंदाही करण्यात आले होते. गोवा सहेली संघ, पनवेल सखी संघ व मुंबई सखी असे तीन संघ ह्या स्पर्धेत उतरले होते. यंदाच्या स्पर्धेत पनवेल महिला संघ विजेता तर गोवा सहेली संघ उपविजेता ठरला.

यंदा क्रिकेट सामन्यांबरोबरच बॅडमिंटन व टेबल टेनिसचे सामनेही गणनाथ इंग्लीश हायस्कूलच्या प्रांगणात खेळवले गेले.ह्या सामान्यांचे निकाल असे आहेत

बॅडमिंटन - महिला संघ - सोनल गौरव तेंडूलकर सुदिती स्वप्नी तेंडुलकर विजेत्या.

महिला उपविजेता संघ - पूजा मंदार पाटील संगीता अेस पाटील

**बॅडमिंटन–** पुरुष संघ - विजेते-दर्शन पाटकर, विजय सामंत

उपविजेते- संदीप ठाकूर, आमोद आजगांवकर

**टेबलटेनिस –** पुरुष संघ -विजेता-कुश देसाई

उपविजेता - आत्माराम सामंत

महिला संघ - विजेती - करिष्मा प्रभू,

उपविजेती - अरुणा सामंत

**श्रीकृष्ण कला मंचातर्फे गोवा लोककलाचं सादरीकरण**

दिवसभर खेळून थकल्या-भागल्या क्रीडापटू व पाहुणे मंडळींच्या मनोरंजनार्थ गोव्याच्या लोककलांचं प्रदर्शन घडवणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्याचे औचित्यही याप्रसंगी साधण्यात आले होते. गणनाथ इंग्लीश हायस्कूलच्या मंचावर श्रीकृष्ण कला मंडळाच्या कलाकारांनी ऐकूण १० विविध गोव्यातील लोककलांचे प्रदर्शन उपस्थितांपुढे केले. गणेश वंदना, जागर, दीप नृत्य, समईनृत्य, गोफनृत्य, धनगर नृत्य, कळशी नृत्य, घोडा मोडणी, कोळी नृत्य अशा १० नृत्याविष्कारातून गोव्याच्या लोककलाचं प्रदर्शन करण्यात आले. अप्रतिम हा शब्द कमी पडावा अशा त्या लोककलांच हे सादरीकरण होते. त्यावेळी सामंत बाईनी उत्कृष्ठ भारुड सादर केले.

**आली सांगता सोहळ्याची वेळ–**

कुठल्याही आनंददायी, सुखदायी गोष्टीला शेवटही असतोच. अखेर KPL-2019 च्या सांगता सोहळ्याचा क्षणही आलाच. ह्या सांगता समारंभाला गोव्याचे आमदार मा. दीपक पाऊस्कर आणि आंतरराष्ट्रीय टेबल-टेनिसपटू श्रीमती ममता प्रभु ह्यांची विशेष उपस्थिती होती. अर्थात Iron Lady श्रीमती अनुजा तेंडोलकर व इतर मान्यवर ही मंचावर उपस्थित होतेच.

याप्रसंगी बोलताना, KPL-2019 चे अध्यक्ष दीपराज प्रभु म्हणाले की KPL-2019 चे यश हे थोरांचे आशिर्वाद, सर्व खेळाडूंचा सहभाग आणि सर्व संलग्न ज्ञाति संस्थांचे सहकार्य, KDGB उन्नती मंडळाचे कार्यकर्ते यांचे अथक प्रयत्न याचे फलित आहे. त्यांनी आपल्या भाषणात आपल्या KDGB ज्ञातीच्या विजयाची व सहिष्णूतेची पताका सदैव उंचावत राहो अशी सदिच्छा व्यक्त केली.

KPL स्पर्धांचे जनक व क्रीडा संघटक मनीष दाभोलकर यांनी कोंकणी भाषेतून सुरूवात करून उपस्थितांना सुखद धक्का दिला. ते म्हणाले की, ‘‘माका तुमचे गोंय अतिशय आवडलेय् हांगाच्या लोकांकडल्यान माका खूप आदर आणि मोग मिळलो. ते पुढं म्हणाले की सध्या कुंभमेळ्याचे दिवस आहेत पण मला मात्र KPL-2019 च्या मेळाव्यात महाकुंभ मेळाव्याच्या सहभागाचा आणि ज्ञाति बाधवांच्या प्रेमात शाहीस्नानाचा आनंद मिळाला.

श्री मठ संस्थान दाभोलीचे अध्यक्ष श्री. विभाकर नाईक यांनी महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक संघाच्या खेळाडूंचे कौतुक केले. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, आमचे दादू म्हणजे वि. तु. प्रभु यांनी घातलेल्या आदर्शाचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांनी श्री. दीपराज प्रभु व श्री. विकास प्रभु व त्यांचे सहकारी यांच्या मेहनतीमुळे हा सोहळा यशस्वी झाल्याचे नमूद केलं.

सांगता समारंभाच्या सन्मानीय पाहुण्या या नात्याने बोलताना टेबल-टेनीसपटू ममता प्रभु म्हणाल्या की, आज ५००/६०० च्या संख्येने सर्व KDGB बांधव एकत्रित पाहून मला आनंद होत आहे. आपल्या ज्ञाती-बांधवातील ही एकी पाहून मी प्रफुल्लीत झाले आहे. हा दिवस एक

ऐतिहासिक क्षण असल्याचेही त्यांनी नमूद केले.

आमदार मा. श्री. दीपक पाऊसकर आपल्या भाषणात म्हणाले की KDGB च्या प्रत्येक उपक्रमाला आमच्याकडून मदत व प्रेम मिळतच राहिलं. यंदाचा दिमाखदार सोहळा गोव्यातील KDGB युवकांच्या अथक प्रयत्नांमुळेच यशस्वी झाला. खेळाडूंनी जिंकण्याच्या इर्षे पेक्षा खेळातून आनंद मिळवण्याचा प्रयत्न करणं गरजेचे आहे, असे सांगत मा. श्री. पाऊसकर यांनी उपस्थित मान्यवर ज्ञातिबांधव खेळाडूचे सहभागाबद्दल आभार मानले व पुढील वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

यंदाच्या विजेत्या पनवेल महिला संघाच्या कर्णधार सोनाली बावकर यांनी आपल्या विजयाचं श्रेय संघाच्या टीमस्पीरिट (संघ भावनेला) दिलं. त्यांनी इतर विजयी संघाच्या खेळाडूंचे अभिनंदन केलं.

KDGB संस्था गौड ब्राह्मण सभा गिरगावंचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई यांनीही २०१६ ला लावलेल्या KPL च्या बीजाचे वटवृक्षात रुपांतर झाल्याचे नमूद केले व यंदाच्या यशस्वी आयोजनाबद्दल श्री. वि.तु. प्रभु, श्री. दीपराज प्रभु, श्री.विकास प्रभु व संपूर्ण गोवा बांधवाचे अभिनंदन केले.

श्री मठ संस्थान, दाभोलीचे कार्याध्यक्ष श्री. गुरुनाथ खानोलकर यांनी केलेल्या आभार प्रदर्शनानंतर सर्व विजेत्या, उपविजेत्या संघाना ट्रॉफी, त्या संघातील खेळाडूंना पदक, प्रशस्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला.

अत्यंत जल्लोशाच्या वातावरणांत पार पडलेल्या बक्षिस प्रदानाच्या कार्यक्रमानंतर KPL-2019 ची सांगता झाली. अत्यंत जड अंत:करणाने सर्व उपस्थित ज्ञातिबांधवांनी एकमेकांचा निरोप घेतला खरा पण पुढच्या वर्षीच्या डोंबिवलीच्या KPL-2020 ला पुन्हा भेटण्याची आश्वासनं दिल्यानंतरच सर्वजण आप-आपल्या दिशेला वळले.

सर्वांना आता ओढ लागेलीय् डोंबिवलीच्या KPL-2020 ची.

**डोंबिवलीकर तय्यार रहो... आली रे आली डोंबिवलीकर आता तुमची पाळी आली.**

❑ ❑ ❑

With Best
Compliments From

**Sanjay Walawalkar**

**M. : 9820076814**

**sanjay.walawalkar@Jupiter_services.com**



**JUPITER SERVICES**

**Associate Working Partner of**

**INDUS TOWERS LIMITED**

(A Venture of Airtel, Vodafone & Idea)

# गौड ब्राह्मण सभेच्या १२१ व्या
# वार्षिक स्नेह संमेलनाची काही क्षणचित्रे




"Out of Box" या विषयावर आपले विचार मांडताना संस्थेचे कोषाध्यक्ष श्री. मनीष दाभोलकर



१२१व्या स्नेह समेलनाचा आस्वाद घेताना ज्ञातीबांधव



१२१व्या स्नेह संमेलनात गौड ब्राह्मण सभेतर्फे दिल्या जाणाऱ्या विवीध पुरस्काराचे मानकरी व इतर ज्ञातीबांधव



गौड ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ.विलास देसाई उपाध्यक्ष श्री.देवदत्त खानोलकर, श्री.प्रमोद देसाई व श्री.पंढरीनाथ विठ्ठल सरनाईक (पदाधिकारी)



जिवनगौरव पुरस्कार स्विकारताना मा.श्री.श्रीपाद शंकर पंतवालावलकर (मालवण)



रावबहादूर वासुदेवराव बांबार्डेकर इतिहास संशोधन पुरस्कार विजेते मा.श्री.महेश तेंडोलकर (पुणे)

# गौड ब्राह्मण सभेच्या १२१ व्या वार्षिक स्नेह संमेलनाची काही क्षणचित्रे



स्व.बा. नी. देसाई आदर्श समाजसेवक पुरस्कार स्विकारताना मा.श्री.काशीनाथ आत्माराम सामंत (कुडाळ)



स्व.सुर्याजी उर्फ काका कोचरेकर आदर्श समाजसेवक पुरस्कार स्वीकारताना मा.श्री.हेमंत सामंत (विक्रोळी)



स्व.डी.पी. नाईक आदर्श स्वयंसेवक पुरस्कार स्वीकारताना मा.श्री. कृष्णाजी पाटकर (बोरीवली)



मलेशियन इंटरनॅशनल अॅथलेटिक्स् चॅम्पीयनशीप मध्ये लांब व तिहेरी उडी मध्ये कांस्य पदक विजेता श्री. गणेश प्रभू-खोत (नांदगांव)



उंच उडी सुवर्ण व तिहेरी उडी मध्ये कांस्य पदक विजेता श्री. चारुदत्त वामन शेणई (शिरोडा)



पाटकर महाविद्यालयाचे अध्यक्ष मा.श्री. किशोर रांगणेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना

# कुडाळदेशकर प्रिमीयर लीग (KPL) २०१९
# दि.१९ व २० जानेवारी २०१९ रोजी लोहिया मैदान निरंकाल, गोवा
# येथे संपन्न झालेल्या क्रिडा महोत्सवाची काही क्षणचित्रे



KPL च्या पूर्वसंधेला क्रिडा मैदानाची आखणी पहाताना
गौड ब्राह्मण सभा, गिरगाव व उन्नती मंडळ गोवा चे पदाधिकारी



कार्यक्रमाच्या सुरवातीला दिप प्रज्वलन
करतांना मान्यवर.



सर्व खेळाडूंना शपथ देताना मान्यवर.



KPL चे शिल्पकार व क्रिडा संघटक श्री.मनीष दाभोलकरांना
मानाचा शेला देताना उन्नती मंडळ गोवाचे अध्यक्ष श्री.व्हि.टी प्रभू.



'गौड ब्राह्मण' चे संपादक श्री. उमाकांत महाजन यांना
मानाचा शेला देतांना उन्नती मंडळ गोवाचे अध्यक्ष श्री.व्हि.टी प्रभू.



Selfie of the year श्री. योगश खानोलकर

# कुडाळदेशकर प्रिमीयर लीग (KPL) २०१९
# दि.१९ व २० जानेवारी २०१९ रोजी लोहिया मैदान निरंकाल, गोवा
# येथे संपन्न झालेल्या क्रिडा महोत्सवाची काही क्षणचित्रे



संपूर्ण भारतातून सहभागी झालेले कु.दे.गौ.ब्रा. क्रिकेट संघ



कार्यक्रमाची सांगता सोहळ्याचा एक क्षण




KPL -2019 पुरुष विजेता संघ



KPL -2019 महिला विजेता संघ



भारुड सादर करताना सौ.सामंत बाई (पाट–परुळे)




दिवसभर खेळून थकल्या भागल्या क्रिडापट्टू पाहुण्यांच्या मनोरंजनार्थ
गोव्याच्या लोककलांचं दर्शन घडवणारा संस्कृतिक कार्यक्रम

# कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाचा शतकोत्तर रौप्य महोत्सवी सांगता समारंभ



दीपप्रज्वलन-(डावीकडून प्रमुख पाहुणे डॉ.(प्रा.)श्रीनिवास दामोदर सामंत, संस्थेचे चेअरमन डॉ. (प्रा.) अजय दिगंबर पाटील, समारंभाच्या अध्यक्ष माननीय न्यायमूर्ती सौ.रंजना प्रकाश देसाई, संस्थेचे अध्यक्ष श्री. नरसिंह नारायण पतवालावलकर (व मागे, सदस्य श्री. संजय सुंदर सामंत)

कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाचा शतकोत्तर महोत्सवी सांगता समारंभ रविवार दिनांक १७ फेब्रुवारी २०१९ रोजी मुंबईत दादर येथील राजा शिवाजी विद्यालय संकुलातील डॉ. बी. एन. वैद्य सभागृहात संपन्न झाला. सन १८१४ साली स्थापन झालेल्या कुडाळदेशकर ज्ञातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत देणाऱ्या या सर्वात जुन्या संस्थेला ह्या वर्षी १२५ वर्षे पूर्ण झाली. संस्थेने सन २०१८-१९ हे वर्ष आपले शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे केले, त्या निमित्ताने संस्थेने हा समारंभ आयोजित केला होता. या कार्यक्रमाला भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्ती माननीय सौ रंजना प्रकाश देसाई या समारंभाच्या अध्यक्षा म्हणून लाभल्या तर समारंभाचे प्रमुख पाहुणे होते मुंबईच्या आयटीसी (युडीसीटी) चे माजी डीन डॉ. (प्रा.) श्रीनिवास दामोदर सामंत.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ''ऋतू वसंत फुलला...'' हा गीतकार आरती प्रभू, संगीतकार वसंत देसाई व वसंत प्रभू यांच्या गाण्यांचा कार्यक्रम, गायक नचिकेत देसाई व अदिती प्रभुदेसाई यांनी सादर केला. कार्यक्रमाची संकल्पना होती प्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांची व निवेदनही त्यांनीच केले.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. संस्थेचे अध्यक्ष श्री. न.ना. पंतवालावलकर यांनी आपल्या प्रास्ताविकाची सुरुवात संस्थेचे चिटणीस महादेव (प्रबोध) भास्कर सामंत यांना व दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ रोजी काश्मिर खोऱ्यातील पुलवामा येथील अतिरेकी हल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजलीचा ठराव मांडून केली. संस्थेचे चिटणीस प्रबोध सामंत यांनी मागील दोन वर्षे ह्या कार्यक्रमासाठी व त्या निमित्ताने संस्थेने हाती घेतलेल्या निधी संकलनासाठी अहोरात्र मेहनत घेतली. संस्थेच्या गिरगांवातील कार्यालयात या सांगता समारंभाच्या तयारीची चर्चा करीत असतानाच दिनांक ७ फेब्रुवारी २०१९ रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाले. हा सांगता समारंभ मोठ्या थाटामाटात संपन्न व्हावा ही त्यांची इच्छा होती त्यामुळे हा कार्यक्रम त्यांनी ठरविल्या प्रमाणे करावा असे ठरवून तो संपन्न होत आहे असे निवेदन अध्यक्षांनी केले. त्यानंतर सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन कै. महादेव (प्रबोध) सामंत ह्यांना व जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहीली.

समारंभाच्या अध्यक्ष माननीय न्यायमूर्ती सौ. रंजना देसाई यांची ओळख संस्थेचे चिटणीस श्री. किरण दत्तात्रय सामंत यांनी करून दिली. संस्थेच्या अध्यक्षांच्या हस्ते न्यायमूर्ती सौ. रंजना देसाई ह्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. चिटणीसांनीच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आदरणीय डॉ. (प्रा.) श्रीनिवास सामंत यांची ओळख करून दिली. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. (प्रा.) अजय दिगंबर पाटील यांनी, डॉ. (प्रा.) श्रीनिवास सामंत ह्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार केला.

त्यानंतर संस्थेचे माजी पदाधिकारी व व्यवस्थापक मंडळ सदस्य तसेच आपल्या सर्व मध्यवर्ती व विभागवार ज्ञातीसंस्थांचा यथोचित सन्मान करण्यात आला. सत्कारमूर्तींच्या वतीने ज्येष्ठ माजी पदाधिकारी श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील, सौ. सुनीता मनोहर आजगांवकर व प्रा. जगदीश साबाजी वालावलकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ह्या समारंभाला उपस्थित असणाऱ्या मान्यवरांपैकी



समारंभाच्या अध्यक्ष माननीय न्यायमूर्ती सौ.रंजना प्रकाश देसाई ह्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष श्री.नरसिंह नारायण पंतवालावलकर (मागे प्रमुख पाहुणे डॉ.(प्रा.) श्रीनिवास दामोदर सामंत)



समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ.(प्रा.) श्रीनिवास दामोदर सामंत ह्यांचा शाल व पुष्पगुच्द देऊन सत्कार करताना संस्थेचे चेअरमन डॉ.(प्रा.) अजय दिगंबर पाटील (बसलेल्या, न्यायमूर्ती सौ. रंजना प्रकाश देसाई.

संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. सुधाकर ठाकूर, जे कुडाळहून या कार्यक्रमासाठी खास उपस्थित होते, ह्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संस्थेच्या मदतीमुळे आपल्या प्रमाणेच अनेक ज्ञाती विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी झालेल्या मदतीचा तसेच कोकणातील मुलांपर्यंत पोहोंचण्यासाठी संस्थेच्यावतीने केल्या जात असलेल्या प्रयत्नांचा आवर्जून उल्लेख केला. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सहयोग डोंबिवलीचे कार्याध्यक्ष श्री. गणेश गुरुदास देसाई यांनी ज्ञातीसंस्थांच्यावतीने बोलताना विद्यावृद्धि समाजाच्या आजवरच्या कार्याचा गौरव केला व भविष्यात ज्ञातीबांधवांनी या संस्थेच्या प्रगतीसाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. सौ. (प्रा.) मनीषा राजेंद्र सामंत यांनी आपल्या मनोगतात ज्ञातीबांधवांनी आपल्या घरातील शुभ कार्याच्यावेळी संस्थेची आठवण ठेवून संस्थेला आर्थिक सहकार्य करावे असे सांगितले.

त्यानंतर न्यायमूर्ती सौ. रंजना प्रकाश देसाई ह्यांच्या हस्ते या कार्यक्रमाच्या निमित्ताने तयार करण्यात आलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

समारंभाचे प्रमुख पाहुणे डॉ. (प्रा.) श्रीनिवास सामंत यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मनोगतात संस्थेच्या आजवरच्या कार्याचा आढावा घेतला व बदलत्या काळात संस्थेला आपल्या ध्येयधोरणात आवश्यक ते बदल करावे लागतील असे सांगितले. संस्थेकडे शिष्यवृत्तीसाठी येणाऱ्या अर्जांचे निकष ठरविताना व शैक्षणिक पात्रता विचारात घेताना, शिक्षणासाठी लागणारा खर्च, शैक्षणिक फी प्रमाणेच, प्रवासखर्च, शैक्षणिक सामग्रीवर करावा लागणारा खर्च, हॉस्टेल खर्च व त्या अनुषंगाने त्या विद्यार्थ्यांच्या पालकांची असणारी आर्थिक क्षमता या सर्वांचा साकल्याने विचार करून शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी निहाय निश्चित करावी, तसेच भौगोलिक परिस्थितीचाही विचार व्हावा. शहरातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत कोकणातील खेडेगांवातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या मदतीची जास्त गरज आहे हे संस्थेने लक्षात घ्यावे असे त्यांनी मत व्यक्त केले. आपल्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रगतीचे सर्वेक्षण करण्याचा प्रयत्न करावा व त्यातून अधिक गरज असलेल्यांना अधिक मदत देण्याचा विचार व्हावा असेही त्यांनी सुचविले.

समारंभाच्या अध्यक्षा न्यायमूर्ती माननीय सौ. रंजना देसाई यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपल्या ज्ञातीतील मान्यवर, टोपीवाले देसाई, रामभाऊ परुळेकर, वसंत देसाई, ॲड. व्ही. टी. वालावलकर, गिरगांवातील कुडाळदेशकर निवास मध्ये राहणारे नातेवाईक, त्या काळातील महिला मंडळाच्यावतीने योजलेले कार्यक्रम व गौड ब्राह्मण त्रैमासिक यांच्या आठवणींना उजाळा दिला. संस्था करीत असलेल्या कामाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. संस्थेने शिक्षणासाठी मुलींना जास्त प्रोत्साहन देणे का आवश्यक आहे हे सांगताना आपण स्त्रीयांना समान वागणुक देत असलो तरी त्यांनी ठराविक क्षेत्रातच काम करण्याऐवजी आय.ए.एस., आय.पी.एस. वैमानिक, शास्त्रज्ञ, क्रीडा कला अशा सर्व क्षेत्रात पुढे यायला हवे त्यासाठी त्यांना सर्व कौटुंबीक जबाबदाऱ्या संभाळून हे करावे लागणार असल्यामुळे पुरुषांपेक्षा त्यांना वेगळ्या

आव्हानांना तोंड द्यावे लागेल हे लक्षात घेऊन त्यांच्या पाठीशी आपण समर्थपणे उभे राहिले पाहिजे असा विचार त्यांनी मांडला.

या कार्यक्रमासाठी मुंबई व मुंबई बाहेरील अनेक मान्यवर उपस्थित होते; त्यात गौड ब्राह्मण सभेचे अध्यक्ष डॉ. विलास देसाई, निराश्रितफंडाचे माजी अध्यक्ष श्री. द.स. आजगांवकर, अध्यक्षा सौ. पल्लवी प्रकाश देसाई, विद्यावृद्धि समाजाचे माजी विश्वस्त श्री. श्रीपाद बाळकृष्ण पाटील, माजी चिटणीस श्री. अ. वा. तेंडुलकर, माजी खजिनदार श्री. शांताराम केळुसकर, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण गोरेगांवचे कार्यवाह श्री. प्रमोद वसंत देसाई, पनवेल संस्थेचे श्री. कुमार खानोलकर, डोंबिवली सहयोगचे उपाध्यक्ष श्री. विनय तिरोडकर, कार्याध्यक्ष श्री. गणेश गुरुदास देसाई, चिटणीस श्री. भिकाजी वालावलकर, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण समाज, पुणे ह्या संस्थेचे माजी अध्यक्ष श्री. मधुकर सामंत, सदस्य सीए संजय खानोलकर व श्री. राजन नरहर पाटकर, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे चिटणीस श्री. प्रफुल्ल जयवंत खानोलकर, सदस्य श्री. अशोक सरनाईक, टोपीवाला व्याख्यानमालेचे श्री. सतीश गजानन सामंत, गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे संपादक श्री. उमाकांत गणपत महाजन, गौडब्राह्मण सभेचे चिटणीस श्री. सुभाष दत्तात्रय वाघ, गोव्याहुन या कार्यक्रमासाठी आलेले श्री. प्रभू वेळणेकर, गौडब्राह्मण ठाणे/मुलुंड मंडळाचे अध्यक्ष डॉ. किशोर बळवंत महाजन, विक्रोळी संस्थेचे अध्यक्ष श्री. महादेव महाजन, वसई ज्ञाती संस्थेच्या श्रीमती रोहिणी कोचरेकर, विरार संस्थेचे श्री. सुनील मनोहर सामंत, चिकित्सक संस्थेचे चिटणीस डॉ. गुरुनाथ पंडित, श्री. राजेश वासुदेव देसाई, सारस्वत बँकेचे जनरल मॅनेजर श्री. आनंद मधुसूदन खोत, बँक ऑफ बडोदाचे माजी जनरल मॅनेजर श्री. सदानंद सामंत (बोरिवली) तसेच सर्वश्री सिद्धार्थ महादेव (प्रबोध) सामंत, डॉ. महेश गोविंद सामंत, श्री. प्रदीप पंडीत, सौ. नीला प्रदीप पंडित, सिए अरुण दिनकर देसाई, सौ. अमला अरुण देसाई, श्री. अमोल अरुण देसाई, श्री. शशिकांत तुकाराम बांबर्डेकर, श्री. जगजीवन प्रभु, प्रा. जगदीश वालावलकर, श्री. शरद महादेव परुळेकर, डॉ. सुधाकर ठाकूर, श्री. चंद्रकांत वामन परुळेकर, श्री. सूर्यकांत माईणकर, श्री. सुरेंद्रनाथ बा. ठाकूर, श्री. प्रदीप प्रभाकर देसाई, श्री. हेमंत पाटकर, श्री. वासुदेव ठाकूर सौ. अपर्णा प्रकाश सामंत, श्रीमती कीर्ती सामंत गुप्ते, श्रीमती कुसुम तेंडुलकर, श्री. सतीश सामंत (कणकवली), विद्यावृद्धि समाजाचे सर्व पदाधिकारी व कार्यकारी मंडळ सदस्य यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या शेवटी व्यवस्थापक मंडळाचे सदस्य श्री. अनंत जनार्दन तेंडुलकर यांनी सर्वांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन पत्रकारितेत करियर करू पाहाणाऱ्या श्री. संदेश सतीश सामंत या होतकरु तरुणाने उत्तम प्रकारे केले. राष्ट्रगीताने ह्या कार्यक्रमाची सांगता झाली.

- शब्दांकन : **संजय सुंदर सामंत**

# हार्दिक अभिनंदन...!

**कुमार रोहन राहु ठाकूर**



कुमार रोहन राहुल ठाकूर ह्यांनी फेब्रुवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र इंस्टीट्यूट ऑफ हेल्थ सायन्सची एम.बी.बी.एस.ही पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली नंतर मे २०१८ मध्ये National Board of Examination ची NEET PG-2018 च्या परीक्षेत 96.8957 percentile सम्पादन केले. रोहनने दिलेल्या choices प्रमाणे बोर्डाने त्याची निवड Government Medical College, Nagpur येथे M.S. (Surgery) साठी तसेच D.N.B. (Diplomate of National Board) Radio Diagnosis साठी केली. तो स्वेछेने पुढील अभ्यासासाठी पुणे येथे D.N.B. Radio Diagnosis साठी Resident Doctor ह्या पदावर रूजू झाला. अभ्यासा व्यतीरिक्त त्याला Football आणि Cricket खेळण्याची तसेच वाचनाची आवड आहे.

त्याचे वडील श्री. राहुल प्रभाकर ठाकूर हे एका नामांकित मल्टीनॅशनल कंपनी मध्ये उच्च पदावर कार्यरत आहेत. तसेच आई सौ. निलम राहुल ठाकुर ही सरकारी नोकरीत आधिकारी पदावर कार्यरत आहे. त्याच्या ह्या वाटचालीतील यशाचे श्रेय त्याच्या मेहनतीबरोबरच त्याच्या आजी-आजोबांच्या (कै. सिंधू आणि कै. प्रभाकर नारायण ठाकूर तसेच सौ. रेखा आणि श्री. काशिनाथ शंकर रामदास) ह्यांच्या संस्कारांना आहे.

# गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव वार्षिक स्नेह–संमेलन २०१९





**समारंभाचे प्रमुख पाहु णे मा. दिपक देसाईंचे शाल, श्रीफळ व पुष्प गुच्छ देऊन स्वागत करताना संस्थेचे अध यक्ष मा. श्री. मनीष दाभोलकर व ॲनिमेशन गुरू श्री. व्ही. जी. सामंत समवेत.**

गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव या संस्थेचे ३५वे वार्षिक स्नेह-संमेलन दि. १० फेब्रुवारी २०१९ रोजी गोरेगाव जिमखानाच्या मैदानात मान्यवरांच्या आणि ज्ञातीबांधवाच्या उपस्थितीत संपन्न झाले.

संस्थेच्या वार्षिक स्नेह-संमेलनाच्या निमित्ताने ज्ञातीबांधवासाठी सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. दि. ०३ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत अ. भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, आरे रोड, गोरेगाव (प.) येथे चित्रकला स्पर्धा, गायन स्पर्धा, पाककला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या त्यास ज्ञातीबांधवांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला.

स्नेह-समेलनाची सुरवात सौ. सुषमा सुरेश सामंत यांच्या सुरेल स्वागत गीतांनी झाली. त्यानंतर लहान मुलांपासून ते ज्येष्ठ सभासदांनी आपली कला, गायन, एकपात्री प्रयोग, वेशभुषा सादर केली. उपस्थित सर्व ज्ञातीबांधवांनी त्यांच्या कलेला उस्फुर्त प्रतिसाद दिला व त्यांचे कौतुक केले. संस्थेच्या स्नेह संमेलनाचे सूत्रसंचालन कु. कश्मिरा अवसरे हिने केले.

स्नेह-संमेलनाला प्रमुख पाहुणे, मा. श्री. दिपक शांताराम देसाई, सुप्रसिद्ध उद्योजक व समाजसेवक यांची उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुणे व इतर मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाचा सोहळा संपन्न झाला. संस्थेचे विश्वस्थ श्री. व्हि.जी. सामंत व समारंभाध्यक्ष श्री. मनिष गुरूदास दाभोलकर यानी प्रमुख पाहुण्याचे स्वागत केले. उपाध्यक्ष श्री. प्रमोद वसंत देसाई यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात संस्थेचे कार्य व पुढील उपक्रमाची माहिती दिली. तसेच ज्ञातिबांधवाना गौड ब्राह्मण समाज, गोरेगाव आणि गौड ब्राह्मण सभा, गिरगाव या संस्थांचे सभासद होण्याचे आवाहन केले. सौ. अंजली प्रमोद देसाई यांनी प्रमुख पाहुणे मा. श्री. दिपक शांताराम देसाई ह्यांचा परिचय करून दिला. समारंभाध्यक्ष श्री. मनिष गुरूदास दाभोलकर, यांनी आपल्या भाषणात गौड ब्राह्मण समाज गोरेगाव या संस्थेचे कार्य व पुढील उद्दिष्टे उपस्थितांसमोर मांडली.

यावेळी ''कुडाळदेशकर वार्षिक'' अंक २०१९ चे प्रकाशन व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या हस्ते

करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. व संस्थेच्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा, विजयी स्पर्धकांचा बक्षिस समारंभ प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला.

सर्वच ज्ञातिसंस्थाच्या कार्यात मदतीचा हात पुढे करणारे व वडीलांची शुश्रुषा करता यावी या करिता अमेरिकेची नोकरी सोडून IIT Engineer असलेले श्री. दिपक देसाई यांचा आदर्श सर्वांनी घेण्यासारख आहे. त्यानंतर त्यानी स्वत:चा हॉटेलव्यवसाय सुरू करून नावलौकीक प्राप्त केला हे सर्व अंचबित करणारे आहे.

श्री. राजु सामंत, योगेश खानोलकर यांच्या सारखे तरूण कार्यकर्ते स्वत: ज्ञाती संस्थाचे कार्य पुढे नेण्याचे आव्हान स्वीकारत आहेत ही अभिमानाची गोष्ट आहे. गौड ब्राह्मण समाजाने नेहमीच समन्वयाची भूमिका घेत ज्ञातीसंस्थाच्या कार्यात मदतीचा हात पुढे केला आहे.

या कार्यक्रमाची सांगता गोरेगावचे संगीतकार व सगीतशिक्षक श्री. भुषण वसंत सामंत व त्यांचे सहकारी यांनी आपल्या सुरेल गाण्यानी केली. त्यांना उपस्थित प्रेक्षकांनी मनापासून दाद दिली.

संस्थेच्या या कार्यक्रमास गौड ब्राह्मण सभा, गिरगावचे अध्यक्ष डॉ. विलास रामकृष्ण देसाई, कार्याध्यक्ष श्री. उमाकांत गणपत महाजन कार्यवाह- श्री. सुभाष वाघ व इतर मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

संस्थेच्या कार्यवाह सौ. सुषमा संदिप सामंत यांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ज्यांनी-ज्यानी मदत केली. त्या सर्वांचे कार्यकारी मंडळातर्फे जाहिर आभार मानले अल्पोपहहार व चहापान होऊन 'राष्ट्रगीताने' या कार्यक्रमाची सांगता झाली.

**सौ. अंजली प्रमोद देसाई**
गोरेगाव (पूर्व)

# हार्दिक अभिनंदन

**आदित्य पंढरीनाथ सरनाईक** याने दादर येथील



रामनारायण रुईया महाविद्यालयातून Biotechnology या विषयातून M.Sc केली. डिसेंबर २००९ साली त्याने M.Sc. नंतर CSIR-NET (US) Fellowship मिळवून तो भारतात ७४ वा आला. (त्यानंतर २०१०-२०१३ या कालावधीत जैवतंत्रज्ञान विभागात Assistant Prof. म्हणून कार्यरत होता).

जून २०१३ मध्ये Ph.D. करीता CSIR-NET ची JRF मिळवली व भारतात ३३ वा क्रमांक पटकावला. डिसेंबर २०१८ मध्ये त्याने Institute of Chemical Technology (ICT) येथून डॉ. रीना अजित पंडित (Associate Professor, ICT) यांच्या मार्गदर्शनाखाली आपली Ph.D. Algal Genetic Engineering या विषयात पूर्ण जिद्दीने संपादन केली. Ph.D. करतानाच ICT तर्फे Scholarship वर Student Exchange Visitor म्हणून आदित्य वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी सेंट लुईस, मिझौरी, USA ला गेला यासाठी विद्यावृद्धी समाजानेही त्याला रु.२५०००/- ची Scholarship दिली होती. नंतर काही महिने तो ICT त Research Associate म्हणून कार्यरत होता. आदित्यने आपले शिक्षण Ph.D. वर थांबवले नसून तो Post Doctorate Research अर्थात पुढील संशोधनासाठी U.S.A. तील Arizona State University ला गेला आहे. डॉ. अरुल वर्मन यासोबत तो पुढील संशोधन करित आहे.

आदित्यने शिक्षण एके शिक्षण न करता आपले अनेक छंदही जोपासले.

अशा अष्टपैलू व्यक्तिला गौड ब्राह्मण समाजाकडून त्याच्या पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा. आदित्यला उदंड सौख्यपूर्ण आयुष्य लाभो.

❑ ❑ ❑

# चला कृष्णा काठी!

सौ. उषा खानोलकर



सौ. उषा खानोलकर

दर वर्षी नरसोबाच्या वाडीला आमची एक फेरी असते. त्याप्रमाणे जानेवारीत आम्ही वासुदेव मंगल कार्यालयात पोहोचलो. नेहमीप्रमाणे, पपा (दिगंबर पुजारी). आणि त्यांचा मुलगा अवधूत यांनी हसत मुखाने आमचे स्वागत केले. दत्तजयंती होऊन गेली होती. आता थोड्या शांतपणे देवाला भेटता येईल असे वाटत होते. समोरच औदुंबर दिसला, कृष्णा नदी संथ वाहत होती. मन प्रसन्न झाले. हळूहळू पायऱ्या उतरत होते. खाली उतरले आणि समोर मोठ्ठा पांढरा-केशरी फलक दिसला. पुराण, प्रवचन, किर्तन, नादनर्तन, गाणे, एका पेक्षा एक देखणा कार्यक्रम! गायक पण नामवंत! अजीत कडकडे, किर्ती शिलेदार, चारुदत्त आफळे, गौरी पाटील....

त्याक्षणी मी ठरवले, या कार्यक्रमासाठी रहायचे. हा होता कृष्णावेणी उत्सव. साक्षात दत्तावतार 'टेंबे स्वामी' नरसोबाच्या वाडीला १२ वर्षे राहिले असताना त्यांनी या उत्सवाची प्रथा घालून दिली. नदीतून एक 'कन्नकी' नामक देव वृक्षाचा ओंडका वाहत आला. हा ओंडका साधासुधा नसून, श्री 'कृष्णा वेणीचे अमूर्तरूप असल्याचे, त्रिकाल ज्ञानी महाराजांच्या ऋतंभरा प्रज्ञेस ज्ञात झाले. त्यांच्या आज्ञे नुसार या अमूर्तस्वरूपाला अतिशय सुंदर असे मूर्तीरूप देण्यात आले. तीच ही आपल्या सर्वांची जीवन दायिनी 'श्री कृष्णा वेणी माता'. किती प्रसन्न तिचा चेहरा! ते लोभस सुहास्य! ते समाधान!

रथ सप्तमी पासून १० दिवस तिचा उत्सव साजरा करतात. त्या दिवसांत माघी पौर्णिमा पण येत असल्याने आणखी बहर चढतो. उत्सवाला नदी काठी छोटा महाल उभा करतात. त्यात एक सुबक देऊळ साकारतात. देवळाच्या पहिल्या खांबाची शास्त्र शुद्ध पुजा ११ पुजारी करतात. मग बाकीचे खांब लाऊन मंडप उभा राहतो. या सर्व सोहळ्याचे साक्षीदार होण्याचे भाग्य आम्हाला लाभले.

मंडपात देवीला आणताना काय ते तिचे कौतुक! वाडीभर रांगोळ्यांचा सडा घातला होता, पायऱ्यांवर



कृष्णेच्या काठावर रांगोळ्यांची नक्षी घातली होती. काय नव्हते त्या नक्षीत! तिच्या शालूचा पदर, तिचे दागिने, कुंकवाचा करंडा, फुलांची पखरण! आणि तिच्या स्वागताला भक्त जन, शुचिर्भूत ब्राह्मण, सौभाग्यालंकारांनी नटलेल्या, शालु शेले नेसलेल्या तिच्या मुली, तिला आरती ओवाळत होत्या. हलव्याच्या दागिन्यांनी नटली होती ती. अशी वाजतगाजत मिरवत तिला मंडपात आणली.

तिचे सगळे खोटे दागिने उतरवून तिला खरा साज चढवला. सोन्याचे तेज चकाकत होते, पण मला मात्र तिचे मंदस्मित खुणावत होते. आणि देवी खूष होती, तिचा 'मंत्र जागर' चालला होता.

२१ पाट, पाटा भोवती रांगोळ्या, २१ ब्राह्मण, एक सुराने तिचा मंत्र जागर करत होते. तिच्या मुली तिला 'श्रीकृष्ण लहरी' पठण ऐकवत होत्या. आजुबाजुच्या गावातील भगिनी रोज भजन करत होत्या. श्रीहरी पुजारी 'पुराण' ऐकवत होते. किर्तन रोज चालूच होते. देवीच्या चेहऱ्यावर समाधान पसरत होते.

आपल्या लेकरांचे लाड देवी पुरवते याचा प्रत्यय आला.

त्याचे असे झाले, गायनाचे काही कार्यक्रम रात्री उशिरा होते. आला सोबतीचा प्रश्न! मला एकटीला कुणी पाठवेना. पण काय नवल! डोंबिवलीहून, कोकणातून, सामंत पती पत्नी आले, बेळगाव व पुण्याहून दोघी खानोलकर आल्या. मी माहेरची सामंत, सासरची खानोलकर. सासर-माहेर माझ्या सोबतीला हजर झाले. दादरहून नेरुरकर बाई आल्या, बोरिवलीच्या गुप्ते आल्या. मग काय विचारता! ६ जणींनी अशी धमाल केली! असं गाणं आयुष्यात पहिल्यांदाच ऐकलं. दगडी पायरीवर बसले होते. समोर कृष्णानदी वाहत होती. वरती आकाशात पौर्णिमेचा चंद्र विलसत होता. एका बाजूला नरसिंह सरस्वतीचे मंदिर तर दुसऱ्याबाजूला 'श्रीकृष्णा वेणीचा' मंडप. दत्त भक्त अजित कडकडे गात होता - 'निघालो घेऊन दत्ताची पालखी' - कान, डोळे तृप्त झाले होते, मन आनंदाने काठो काठ भरून गेले होते. 'समाधी' म्हणतात ती हीच असावी. आपोआप हात जोडले गेले, कृष्णा मातेला प्रार्थना केली, हा आनंद, हे समाधान, तुझ्या चेहऱ्यावरचे हास्य, तुझ्या सगळ्या लेकरांना ही मिळूदे!

**सौ . उषा खानोलकर**
दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई.

---

# हार्दिक अभिनंदन...!



**श्री. मोहीत नरेंद्र सामंत**

श्री. मोहीत नरेंद्र सामंत (श्रीरंग सोसायटी, ठाणे) ह्याने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून त्याला १९३ गुण मिळाले आहेत.

# हार्दिक अभिनंदन...!

**कु. निकिता उर्फ सुलोचना अनिल प्रभु**



कु. निकिता उर्फ सुलोचना अनिल प्रभु, मु.पो. तेंडोली, ता. कुडाळ, जि. सिंधुदूर्ग हिने श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी तर्फे ५१व्या आंतर महाविद्यालयीन युथ फेस्टिव्हल मध्ये दि. ०४ ऑगस्ट, २०१८ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात कथ्थक या शास्त्रीय नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक मिळविला.

तद्नंतर श्री. देव आदिनारायण, परुळे येथील किर्तन महोत्सवातील संस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत सदर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

तसेच दि. ५ सप्टेंबर, २०१८ रोजी विद्यापीठ विद्यार्थी भवन, चर्चगेट, मुंबई येथे कथ्थक नृत्य प्रकाराचे सादरीकरण महाविद्यालयामार्फत सादर केले.

राज्य सरकार पुरस्कृत दि. ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी ओरोस येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवात सदर नृत्यास प्रथम क्रमांक प्राप्त झाला.

तेंडोली येथील चरक सौजामणी व बृहस्पतीरूप यागातील सायंकाळचे सांस्कृतिक क्रार्यक्रमात दि. १५ डिसेंबर, २०१८ रोजी सदर कथ्थक नृत्याचे सादरीकरण करून उपस्थितांची वाहवा मिळवली.


रेकॉर्ड डान्सच्या काळात भारतीय अभिजात शास्त्रीय नृत्य प्रकारास जास्तीत जास्त वाव मिळावा, हा प्रामाणिक उद्देश या तिच्या कथ्थक नृत्य सादरीकरणामागे आहे.

बालपणापासून नानाविध प्रकारात जसे नृत्य, नाटक, एकपात्री अभिनय, निबंध-वक्तृत्त्व स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, कथाकथन स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन स्पर्धा, श्री. साई मंदीर, पिंगुळी येथील नृत्य स्पर्धा यामध्ये २००५ ते २०१९ पर्यंत सतत चषक प्राप्त केलेले आहेत. तसेच तेंडोली गावात श्री. देव पुरुषोत्तम सेवा न्यास, तेंडोली यांचेमार्फत प्रथम क्रमांकाचे बक्षीस पाप्त.

या वर्षी ती तृतीय वर्ष विज्ञान (भौतिकशास्त्र) श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी येथे शिकत आहे.

दरवर्षी तिला कुडाळ देशकर गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाजाची शिष्यवृत्ती मिळत आहे.

# स्व. डॉ. जगदीश देवराव सामंत प्रथम पुण्यस्मरण १९ जानेवारी २०१९


कुरूणामहर्षि, कर्मयोगी

स्व. डॉ. जगदीश देवराव सामंत यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचा कार्यक्रम शनिवार दि.१९ जानेवारी २०१९ रोजी दुपारी ३.३० वाजता श्री महालक्ष्मी हॉस्पिटल, अर्नाळा येथे मा. श्री. बबनशेठ नाईक, माजी अध्यक्ष, जिल्हा परिषद ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमास श्री. डॉमनिक गोन्सालवीस, लोकनेते श्री. हितेंन्द्रजी ठाकूर, श्री. ओनिल आल्मेडा, श्री. महेश देसाई व श्री. हेमंत म्हात्रे मान्यवर म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचा प्रारंभ सृजन आयोजित भावस्वरांजली या संगीत कार्यक्रमाने झाला. डॉक्टरांना आवडत असलेली निवडक गाणी सादर करण्यात आली व डॉक्टरांच्या गंधरुपी स्मृतिंना त्यानिमीत्ताने उजाळा देण्यात आला.

मान्यवरांच्या हस्ते डॉ. जगदीश सामंतांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दिप प्रज्वलन करुन हॉस्पिटलमधील अत्याधुनिक एक्स-रे विभागाचे, ऑपरेशन टेबल, एॅनेस्थेशिआ मशीन व लीफ्ट्चे उद्घाटन श्री. बबनशेठ नाईक, श्री. हितेंन्द्रजी ठाकूर व श्री. एग्नेशीअस मुर्झेलो यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. सुजाता कवळी यांनी केले. तुळशी रोप देऊ संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जेरोनीमा जगदीश सामंत व इतर विश्वस्तांनी मान्यवरांचे स्वागत केले. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अश्विन सामंत यांनी प्रास्ताविक सादर करताना संस्थेच्या आतापर्यंत झालेल्या कामाची, सुविधांची माहिति उपस्थित मान्यवरांना व निमंत्रीत जनतेस दिली. तसेच संस्थेच्या भविष्यातील उद्दिष्ट, नवीन कल्पना सर्वांसमोर मांडल्या. संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जेरोनीमा जगदीश सामंत यांनी आभारपर भाषण केले.

डॉ. जगदीश सामंत यांचे कार्य वालीव, अर्नाळा, विरार परिसराप्रमाणेच गोरेगांव येथे होते. गोरेगांवकरांचे ते लाडके फॅमिली डॉक्टर होते. योग्य निदान कमीत-कमी तपासणी व औषधोपचार अशी त्यांची ख्याती होती. तमाम कार्यकर्ते व गोरेगांवकरांच्या आग्रहास्तव स्मृतिगंध समिती, गोरेगांव तर्फे रविवार दि. ३ फेब्रुवारी २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता, नंदादीप विद्यालय, गोरेगांव पूर्व येथे मा. श्री. सुभाष देसाई (उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास मा. श्री. अरविंद वैद्य (माजी मुख्याध्यापक, नंदादीप विद्यालय) प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी यांनी सात वेळा डॉक्टरांच्या कार्याला मदत म्हणून विनामूल्य कार्यक्रम केले होते. ते डॉक्टरांचे मित्रच होते. त्या सर्व आठवणींना उजाळा देण्याकरीता भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांचेच शिष्य सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. उपेंद्र भट यांच्या सुरेल गायनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. मान्यवरांच्या हस्ते डॉ. जगदीश सामंताच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करुन, दिप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. अंजली श्याम सामंत (विरार) यांनी केले. पुष्प गुच्छ् देऊन संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जेरोनीमा सामंत व इतर विश्वस्तांनी मान्यवरांचे स्वागत केले. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अश्विन सामंत यांनी प्रास्ताविक सादर करताना संस्थेच्या आतापर्यंत झालेल्या कामाची, सुविधांची व भविष्यकालीन योजनांची माहिती सर्व उपस्थितांना करुन दिली.

पुण्यस्मरण या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट रु. १ कोटीचा निधी संकलन करुन त्यांच्या संस्थांना आर्थिक बळकटी देण्याचे होते व त्यानिमीत्ताने केलेल्या आवाहनाला जनतेकडून भरघोस प्रतिसाद लाभला व आजही देणग्यांचा ओघ चालूच आहे. त्यानिमीत्ताने छापण्यात आलेल्या ''स्मृतिगंध'' या स्मरणिकेचे प्रकाशन समारंभाध्यक्ष मा. श्री. सुभाष देसाई, श्री. अरविंद वैद्य व व्यासपीठावर उपस्थित इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. जगदीश सामंत यांच्या वालीव व अर्नाळा येथील संस्थांनी गेल्या ६० वर्षात कुष्ठपिडीत व दिन-दुबळ्यांसाठी आजवर केलेल्या कार्याची माहिती चलचित्राच्या माध्यमातून खजिनदार श्री. मनिष दाभोलकर यांनी उपस्थितांस करुन दिली.

श्री. सुभाष देसाई, श्री. अरविंद वैद्य यांची भाषणे झाली, श्री. वैद्य यांनी आपल्या भाषणातून डॉक्टरांच्या विविध पैलूंचा उलगडा केला, त्यांचा स्पष्टवक्तेपणा व दांडगे वाचन या सर्व आठवणींना उजाळा दिला. श्री. वैद्य सरांच्या वक्तृत्वाला उपस्थितांनी उत्तम दाद दिली.

संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती जेरोनिमा जगदीश सामंत यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे विश्वस्त डॉ. हेमन कुलकर्णी यांनी आभारपर भाषण केले. स्व. डॉ. जगदीश सामंताच्या जीवनपटावर आधारित श्री. व्ही. जी. सामंत दिग्दर्शित ''**करुणासागर**'' हा लघुपट दाखवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**राजश्री विभाकर सामंत** (अर्नाळा)
मो. : ८८०६७५७४८४

# पाट विद्यालयात संस्था व कर्मचारी स्नेहमेळावा संपन्न



एस. के. पाटील शिक्षण प्रसारक मंडळ पाट पंचक्रोशी, पाट संचलित एस. एल. देसाई विद्यालय आणि कै.सौ.सीताबाई रामचंद्र पाटील कनिष्ठ महाविद्यालय, पाट येथे संस्था पदाधिकारी व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच माध्यमिक विद्यालय नेरूर माड्याची वाडी येथील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. यावेळी डिजिटल क्लासरुमचे उद्घाटन करण्यात आले.

डिजिटल क्लासरुमसाठी मा.सौ. मनिषा विलास देसाई यांनी आपले वडिल कै. सदानंद केशव नेवाळकर व आई कै. उषादेवी सदानंद नेवाळकर यांच्या स्मरणार्थ देणगी दिली. डिजिटल क्लासरुमचे उद्घाटन सौ. मनिषा विलास देसाई यांच्या शुभहस्ते झाले. त्यावेळी संस्था अध्यक्ष डॉ. विलास देसाई, उपाध्यक्ष श्री.लवू गावडे, कार्याध्यक्ष श्री. रामचंद्र रेडकर, कार्यवाह श्री.डी.ए. सामंत, संस्था हिशेब तपासनीस श्री. नारायण तळावडेकर, संस्था सदस्य श्री. सुधीर ठाकूर, श्री. समाधान परब, माजी कार्याध्यक्ष श्री. मिलिंद केळुसकर, माजी वरिष्ठ लिपिक श्री. सी. जी. ठाकूर प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. जी. व्ही. बाईंगडे, माध्यमिक विद्यालय नेरूर माड्याची वाडीचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. कोरे, दोन्ही विद्यालयांतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. जी. व्ही. वाईंगडे यांनी केले. शिक्षकांच्यावतीने ज्येष्ठ शिक्षक श्री.आर. एस. प्रभू यांनी डॉ. देसाई यांच्या कार्याविषयी व प्रशालेला दिलेल्या योगदानाबद्दल आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्था कार्यवाह मा. श्री.डी.ए. सामंत यांनी संस्थेच्या यशाच्या चढत्या आलेखाचा मागोवा घेतला. श्री. सुधीर ठाकूर व श्री. मिलिंद केळुसकर यांनी संस्थेची कार्यपद्धती व ध्येय-धोरणे याविषयी आपले विचार व्यक्त केले.

संस्था अध्यक्ष डॉ. विलास देसाई यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व शिक्षकवृदांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. अध्यात्म हाच जीवनाचा आधार आहे व परमेश्वराशी प्रामाणिक राहा असा मौलिक संदेश त्यांनी दिला. दोन्ही विद्यालयांच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. विलास देसाई यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. तसेच मा. सौ. मनिषा विलास देसाई यांचाही शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. त्यांनीही विद्यालयातील उपक्रम व संस्थेच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या कार्याचा गौरव म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. विलास देसाई व मा.सौ. मनिषा विलस देसाई यांनी सर्वांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संदीप साळसकर यांनी केले तर आभार माध्यमिक विद्यालय नेरूर माड्याची वाडीचे मुख्याध्यापक श्री.एस.पी. कोरे यांनी व्यक्त केले.

❑ ❑ ❑

# सोमयाग सेवा समिती

सोमयाग सेवा समिती, तेंडोली संकल्पित श्री. देव रवळनाथ पंचायतनाच्या कृपाशीर्वादाने गुरूवार दि. ६/१२/२०१८ ते रविवार दि. १६/१२/२०१८ या ११ दिवसीय कालावधीमध्ये श्रौतकर्मामध्ये अग्रमान्य असे विद्वद्वरेण्य श्री क्षेत्र गोकर्ण महाबळेश्वर निवासी (कर्नाटक राज्य) श्रीमान वेदमूर्ती गणेश वासुदेव जोगळेकर गुरुजी (महोदय) यांच्या अध्वर्युत्वाने मंडीत, श्रीमान वाजपेयजी अनिरूद्ध ठाकूर गुरुजी, मु. नाटे, राजापूर यांच्या याजमानत्वाने सिद्ध अनेक वेदमान्य, वेदश्री गुरुजनांच्या सहकार्याने आणि आशिर्वादाने, श्री देव रवळनाथ पंचायतन प्रांगणाच्यासमोर, उज्वला नदीच्या रम्य काठावर, समस्त जनहितार्थ ''चरक सौजामणि याग, बृहस्पतीसब याग तसेच वाजपेयांग उर्वरीत यज्ञ'' सोहळा अंत्यत उत्साहात दिमाखदारपणे पार पडला.

विश्वशांतीसाठी होणाऱ्या या यागात 'संगीतमय रामायण कथा,' 'वेदसेना व दीपोत्सव 'चला आळंदीला, दुरितांचे तिमिर जावो, वादळ, सारखी संगीत व सामाजिक नाटके तसेच 'संयुक्त दशावतार संचाचे दशावतारी पौराणिक नाट्यप्रयोग', शास्त्रीय भक्ति संगीत व मधुर अभंगवाणी', राष्ट्रीय स्तरांवरच्या कीर्तनकारांची अनेक कीर्तने 'श्रीमद् भगवद् गीतेवर आधारित 'गीत गीतांमृत', 'भरत नाट्यम् तसेच कथ्थक नृत्य' इ. प्रकारांचे उत्कृष्टरित्या सादरीकरण करण्यात आले.

या यागाच्या यशश्वीतेसाठी 'वेदमूर्ती वेदवेदांग चक्रवर्ती श्रीमान गणेशशास्त्री द्रविड', 'परमपूज्य श्री. विद्यानृसिंह भारती शंकराचार्य, करवीर पीठ, कोल्हापूर', 'रामायण कथाकार- ह.भ.प. श्रीमान श्री. पद्मनाभ बुआ व्यास उस्मानाबाद' यांची विशेषत्वाने उपस्थिती तसेच आशिर्वाद लाभले.

गावातील कलाकारांनी साकारलेल्या टेंबेस्वामी बालदत्त अवधूत, अग्नी नारायण, शेषाधिश श्री विष्णू भगवान, परशुराम पंचानन, गणपती, गायत्री देवी, स्वरस्वती देवी, श्री. स्वामी समर्थ, विठ्ठल-रूक्मिणी श्रीमहादेव अशा नानाविध स्वरूपाच्या आकर्षक मूर्त्या मुख्य याग मंडपात विराजमान झाल्या होत्या.

मुख्य यागस्थळी येताच स्वागत कक्ष येथील उपस्थित ग्रामस्थ पुरुषांना चंदनाचा टिळा व स्त्रियांस हळद-कुंकू लावून त्यांचे स्मितवदनाने स्वागत करत होते. मुख्य मंडपात येताना वहाणाऱ्या धबधब्यातील पाण्याचे पाय धुऊनच आत यावे लागे. 'सनातन संस्था', 'प्रजापिता ब्रह्माकुमारीज' 'अग्नि होत्र' 'स्वदेशी आयुर्वेद व निसर्गोपचार तसेच गोमूत्र चिकित्सा' आदींचे स्टॉल होते.

या अकरा दिवसात येणाऱ्या भाविक-भक्तांस प्रसाद वाटप, अल्पोपहार जसे चहा-नास्ता, दुपारचा व रात्रीचा महाप्रसाद याचेही आयोजन सुव्यवस्थितरित्या करण्यात आले होते.

या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमान राजू मुंडले, ग्रामपुरोहित, तेंडोली तसेच अध्यक्ष, सोमयाग सेवा समिती, तेंडोली यांच्या नेतृत्वाखाली गेले चार महिने अहोरात्र तेंडोली ग्रामस्थ, त्यांचे आप्तेष्ट-मित्रमंडळी लगतच्या गावातील ग्रामस्थ यांनी अपार मेहनत घेतली.

ज्या भूमीवर सांप्रत याग संपन्न झाला, तसेच गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यातील 'वाजपेय सोमयाग संपन्न झाला, ती भूमी पुण्यभुमी झाली. श्रौत कर्मामध्ये असे याग होणे फारच विरळा. दि. ६,१२ व १६ डिसेंबर, २०१८ रोजी उज्वला नदीवर सर्व ब्रह्मवृंद, संचारासहित श्री देव रवळनाथाचे तरंग व सातेरी, भद्रकाली व अनळादेवी पालखी तसेच उपस्थित अलोट जनसमुदायाचे स्नान पार पडले.

याग स्वरुप अशा भगवंताच्या अनुग्रहास कृपाशीर्वादास जे पात्र ठरले, ज्यांनी या यागास हस्ते-परहस्ते काया-वाचा-मने यथाशक्ती हातभार लावला. त्या सर्व ज्ञात-अज्ञातांचे ऋण 'सोमयाग सेवा समिती, तेंडोली' व्यक्त करीत आहे.

**।। सर्वमतं ब्रह्मं नित्य यज्ञे प्रतिष्ठितम् ।।**
**संतांचे सहज बोलणे तेची उपदेश होती।**
**तेणे सर्व व्यथा नष्ट होती ।**

**श्री. अनिल प्रभाकर प्रभु**
सदस्य,
सोमयाग सेवा समिती, तेंडोली,

# स्वर शारदा, गारगोटी



गारगोटी येथील स्वरधारा वाद्यवृंदातर्फे शारदोत्सवाचा एक भाग म्हणून 'स्वरशारदा' या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन इंजुबाई सांस्कृतिक भवन येथे करण्यात आले. रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमाला भरभरुन दाद दिली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील लोकशाहीर द.ना. गव्हाणकर प्रतिष्ठान व स्वरधारा संगीत विद्यालय यांचेवतीने गारगोटीतील संगीतप्रेमींसाठी ३ महिन्यातून एकदा सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. शारदोत्सवाची सुरुवात 'स्वरशारदा' या कार्यक्रमानी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला 'जयशारदे' हे शारदास्तवन अनघा गव्हाणकर हिने सादर केले. 'देवाजीचं नाव घ्यावं' या रचनेने रसिक मंत्रमुग्ध होवून गेले. गीतकार दत्ता पाटील यांच्या 'चंद्रभागेच्या तीरी' या गीतावर रसिकांनी ताल धरला. 'सहा ऋतुंचे सहा सोहळे' ही शीर्षक काव्यपंक्ती घेवून स्वरशारदा कार्यक्रमात या जन्मावर या जगण्यावर या गीताने रंगत वाढविली. अभंग, भक्तिगीते, भावगीते, ठाकर गीते, चित्रपट गीते अशा सर्वप्रकारच्या गीत सादरीकरणाने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढत गेली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या 'ने मजशी ने' या रचनेने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

स्वरशारदा कार्यक्रमाची सुरुवात शाहीर द.ना. गव्हाणकरांचा सहवास लाभलेले कॉ. दत्ता मोरे, कॉ.राम कळंबेकर यांचे हस्ते माजी सैनिक शंकरराव देसाई, अरुण पाटील, रमेश लाड यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाली. डॉ. के. ए. मोमीन, रमेश कारेकर, नंदकुमार राऊळ, सुनिल लोहार, भारती परुळेकर, अस्मिता गव्हाणकर, विनायक पोवार, हरीदास देसाई, अर्णव राऊळ, ऋषीकेश गव्हाणकर या कलाकारांनी गीत सादरीकरण केले. राजाराम देवेकर यांच्या संगीत संयोजनासह मंगेश सारंग-कि बोर्ड, अनिकेत ससाणे-तबला ढोलक, बेलेकर-हार्मोनियम, तालवाद्य-सार्थक परुळेकर यांनी साथ दिली.


हार्दिक शुभेच्छा !

**स्वर–योग**



विविध संकल्पनांवर आधारित मराठी/हिंदी गाण्यांची मैफल
''मला भावलेले कलावंत'' एकपात्री कार्यक्रम
लग्नसमारंभासाठी आणि
मंगलकार्यासाठी शहनाई जुगलबंदी

**प्रस्तुतकर्ता : निवेदक, मुलाखतकार– प्रदीप देसाई**



***प्रदीप देसाई***

**टेलि. : ०२२–२३८७ ३०६७, मो. : ९८६७०६५७३८**

१४, कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.

# कुडाळदेशकर गौड ब्राह्मण सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित-खास अंगारक संकष्टी चतुर्थी निमित्त कार्यक्रम

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निवास येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची स्थापना १९२७ मध्ये झाली. मंडळाने पर्यावरणाचं महत्त्व लक्षात घेऊन २०१० मध्ये मुंबईमधील पहिली कायमस्वरुपी ईकोफ्रेंडली गणेशमूर्तीची स्थापना केली. त्यानंतर येणाऱ्या प्रत्येक संकष्टी चतुर्थीला या गणरायासमोर गुरूजींना बोलावून यथासांग पूजा व आरती केली जाते व भाविकांना प्रसाद वाटला जातो. गेल्या २५ डिसेंबर २०१८ रोजी येणारी अंगारक संकष्टी चतुर्थी ही शंभरावी होती व त्याचे औचित्यसाधून एका दिमाखदार सोहळ्याचे आयोजन निवासात करण्यात आलेले होते. सकाळी ६ ते १० या वेळेमध्ये गणपती समोर यथासांग पूजा व आरती करण्यात आली व त्यानंतर सहस्त्रावर्तनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ७ ते १० यावेळेत एका शानदार भक्तीसंगीताच्या मैफीलीचे आयोजन करण्यात आलेले होते. यामध्ये नचिकेत देसाई, केतकी भावे-जोशी तसेच अवधूत गांधी यांनी दर्जेदार भक्तीगीते/अभंग सादर केले. कार्यक्रमाची निर्मिती/ संकल्पना/ निवेदन प्रदीप देसाई यांची होती. अनेक भाविकांनी त्याचा लाभ घेतला. आपल्या ज्ञातीमधील प्रख्यात उद्योगपती डोंबिवली येथील राजाभाऊ पाटकर तसेच सारस्वत बँकेचे Dy. Managing Director शिरीष महांबरे व NKGSB बँकेचे Managing Director चिंतामणी नाडकर्णी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

**प्रदीप देसाई**

❑ ❑ ❑

# किरण ठाकूर संपादित- तरुण भारत या दैनिकाचा पाचवा वर्धापन दिन सोहळा मोठ्या दिमाखात साजरा

स्वातंत्र्यपूर्व काळात सुरू झालेल्या ''तरुण भारत'' वृत्तपत्राने मराठी माणसाला न्याय देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आता मुंबईत 'तरूण भारत'च्या संवाद पुरवणीने नागरिकांचा विश्वास जिकंला असून सामान्यांचा एक आवाज म्हणून प्रसिद्धीस येत असल्याचे गौरवोद्गार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी याप्रसंगी काढले.

कोकण गोव्यासह सीमा भागातील जनतेचे मुखपत्र म्हणून ओळख असलेल्या ''तरुण भारत संवाद'' च्या मुंबई आवृतीचा पाचवा वर्धापन दिन अलीकडेच दिमाखात पार पडला. यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते ''तरुण भारत संवाद''च्या विशेष पुरवणी आणि दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. माटुंगा येथील सिटीलाईट येथे आयोजित केलेल्या या सोहळ्यास अनेक दिग्गज मान्यवर आवर्जून उपस्थित होते. या प्रसंगी महापौर विश्वनाथ महाडेश्वर, गृहराज्यमंत्री दीपक केसरकर, माजी नगरपाल जगन्नाथराव हेगडे, सारस्वत बँकेचे अध्यक्ष गौतम ठाकूर, म्हाडाचे मुंबई अध्यक्ष मधु चव्हाण, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, ''तरुण भारत'' चे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद ठाकूर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी रामदास आठवले म्हणाले की, १९१९ मध्ये बेळगावात बाबूराव ठाकूर यांनी सुरू केलेले ''तरुण भारत'' वृत्तपत्र आता शंभरीच्या उंबरठ्यावर आहे.

तरूण भारत वृत्रपत्राला मुंबई शहरात ५ वर्ष पूर्ण झाली याचा मला खूप आनंद होतोय. माझे आजोबा बाबूराव ठाकूर यांनी तरुणांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घ्यावा, यासाठी हे वृत्तपत्र सुरू केले. आज हा वृक्ष खूप मोठा झाला आहे, असे ''तरूण भारत'' चे व्यवस्थापकीय संचालक प्रसाद ठाकूर याप्रसंगी म्हणाले. सर्व मान्यवरांचा प्रसाद ठाकूर यांनी शाळ, श्रीफळ तसेच ज्ञानदिप देऊन सन्मान केला. यानंतर सर्वांनी स्नेहभोजनाचा आनंद घेतला. या सोहळ्याचे अतिशय सुरेख सूत्रसंचालन उमा बापट यांनी केले.

**प्रदीप देसाई**




संपादक

गौड ब्राह्मण त्रैमासिक

महोदय,

स.न.वि.वि.

गेली ८० वर्षे प्रसिद्ध होणारा गौड ब्राह्मण सभेच्या मुखपत्राचा त्रैमासिक दिवाळी विशेषांक- २०१८ सर्वांगानीं वाचनीय झाला आहे.

सुप्रसिद्ध पत्रकार, चरित्रकार कै. दीनानाथ गोपाळ तेंडोलकर, झारापकर उद्योग समुहाचे शिल्पकार कै. आप्पासाहेब झारापकर यांच्या जीवन कार्याविषयी सौ. गीता अ. परुळेकर यांनी करून दिलेला परिचय तसेंच गोरेगांव येथील अभिनव शिक्षण प्रसारक मंडळ या शाळेच्या मुख्याध्यापिका, सुप्रसिद्ध बालसाहित्यिका कै. आशाताई गवाणकर यांच्याबद्दल त्या शाळेत शिक्षण घेतलेल्या सौ. गीता अ. परुळेकर यांनी आपल्या गुरुबद्दल व शाळेबद्दल लिहीलेला लेख उत्तम आहे.

श्री साईबाबांची शिकवण व जगाचे कल्याण ह्या आध्यात्मिक लेखातून कुमारी रागिणी मुणगेकर हीने बाबांची शिकवण अत्यंत उत्तम प्रकारे सांगितली आहे. त्यामुळे आबालवृद्धांनी अवश्य वाचावा असा हा लेख आहे.

प्रा. माधव गवाणकर यांचा ''बॅचलर'' नामा हा ललित लेख, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके (सौ. निलिमा प्रभु), आधुनिक संत प्रवचनकार मनोहर शंकरराव कोचरेकर (नंदकुमार साळवी) स्वास्थ विमा (मनीष दाभोलकर) यांनी लिहिलेले लेख वाचनीय आहेत.

सुमती सामंत हीने माझे 'चैतन्यमय वार्धक्य' ह्या लेखातून आपण वयाच्या ९२व्या वर्षीही आनंदी जीवन कसे जगत आहे हे सांगितले आहे. ते जगण्यासाठी आवश्यक असलेल्या, चार गोष्टींची गरज आहे. सदर लेख सेवानिवृत्त झालेल्या, वयाची साठी उलटलेल्या व्यक्तींनी अवश्य वाचावा असा आहे. 'आई' ह्या छोट्याशा लेखातून अमरनाथ तेंडुलकर यांनी आईची थोरवी उत्तम प्रकारे सांगितली आहे.

तालुका, राज्यस्तरीय, राष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर जागतिक स्तरावर पोहचून सुवर्णपदक प्राप्त करणारी अनुजा अशोक तेंडुलकर हीची मनीष दाभोलकर यांनी सांगितलेली कथा मुलींना व गृहिणींना प्रेरणा देणारी आहे.

संस्थेच्या सेवादालनाविषयी माहिती तसेच ज्ञातीतील १०वी, १२वी, व अन्य शैक्षणिक क्षेत्रांत स्पृहणीय यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा फोटो, परिचय, ज्ञातीतील महनीय व्यक्तीना श्रद्धांजली वाहाणारे फोटो, परिचय आदि वाचनीय मजकूर अंकात आहे. एकंदरीत अंक वाचनीय व संग्रही ठेवण्यासारखा झाला आहे.

**श्री. सुरेंद्र तेलंग (गिरगाव)**

नवर्षाभिनंदन!

आक्टो-डिसेंबर-२०१८ मध्ये माझे 'चैतन्यमय वार्धक्य' हा सुमती सामंत यांचा लेख आवडला. जीवेत शरद: शतम!

प्रा. माधव गवाणकर यांचा 'बॅचलर'नामा ललितलेख वाचून जन्यजनकभावे मला विवेकानंद ग्रंथावलीमधील कथा आठवली. राज्यातील सर्वांनी उपवर उपवधू यांनी विवाह करावा. कुणीही संन्यासाश्रम घेऊ नये. कुणीही अविवाहित राहू नये. अन्यथा राज्य सोडून जावे. अशी दवंडी पिटवली. एक दिवशी राजाचा बालमित्र त्याला भेटायला राज्यात आला. त्याने संन्यास घेतला होता. तो राजाला म्हणाला, 'संन्यासी लोकांच्या अधिवेशनासाठी मी निघालो आहे. वाटेत तुझे 'राज्य' लागल्याने तुला भेटण्यासाठी मी येथे आलो आहे'. राजा त्याला पोहोचवायला वेषांतरकरून वेशीपाशी गेला. एक नवतरूण संन्यासी गुरूंची वाट पहात थांबला होता. तिघेजण येथे काही संवाद करण्यासाठी थांबले असता सोंडेत माला घेतलेला गजराज व त्याच्या मागे राजे, राजकन्या प्रजाजनांसह त्यांच्या दिशेने येताना त्यांनी पाहिले.

उत्सुकतेने ते गंमत पहायला थांबले असता गजराजाने सोंडेतील माळा नवयुवकाच्या गळ्यात घातली. त्याबरोबर राजा, राजकन्येसह रथातून उतरला संन्यासी तरुणाला राजा म्हणाला गजराजाने माळा आपल्या गळ्यात घातल्याने आमच्या प्रथेप्रमाणे आपण आमचे जामात झाला आहात. आता आमच्या कन्येशी विवाह करून गृहस्थाश्रमात पदार्पण करावे.

युवक मी संन्यासी असल्याने आपला प्रस्ताव मला मान्य नाही. पंधरा दिवसापुर्वी ही घटना घडली असती, तर मी आपला नक्कीच जावई झालो असतो. आमच्या राज्यातील युवकांना सोडून गजराजाने आपली निवड केली, यामध्ये नक्कीच नियतीचा काही संकेत असणार असे म्हणून राजा त्याला लालूच दाखवितो परंतु दृढनिश्चयी नवतरूणी संन्यासी बघत, नाही तेव्हा राजकन्या वडिलांना सांगते, बाबा आपण माझी अजिबात काळजी करू नका. माझ्या नशिबाची मी! 'राजा आपल्या परिवारासह निघून जातो. नवतरूण संन्यासी घनदाट जंगलात वेगाने शिरतो. एव्हाना काळोख झालेला असतो. त्यामुळे वयस्कर संन्यासी व राजा राजकन्येसाठी, त्यामुळे तिला मदत करावी या हेतूने एका झाडाखाली एकत्र येतात. खूप थंडी व कडकडून भूक लागल्याने झाडाखाली शेकोटी पेटवतात राजाला पक्ष्यांची भाषा समजत असते. चिमणी चिमणाला म्हणते आपण गृहस्थाश्रमी आहोत. आपल्या झाडाच्या आश्रयाला आलेले तीन अतिथी भुकेलेले आहेत. त्याची क्षुधा शमन, करण्यासाठी मी शेकोटीत पडते. म्हणजे माझे मांस खाऊन त्यांची क्षुधा थोडीतरी शमेल. ते ऐकून चिमणा म्हणतो 'तिघांची भूक एकाने कशी भागेल? मी सुद्धा शेकोटीत पडतो. ते एकून तिन्ही पिले म्हणतात- बाबा आम्ही ही शेकोटीत पडून आमचे जीवन कृतार्थ करतो. अशा रितीने सहपरिवार चिमणे शेकोटीत पडतात. ते दृश्य पाहून राजा अंतर्मुख बनतो. त्याला समजते की सारेच आश्रम काटेकोर नियम पाळल्यास श्रेष्ठ आहेत. स्वगृही परतल्यावर तो आपली. दवंडी मागे घेतो. म्हणजेच विवाहाचे बंधन मागे घेऊन प्रजाजनांना मनाप्रमाणे वागण्याचे स्वातंत्र्य देतो.

शेअरच्या गुंतवणूकीसंदर्भात काही मोलाच्या सूचना देऊन वाचकाना दिलासा देणारा निरंजन अवसरे यांचा लेख तसेच मनीष दाभोलकर (अर्थतज्ज्ञ) यांचा स्वास्थ्य विमा घेण्यासाठी केलेले मार्गदर्शन व त्याचा पूर्वेतिहासाचा तपशील खूप माहितीपूर्ण आहे. त्यामुळे लेखकद्वयींना धन्यवाद! विमाक्षेत्रावर आय.आर.डी.आय.ए. नियंत्रण ठेवते, ही मौलिक माहिती मिळाली.

निरूता भाटवडेकर यांनी केलेल दुबईचे वर्णन वाचून, वाचकांच्या मन: चक्षूसमोर दुंबई आली. उंच इमारत बूर्ज खलिफा, विविध वैशिष्ट्यांचे मॉल, वॉटर कनॉल यांचे वर्णन वाचून बसल्या जागी वाचक दुबईची वारी करतात. हार्दिक अभिनंदन!

शोध प्रकाशवाटांचा हा देवयानी य प्रभू यांचा लेख खूप आवडला. प्रेरणादायक अनुभव अनुकरणीस आहेत. पुढील वाटचालीसाठी सदिच्छा!

'अमृतमहोत्सवी जुळी' हा सौ. विद्या महाजन यांचा लेख खूप आवडला. धन्यवाद ! आकेरकर कुटुंबाच्या सहवासात लाभलेले सोनेरी क्षण त्यांनी शब्दबद्ध केले आहेत उभय भावंडाना वाचकांतर्फे शुभेच्छा ! जीवेत् शरद: शतम्!

**सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**
बोरिवली (पूर्व)

गौड ब्राह्मण दिवाळी अंक २०१८ च्या मुखपृष्ठावरील Iron lady (पोलादी महिला) चे छायाचित्र पाहून उत्सुकतेने मी SUCCESS STORIES 'धाकड गर्ल' वेगुर्ल्याची हा मनीष दाभोलकर यांचा लेख वाचला. ही माहिती वाचकांपर्यंत पोहोचविल्याबद्दल धन्यवाद! श्रीमती अनुजा अशोक तेंडोलकर यांच्या अथक परिश्रमाला सलाम. भावी काळात होणाऱ्या मंगौलिया एशियन चँपियनशिप पॉवर लिफ्टींग स्पर्धेसाठी आम्हा वाचकांच्या शुभेच्छा! जीवेत् शरद: शतम्!

प्रभावी चरित्रकार डी. जी. तेंडुलकर, झारापकर उद्योग समुहाचे शिल्पकार के. आर. 'झारापकर', आशाताई गवाणकर एक सिद्धहस्त लेखिका हे तिन्ही लेख स्फूर्तीदायक आहेत. लेखिका गीता परुळेकर यांना धन्यवाद! तसेच बॅचलर नामा लिहिणारे प्रा. माधव गवाणकर यांनी वेगळे विचार मांडून वाचकांना विचारप्रवण केल्याबद्दल धन्यवाद!

'Life is beautiful' नावाचा इंग्रजी चित्रकार आठवला. कैद्याच्या छावणीत एक लहान मुलगा असतो. मुलाच्या बालमनावर विपरीत परिणाम व्हायला नको म्हणून त्याचे वडील त्याला सांगतात की आम्ही सारे कष्टांची स्पर्धा करत आहोत. जो जिंकेल त्याला बक्षीस मिळेल. असे म्हणून मुलाला कल्पनेच्या साम्राज्यात ठेवतात. कर्मधर्मसंयोगाने मुलगा अनन्वित अत्याचारातून वाचतो. त्या निरागस बालकाची शेवटी छावणीतून सुटका होते. मोठेपणी त्याला आपल्या पालकांचा व इतरांचा समंजसपणा समजतो.

'श्री साईबाबांची शिकवण व जगाचे कल्याण' हा कु. रागिणी मुणगेकर हीचा लेख खूप आवडला. हार्दिक अभिनंदन! साईसच्चरित पोथीची आठवण झाली. बांद्रा (पश्चिम) येथे दाभोलकरांचे घर आहे. अठरा एकोणीस वर्षापूर्वी मी तेथे गेले होते. माझ्या असे वाचनात आले की शिर्डीच्या साईबाबांनी लेखकाकडे विशिष्ट वस्तू देऊन भावी काळात ओळख पटविणारा तरुण तुमच्या घरी आल्यास तो मीच (पुनर्जन्म घेतलेला असेन असे सांगितले. त्याप्रमाणे त्यांच्या मुलाकडे एक तरुण कालांतराने आला. तेच अनिरूद्ध बापू होत. 'जगदोद्धारण करण' ह्या नावाचे एक पुस्तक माझ्या वाचनात आले. (श्री. प्रशांत प्रभाकर पालेकर) शिर्डी साईबाबांचे निर्वाण १९१८ रोजी झाले. त्यांनतर आठ वर्षांनी १९२६ साली सत्यसाईबाबांचा जन्म झाला. ते शिर्डी साईबाबांचा पुर्वावतार मानले जातात. कारण शिर्डी साईबाबांच्या भक्तगणाना याची प्रचिती आली आहे.

सौ. नीलिमा प्रभू यांचा 'वासुदेव बळवंत फडके एक क्रांतिकारक' हा लेख खूप आवडला. हार्दिक अभिनंदन! स्वामी समर्थ (अक्कलकोट) व गजानन महाराज (शेगाव) दोघांचेही आशीर्वाद घ्यायला ते गेले होता उभयतांनी त्यांना सबूरीचा सल्ला दिला होता परंतु परिस्थितीनुसार त्यांना मागे फिरणे शक्य नव्हते. भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपले बलिदान दिले. त्यांच्या हौतात्म्यातून अनेक सैनिक जन्माला आले.

धन्यवाद !

**सौ. स्मिता दत्तात्रय पाटील**
(बोरिवली)

स.न.वि.वि.

ऑक्टोबर ते डिसेंबर- २०१८ चा ''गौड ब्राह्मण'' त्रैमासिकाचा दिवाळी विशेषांक आवडला. धन्यवाद!

सौ. गीता अ. परुळेकर यांचा 'प्रभावी चरित्रकार डी.जी. तेंडोलकर हा लेख वाचला. त्यांना फोन करून त्यांचे अभिनंदनही केले व काही जुन्या आठवणी ज्या या लेखात आलेल्या नाहीत, त्याही त्यांच्याबरोबर शेअर केल्या. स्व. श्रीमती सुलोचना आत्माराम तेंडोलकर या डी.जी. तेंडोलकर यांच्या वहिनी बाल विद्यवा होत्या. मुंबई महानगरपालिकेत देवीखात्यात त्यावेळी व्हॅक्सिनेशन डिपार्टमेंटला कार्यरत होत्या. ज्यावेळी पं. जवाहरलाल नेहरूंनी डी. जी.ना. म. गांधींचे चरित्र लिहिण्या करिता बाणगंगा, वाळकेश्वर येथे 'एकांत' बंगला दिला, त्यावेळी स्व. श्रीमती सुलोचना आ. तेंडुलकर त्यांना घरचे जेवण करून द्यायच्या. 'डी. जीं'. च्या निधनानंतर १९७९ साली त्यांच्या वहिनीने 'एकांत' या बंगल्याच्या चाव्या स्व. इंदिरा गांधी यांचेकडे सुपूर्द केल्या. त्याप्रसंगी सुप्रीम कोर्टाचे जज्य स.श्री.डी.जी. पालेकर, श्री. अनंत जगन्नाथ अवसरे ही मंडळी त्यांचे सोबत दिल्लीस गेली होती.

तदनंतर 'डी.जी. तेंडोलकर चारिटेबल ट्रस्ट'ची स्थापना केली गेली. या ट्रस्टला त्यावेळी 'महात्मा जी.' या प्रबंधातील छापील पाने प्रकाशित करण्यासाठी काही रॉयल्टी मिळत होती. त्या रॉयल्टीतूनच 'मुंबई मराठी पत्रकार संघ' व 'टोपीवाला व्याख्यानमालेत' काही रक्कम मानधनातून दिली जात असे.

पुढे वार्धक्यामुळे स्व. श्रीमती सुलोचना आत्माराम तेंडोलकर या डी. जी. च्या वहिनीने विश्वस्तपदाचा राजीनामा दिला होता.

या सर्व प्रसंगाचा मी साक्षीदार आहे, कारण माझे बालपण टोपीवालावाडी, कुमकुम, गोरेगाव येथे माझी आत्या स्व. श्रीमती सुलोचना आत्माराम तेंडोलकर यांचेकडेच गेले.

जुन्या आठवणींना दिलेला हा उजाळा !

**श्री. अनिल प्रभाकर प्रभु**

❑ ❑ ❑

## ❀ श्रद्धांजली ❀

गौड ब्राह्मण ज्ञातीतील खालील महनीय व्यक्तींचे दु:खद निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल गौड ब्राह्मण सभेला अतीव दु:ख होत आहे. गौड ब्राह्मण सभा त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो हीच प्रार्थना !

# गौड ब्राह्मण ज्ञाती संस्थांचा आधारवड श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत ह्यांचे दु:खद निधन !

### ''दिव्यत्वाची जेथ प्रचिती, तेथे कर माझे जुळती''!



**कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, उद्योजिका, ज्ञाती संस्थांच्या पदाधिकारी आणि गौड ब्राह्मण सभेच्या माजी विश्वस्त श्रीमती सुशीलाबाई दत्तात्रय सामंत यांचे दि. २४/०२/२०१९ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या दु:खद निधनाने ज्ञाती संस्थांचा आधारवडच गेला आहे. प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या सुशीलाताईंनी, स्वत:चा असा कधीच विचार केला नाही. सतत दुसऱ्यासाठी जगणं हेच त्यांच्या आयुष्याचे ध्येय होते. त्यांच्या जाण्याने गौड ब्राह्मण सभा तसेच इतर ज्ञातीसंस्थाचे अपरिमित नुकसान झाले आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचा आलेख दर्शविणारा सदरचा लेख प्रसिद्ध करून गौड ब्राह्मण सभेच्यावतीने तसेच ज्ञातीतील इतर संस्थांच्यावतीने आम्ही त्यांना श्रद्धांजली वाहत आहोत.**

श्रीमती सुशीला दत्तात्रय सामंत यांचा जन्म (१७ नोव्हेंबर १९२९) वसई तालुक्यातील अर्नाळा ह्या निसर्गरम्य गावात झाला. सुशीलाताई ह्या माहेरच्या वत्सला.वसई-अर्नाळा येथील सुप्रसिद्ध जमीनदार स्व. पुरुषोत्तम उर्फ अण्णासाहेब व सीताबाई गाळवणकर यांच्या त्या कन्या तर सुप्रसिद्ध धन्वंतरी डॉ. नरसिंह गाळवणकर यांच्या त्या भगिनी. या सर्वांच्या सान्निध्यात त्यांच्यावर संस्कारांची रुजवण झाली आणि त्या घडत गेल्या. सुशीलाताई लहानपणापासून घरकामात हुषार, वृत्तीने धार्मिक, बुद्धीने तल्लख व आकर्षक व्यक्तिमत्त्व ही त्यांच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये. संस्कारशील अशा वत्सलेचा वयाच्या १८ व्या वर्षी २९ मे १९४७ साली श्री. दत्तात्रय रामचंद्र सामंत यांच्याशी विवाह झाला. वत्सलेच्या नावात बदल होऊन त्या सुशीला सामंत झाल्या. सुशीलाताईंचे पती दत्तात्रय रामचंद्र सामंत हे सामाजिक कार्यकर्ते होते. गौड ब्राह्मण सभा, निराश्रित सहाय्यकारी फंड या संस्थावर ते कार्यरत होते. घरातील या सामाजिक सेवेच्या वातावरणाचा सुशीलाताईंवर चांगलाच परिणाम झाला. त्याही ज्ञातीसेवेसाठी पुढे सरसावल्या. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण महिला मंडळावर गेली ५० वर्षे सक्रिय असलेल्या, मराठा मंदिर, वनिता विश्वस्त संस्थेवर ४० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या व गेली कित्येक वर्षे गौड ब्राह्मण सभेच्या विश्वस्तपदी विराजमान असलेल्या श्रीमती सुशीला दत्तात्रेय सामंत ह्या ९० वर्षाच्या 'तरुण' समाजसेविका ज्ञातीसाठी 'आधारवड' होत्या.

सुशीलाताई ह्या कुशल उद्योजिका होत्या. पती निधनानंतर त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य सुशीलाताईंनी आजही पुढे सुरू ठेवले होते. पतीच्या स्मरणार्थ निराश्रित सहाय्यकारी फंड, गौड ब्राह्मण सभा, विद्यावृद्धी समाज, दाभोली मठ, गोपाळबोध स्वामी मळगावकर मठ या संस्थांना त्यांनी भरघोस देणग्या दिल्या आहेत. ज्ञातीतील गरीब, गरजू व होतकरू मुलांच्या शिक्षणसाठी त्यांनी भरघोस देणग्या दिल्या आहेत. ज्ञातीतील गरीब गरजू व होतकरू मुलांच्या शिक्षणासाठी त्यांचा नेहमीच आर्थिक मदतीचा हात पुढे असायचा.

आज वयाच्या ९० व्या वर्षीसुद्धा त्या पूर्वीच्या उत्साहाने कार्य करताना दिसणाऱ्या, टापटीपपणा, वेषभूषेची कलात्मक निवड, खरेदी करताना योग्य त्याच वस्तूंची निवड करणे, समाजात वावरताना कसे वागावे, काय बोलावे याचे भान ठेवणे, शांत आणि मितभाषी आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे वक्तशीरपणा म्हणजेच वेळेचे बंधन पाळणे

ह्या सगळ्या गोष्टी त्यांच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये होती. माहेर -सासर, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा हा भेदभाव त्यांनी कधीच पाळला नाही. सर्वांनाच प्रेमाच्या मदतीचा हात पुढे करणाऱ्या, अन्यायाची, असत्याची नेहमीच चीड असलेल्या पण तितक्याच स्वाभिमानी अशा विविध रूपात वावरणाऱ्या सुशीलाताई यांची नावाप्रमाणेच सुशील, आदर्श गृहिणी आणि आदर्श समाजसेविका म्हणून ज्ञातीमध्ये ख्याती होती.

सन २०१३ साली गौड ब्राह्मण सभेच्या वार्षिक स्नेह-संमेलनात सभेच्यावतीने त्यांना 'आदर्श समाजसेविका पुरस्कार' देऊन त्यांच्या कार्याचा विशेषरूपाने गौरव करण्यात आला होता.

कणखर तरीही प्रेमळ, करारी तरी हळव्या अशा भारदस्त व्यक्तिमत्त्वाच्या व सर्वांच्या लाडक्या 'सुशीलाताई' आज आपल्यात नाहीत ह्याचीच राहून राहून खंत वाटते. सुशीलाताई आज हयात नसल्या तरी स्मृतीरूपाने त्या प्रत्येकाच्या स्मरणात राहतील.

# सौ. वीणा

(जन्म ११-९-१९५१, मृत्यू २८-१२-२०१८)

## ''जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला''...



ह्या गाण्याचा अर्थ आज आम्हाला आमची ताई आमच्यातून निघून गेल्यावर खऱ्या अर्थाने समजला. शांत वातावरणात वीणेची तार छेडल्यावर जसा सुखद मनाला उस्फूर्त करणारा सुर असतो तशाच प्रकारची आमची वीणा ताई होती. खरोखरच तीने आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत कोणालाही त्रास न देता समाधानी मनाने ती आमच्यातून फसवल्यागत निघून गेली.

वीणाताई हि कुटूंबात माहेरी व सासरी सर्वांचीच लाडकी होती. तीने माहेरच्या व सासरच्या लोकांमध्ये कधीच हेवादावा केला नाही. घरात आलेल्या प्रत्येक व्यक्तीचा तिने आगत्याने केलेला पाहुणचार आम्ही कधीच विसरणार नाही. त्या पाठीमागे अर्थातच आमच्या भाऊजींचा फार मोठा वाटा आहे हे तितकेच खरे! तिच्या घरातून आम्ही आमच्या घरी निघतांना ते दोघे नेहमीच हसतमुखाने प्रश्न करायचे ''पुन्हा परत केव्हा येणार''? आता आमच्या ताईची उणीव आमचे पितृतुल्य भाऊजी भासू देत नाही, हे तितकेच आमचे भाग्य आहे.

आमचे आई वडील गेल्यावर ताईने आम्हाला आईचे प्रेम व वडीलांची माया दिली होती. तिने आपल्या जीवनात शेवटपर्यंत माणूसकीचाच धर्म जोपासला होता म्हणूनच तिने कधीही गरीब-श्रीमंत यात दुजाभाव केला नव्हता. अशा ह्या प्रेमळ स्वभावानेच तिने पुष्कळशी माणसे जोडली होती. म्हणूनच तिच्या जाण्याने आम्हा सर्वांच्या मनात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. याची आम्हाला खंत वाटते.

ताईच्या संसारात बऱ्याच खडतर घटना घडून गेल्या होत्या तरीही ताईने अशा परिस्थित चेहऱ्यावर जराही दु:खाचा अंश न दाखवता आपल्या पतीच्या पाठीमागे एखाद्या आधारस्तंभासारखी उभी राहून त्यावर मात केली. अशा आमच्या धैर्यवान व सुसंस्कृत ताईला कसे विसरणार.


शेवटी आम्ही तिची लाडकी भावंडे देवाजवळ हिच अंत:करणातून विचारणा करतो की ''तू का बरे आमच्या अशा या गुणवंत प्रेमळ ममतेच्या आईला आमच्या पासून लवकरच दुरावलस''? आमची ताई आज जरी आम्हाला दिसत नसली तरी तिची आनंदी-सद्‌गुणी प्रतिमा मात्र आमच्या मनात निरंतर जागृतच राहणार हे सत्य आहे.

''ताई तू जिथे असशील तिथे सुखी रहा'' हिच शेवटी देवाजवळ आम्ही प्रार्थना करतो.

**तुझी लाडकी भावंडे**

**सौ. प्रेमा, सौ. रश्मी, श्री. विवेक**

**श्री. महादेव (प्रबोध) सामंत**


**श्री.महादेव भास्कर सामंत**

''कुडाळदेशस्थ गौड ब्राह्मण विद्यावृद्धि समाज'' या संस्थेचे चिटणीस श्री. महादेव (प्रबोध) सामंत ह्यांचे अलीकडेच दि. ७ फेब्रुवारी २०१९ रोजी वयाच्या ६७व्या वर्षी आकस्मिक दु:खद निधन झाले. त्यांचे हरहुन्नरी व सकारात्मक उर्जाशक्ती असलेले असे आगळेवेगळे व्यक्तिमत्त्व होते.

श्री. महादेव (प्रबोध) भास्कर सामंत हे स्व. भास्कर महादेव (BM) सामंत व स्व. सौ. सुशीला भास्कर सामंत ह्यांचे द्वितीय चिरंजीव. महादेवरावांचा जन्म १३ नोव्हेंबर १९५२ चा. त्यांचे आजोबा स्व. माधवराव (महादेव) सामंत हे मुळचे कुडाळ तालुक्यातील वेताळ बांबर्डे येथील एक उद्यमशील व्यक्तिमत्व! ते तत्कालीन ज्ञाती संस्थाचे आधारस्तंभ होते. १९२६ साली त्यांचे स्वत:चे राहते घर (विठ्ठल भुवन) हे त्याकाळात कोकणातून येणाऱ्या ज्ञातीतील विद्यार्थ्यांसाठी एक प्रमुख वसतीगृह बनले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळात वांद्रे येथील काही प्रमुख व्यक्तीपैकी स्व. माधवराव सामंत, स्व. वासुदेवराव बांबर्डेकर, स्व. नारायण दाजी (मामा सामंत), स्व. सीताराम पाटकर ह्या ज्ञातीतील महापुरुषांनी कोकणातून पहिल्यांदाच मुंबईला येणाऱ्या अनेक ज्ञातीतील युवकांना घडविण्यात महत्त्वाचा पुढाकार घेतला होता. श्री. महादेव (प्रबोध) सामंत ह्यांना समाजसेवेचा वारसा त्यांचे वडील स्व. भास्कर महादेव सामंत व काका श्री. गोविंद महादेव सामंत ह्यांच्याकडून मिळाला हे विशेष! त्यांचे मामा स्व. वामन त्रंबक सामंत (आप्पा सामंत) व स्व. मनोहर त्रंबक सामंत (नाना सामंत) ह्यांचे त्यांना सुरूवातीपासूनच अनमोल मार्गदर्शन लाभले. त्यामुळेच निवृत्तीनंतर त्यांनी स्वत:ला ज्ञातीकार्याला वाहून घेतले.

